महाराष्ट्र पोलीस दलाचे मुखपत्र

# दक्षता

सर्वदूर पोहोचलेले वाचकप्रिय मासिक

- कथा
- लेख
- कविता
- ललित लेख

Vol : 52 | Issue : 07 | Mumbai | Marathi Monthly | April 2026 | Pages 84 | RNI No. 21352 | Price : Rs. 30 /-




**महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' साजरा**



**स्मार्टफोन आणि कॉम्प्युटरच्या युगात मान सांभाळा**



**आकडेमोडीचं शास्त्र आणि उत्कृष्ट संधी**



**पेट्रोकेमिकल्स : आजारांचे नवे द्वार**

महाराष्ट्र राज्य पोलिसांचे मुखपत्र

# दक्षता

सर्वदूर पोहोचलेले वाचकप्रिय मासिक...

## आता दक्षता पीडीएफ स्वरूपात
## महाराष्ट्र पोलिसांच्या संकेतस्थळावर
## मोफत उपलब्ध!


**S.B.Collect**

**छापील मासिकाची ऑनलाईन वर्गणी भरण्यासाठी**

**https://www.mahapolice.gov.in/daksha-pay.php**

***अथवा***

खालील क्युआर कोड आपल्या मोबाईलमध्ये स्कॅन करा.



**दक्षता छापील अंकाची नियमित मासिक वर्गणी रु. ३०/-**
**वार्षिक वर्गणी रु. ३००/- फक्त**

**वेबसाईटवर दक्षता मासिक मोफत वाचण्यासाठी : https://www.mahapolice.gov.in/dakshata-magazine/**

अथवा खालील क्युआर कोड आपल्या मोबाईलमध्ये स्कॅन करा

**https://www.mahapolice.gov.in/ dakshata-magazine**

MAHARASHTRA POLICE HEADQUARTERS- DAKSHATA अंतर्गत नव्या यु-ट्युब चॅनलवर ऐका दक्षता मासिकातील दर महिन्याची उत्कृष्ट तपासकथा ऑडिओ-व्हिज्युअल स्वरूपात.

**पत्रव्यवहारासाठी पत्ता:** महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१,
**वर्गणीसाठी दूरध्वनी:** ०२२-२२०४९७०१, email: mpd.dakshata@mahapolice.gov.in

**पोलीस आणि जनता यांच्यातील जिव्हाळ्याच्या नात्यामध्ये आपणही सहभागी व्हा!**




एप्रिल २०२६ । वर्ष ५२ वे । अंक ०७ वा

**मार्गदर्शन**

**सदानंद दाते**
पोलीस महासंचालक
महाराष्ट्र राज्य, मुंबई

**मो. सुवेज़ हक**
पोलीस महानिरीक्षक
(नि. व स.)

**मुद्रक/ प्रकाशक/ सरसंपादक**
**विजय मनोहर खरात**
सहायक पोलीस महानिरीक्षक

**अंकरचना व अंतर्गत व्यवस्थापन**
**सुरेंद्र बनगे**
कार्यालय अधीक्षक

**पत्रव्यवहारासाठी पत्ता**
सरसंपादक दक्षता
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा,
मुंबई ४००००१
दूरध्वनी:०२२ २२०४९७०१/२२८३४५११
mpd.dakshata@mahapolice.gov.in

**वितरण व्यवस्था**
वर्गणीसाठी संपर्क
दूरध्वनी : ०२२ २२०४९७०१

**मांडणी, मुद्रण व प्रकाशन**
विजय मनोहर खरात यांनी महाराष्ट्र स्टेट पोलीस वेल्फेअर फंड यांचेकरिता मे. प्रिंट प्लस प्रा. लि. २१२, स्वस्तिक चेंबर्स, एस टी रोड, चेंबूर, मुंबई ४०००७१ येथे मुद्रित करून महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४००००१ येथून प्रसिद्ध केले.

संपादक : **विजय मनोहर खरात**
१०२, आर विंग, मोहन पाम्स, चैतन्य विद्यालयाजवळ, शिरगांव, बदलापूर, जि. ठाणे
नागरिकत्व भारतीय

एकूण पृष्ठे ८४

*या अंकातील लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ अथवा महाराष्ट्र राज्य पोलीस दल सहमत असेलच असे नाही.*

# संपादकीय...



दक्षताच्या सर्व वाचकांना सस्नेह नमस्कार. या महिन्यात साजऱ्या होणाऱ्या हनुमान जयंती, गुड फ्रायडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, अक्षय तृतीया या सणांच्या निमित्ताने सर्वांना हार्दिक शुभेच्छा.

गडचिरोली पोलीस दलाने फेब्रुवारी २०२६ मध्ये अत्यंत दुर्गम अशा अबूझमाड परिसरात राबवलेल्या माओवादविरोधी अभियानादरम्यान सात जहाल माओवाद्यांना ठार करण्यात यश मिळवले. या सर्व माओवाद्यांवर महाराष्ट्र शासनातर्फे एकत्रितरित्या ७१ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते. तसेच सदर अभियानादरम्यान घटनास्थळावरून मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्रे, माओवादी साहित्य व दैनंदिन वापराचे साहित्य ताब्यात घेण्यात आले. या सर्वांचा वृत्तांत अंकात सादर करण्यात आला आहे.

आज तंत्रज्ञान सर्वव्यापी बनले असून पोलिसिंगमध्येही त्याचा वापर केला जात आहे. या अनुषंगाने अकोला जिल्ह्यात जिल्हा पोलीस दलाने राबविलेला त्रिनेत्र प्रकल्प पथदर्शी ठरला आहे. या प्रकल्पाअंतर्गत २०१५ ते २०२५ या दहा वर्षांमध्ये जिल्ह्यातील २३ पोलीस ठाण्यांमधील संपूर्ण गुन्हेगारी डेटा डिजिटल केला गेला असून ५,८५०+ प्रकरणे नोंदविली गेली आहेत. या प्रणालीमुळे गुन्हेगाराने तोच गुन्हा पुन्हा करण्याची जोखीम व अधिक गंभीर गुन्ह्याकडे तो वळण्याची शक्यता यांसह अनेक बाबींचे विश्लेषण करणे शक्य होणार आहे. यासंबंधीचे वृत्त अंकात प्रकाशित केले आहे.

महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे दिनांक १४ ते २८ जानेवारी २०२६ या कालावधीत 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचा वृत्तांत अंकात सादर करण्यात आला आहे.

याखेरीज श्री. सुरेश वांदिले, श्री. सुनील पाटील, श्री. संजीव देवकर, डॉ. अनिल शर्मा, श्रीमती ऐश्वर्या साळवी, श्रीमती भारती सावंत, श्री. सचिन बेंडभर, श्री. प्रशांत जोशी, श्री. रामकृष्ण अघोर, श्रीमती संजीवनी भिंगारे यांचे आशयसंपन्न साहित्य अंकात अंतर्भूत केले आहे. तसेच नेहमीप्रमाणे याही अंकात कथा, तपासकथा, पाककृती, सोशल मुशाफिरी, शब्दकोडे ही सदरे आहेत. वाचकवर्ग अंकाचे स्वागत करेल ही अपेक्षा.

**आपला स्नेहांकित,**

**(विजय खरात)**
**सहायक पोलीस महानिरीक्षक,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

# 'एआय'च्या माध्यमातून स्मार्ट पोलिसिंग



> पोलीस दलामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) वापर करणे हा पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाचा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. दहशतवादी, संघटित गुन्हेगार, आर्थिक गुन्हेगार यांच्या विरोधात लढण्यासाठी आता AI चा वापर अनिवार्य आहे.

नमस्कार. राज्यातील जनतेच्या रक्षणासाठी पोलीस दलातर्फे केले जाणारे प्रयत्न आणि राबवल्या जाणाऱ्या उपाययोजना यांचा लेखाजोखा आपल्यासमोर सादर करताना विशेष आनंद होत आहे.

गडचिरोली जिल्ह्यातून माओवादी चळवळीचा प्रभाव नष्ट करण्यासाठी विविध पातळ्यांवर अनेक उपाययोजना राबविल्या जात आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये गडचिरोली पोलीस दलाचे सी-६० कमांडो, केंद्रीय राखीव पोलीस दल (सीआरपीएफ), तसेच इतर सुरक्षा यंत्रणा या सर्वांच्या समन्वयनामधून या दिशेने प्रयत्न केले जात आहेत. त्यामुळे माओवादी चळवळीचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर कमी झाला आहे. या पार्श्वभूमीवर गडचिरोली पोलीस दलाने फेब्रुवारी २०२६ मध्ये अत्यंत दुर्गम अशा अबूझमाड परिसरात राबवलेल्या माओवादविरोधी अभियानादरम्यान सात जहाल माओवाद्यांना ठार करण्यात यश मिळवले आहे. चकमकीत ठार झालेल्या माओवाद्यांमध्ये गडचिरोली विभागीय समितीचा प्रभारी पश्चिम सब-झोनल ब्युरोचा प्रभारी आणि कंपनी क्रमांक दहाचा प्रभारी सी. प्रभाकर ऊर्फ रवी ऊर्फ प्रकालवीर ऊर्फ स्वामी ऊर्फ लोकेती चंदरराव, तसेच पागू मोड्याम, अनिला ऊर्फ बुदरी कोवाची, कामेश पदा, भजनाथ ऊर्फ भीमा होळी, मंगली कुरसाम आणि जोगी सोढी-मडावी यांचा समावेश आहे. या सर्व माओवाद्यांवर महाराष्ट्र शासनाने एकत्रितरित्या ७१ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते.

या अभियानादरम्यान घडलेली दु:खद घटना म्हणजे विशेष अभियान पथक (प्राणहिता) येथील पोलीस अंमलदार दीपक चिन्ना मडावी यांना आलेले वीरमरण. त्यांचे हे सर्वोच्च बलिदान महाराष्ट्र पोलीस दल सदैव स्मरणात ठेवेल. याच अभियानादरम्यान विशेष अभियान पथकातील जखमी जवान जोगा मडावी यांना हेलिकॉप्टरच्या साहाय्याने गडचिरोली येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर आहे.

सन २०२१ पासून आजपर्यंतच्या कालावधीत माओवादविरोधी कारवायांमधून ९९ कट्टर माओवाद्यांना ठार करण्यात आले आहे, तर १४० माओवाद्यांना अटक केली गेली आहे. याखेरीज १५३ माओवाद्यांनी आत्मसमर्पण करत विकासाच्या प्रवाहात सामील होण्याचा मार्ग अनुसरला आहे.

फेब्रुवारी २०२६ मधील सदर यशस्वी कारवाई जिल्ह्यातील माओवादी चळवळ कमकुवत होत असल्याचे द्योतक आहे. यामुळे जिल्ह्यातील नागरिक

माओवाद्यांच्या दहशतीपासून मुक्त होतील आणि जिल्ह्यातील शांततेचे व सुरक्षिततेचे वातावरण अधिक दृढ होऊन विकासाची वाट सुकर होईल, असा विश्वास वाटतो.


आपत्कालीन परिस्थितीत राज्यातील जनतेसाठी डायल ११२ हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविला जातो. संकटग्रस्त व गरजू व्यक्ती, विशेषत: महिला, वृद्ध व बालके यांना त्वरित मदत पोहोचविण्यास ही प्रणाली सुसज्ज आहे. यामुळे केवळ ११२ हा एकच क्रमांक डायल करून पीडितांना रुग्णवाहिका, अग्निशमन दल सेवा मिळणे शक्य होत आहे. हा प्रकल्प सप्टेंबर २०२१ पासून राज्यात राबविला जात असून, प्रकल्पाच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र देशभरात अग्रेसर आहे. या प्रणालीच्या प्रतिसाद कालावधीमध्ये लक्षणीय घट झाली असून २०२१ मधील सरासरी ५४ मिनिटांचा कालावधी कमी होऊन सरासरी ९ मिनिटांपर्यंत पोहोचला आहे. ही विशेष उल्लेखनीय बाब आहे.

पोलीस दलामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) वापर करणे हा पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाचा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. दहशतवादी, संघटित गुन्हेगार, आर्थिक गुन्हेगार यांच्या विरोधात लढण्यासाठी आता AI चा वापर अनिवार्य आहे. राज्यातील अनेक पोलीस घटकांनी घटक स्तरावर दैनंदिन कामकाजाच्या योग्य व्यवस्थापनासाठी व मनुष्यबळाच्या श्रमाची परिणामकारकता वाढवण्यासाठी अत्यंत उपयुक्त आणि दर्जेदार ॲप/ डॅशबोर्ड/ सॉफ्टवेअर विकसित केल्याचे निदर्शनास आले. एकूण २१२ अशा प्रकारची सॉफ्टवेअर्स विकसित करण्यात आली होती. यापैकी AI तंत्रज्ञानावर आधारित २४ सॉफ्टवेअर्सची निवड करण्यात आली. या सर्व सॉफ्टवेअर्सचे दिनांक १२, १४, १७ व १८ मार्च २०२६ रोजी पोलीस अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ तसेच विविध महाविद्यालयांमधील प्राध्यापक यांच्या उपस्थितीत सादरीकरण करण्यात आले. पोलीस दलामध्ये AI चा वापर करण्यासाठी विविध बाबी विचारात घेतल्या जात आहेत. त्यात वापर करण्यास सुसज्ज अशा सर्वोत्तम ४ ते ५ AI प्रकल्पांची निवड व अभ्यास करणे, पोलीस आयुक्त व पोलीस अधीक्षक यांच्यासाठी कार्यशाळा आयोजित करून हे प्रकल्प राज्यभर लागू करणे, AI च्या वापरातील धोके, प्रक्रिया आणि मार्गदर्शक तत्त्वे नमूद करणारे परिपत्रक जारी करणे, नवीन उपक्रमांची तपासणी करण्यासाठी समिती गठित करणे, राज्यभरातील पोलीस अधिकाऱ्यांना आपापल्या कार्यक्षेत्रात अंमलबजावणी करता यावी यासाठी महाराष्ट्र पोलीस संकेतस्थळावर AI वापराच्या सर्व प्रकरणांचे संकलन उपलब्ध करून देणे, AI मध्ये काम करणाऱ्या मनुष्यबळाचा समुदाय तयार करून त्यांना नवीन कल्पना राबवण्यास प्रोत्साहन, संसाधने आणि मार्गदर्शन पुरवणे, आयटी सचिवांसोबत बैठक घेऊन तसेच आयटी विभागाशी समन्वय साधत राज्य सरकारच्या AI धोरणाचा लाभ घेणे, स्टार्टअप्स व उत्कृष्टता केंद्रे यांच्यासोबत समन्वय साधणे, पीसीआयटी विभागातील अभियंते व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देऊन त्यांना इतर युनिट्सना मार्गदर्शन करण्यास सुसज्ज करणे यांचा समावेश आहे. सीआयडी व इतर तपास यंत्रणा सीडीआर विश्लेषण, तपासाची कृती योजना, अधिकृत पत्रांचे टेम्पलेट्स यामध्ये AI चा वापर करून तपास प्रक्रियेची कार्यक्षमता वाढवतील, असा विश्वास वाटतो. त्याचप्रमाणे मोटार ट्रान्सपोर्ट विभागात वाहन व्यवस्थापन, इंधन वापर, कार्यक्षमता विश्लेषण याकरिता आणि प्रशासन विभागात कर्मचारी नोंदी, शिस्तभंग चौकशी याकरिता AI चा वापर अभिप्रेत आहे.

गुन्हे तपास, तसेच प्रशासकीय कामकाजात AI च्या वापराने पोलीस अधिकारी व अंमलदार अधिक प्रभावीपणे कर्तव्य बजावू शकतील, असे वाटते. दि. ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत पोलीस दलात AI वर आधारित किमान एका सॉफ्टवेअरची निर्मिती व यशस्वी वापर करण्याचे उद्दिष्ट आहे.

हनुमान जयंती, गुड फ्रायडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, अक्षय तृतीया या सणांच्या शुभेच्छा. जयहिंद!

**आपला स्नेहांकित,**



**सदानंद दाते**
**पोलीस महासंचालक,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

# अंतरंग

## एप्रिल २०२६


### पोलीस विशेष


०७

०७. माओवादाविरोधातील निर्णायक टप्पा: गडचिरोली पोलीस दलाची धाडसी कारवाई आणि दहशतीच्या प्रतीकांचा अंत – **नीलोत्पल, पोलीस अधीक्षक, गडचिरोली**

२३. प्रोजेक्ट त्रिनेत्र – २३ पोलीस ठाणी, १८२९ सराईत गुन्हेगार, ५८५० एकूण गुन्हे नोंदी


३९

३९. महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' साजरा

### नवी दिशा... नवीन संधी

१९. आकडेमोडीचं शास्त्र आणि उत्कृष्ट संधी – **सुरेश वांदिले**

### दिनविशेष


२७

२७. पेट्रोकेमिकल्स : आजारांचे नवे द्वार – **डॉ. अनिल शर्मा**

### कविता

१३. माझी आई – **भारती सावंत**

६१. युद्ध नको बुद्ध हवा – **रघुनाथ मोहिते**

### आरोग्यं धनसंपदा


४५

४५. स्मार्टफोन आणि संगणकाच्या युगात मान सांभाळा – **ऐश्वर्या साळवी**

### लेख


१४

१४. डिजिटलच्या महासागरात कागदी पुस्तकाचा दीपस्तंभ डिजिटल युगात फिजिकल पुस्तक वाचनाचे महत्त्व– **सुनील पाटील**

३०. पालक आणि मुलांमधील सुसंवाद: काळाची गरज – **संजीवनी भिंगारे**

३५. ऊब मायेची – **प्रशांत जोशी**


४२

४२. पालकांनो, मुलांना बेकायदेशीर ड्रायव्हिंगपासून रोखा – **रामकृष्ण अघोर**

४८. चाहूल वसंतऋतूची– **भारती सावंत**

५४. ग्लॅमरस परवीन बाबी – **संजीव देवकर**

### कथा

५१. जिवावर बेतलं की अगदी सोप्पं – **सचिन बेंडभर**

### तपासकथा


६१

५७. आमिष – **अतुल झेंडे, तत्का. उपविभागीय पोलीस अधिकारी, नाशिक ग्रामीण**

६२. विश्वासघाताचा बळी – **नितीन ढेरे, पोलीस निरीक्षक, जयगड पोलीस ठाणे, रत्नागिरी**

६६. एक काळरात्र... – **आशिष बोरकर, सहा. पोलीस निरीक्षक, सावली पोलीस ठाणे, चंद्रपूर**

७०. स्पर्श – **कृष्णा दराडे, पोलीस उपनिरीक्षक, चंद्रपूर शहर पोलीस ठाणे, चंद्रपूर**


७९

७६. **सोशल मुशाफिरी**

७९. **पाककृती**

८१. **शब्दकोडे**



नीलोत्पल
पोलीस अधीक्षक
गडचिरोली

# माओवादाविरोधातील निर्णायक टप्पा: गडचिरोली पोलीस दलाची धाडसी कारवाई आणि दहशतीच्या प्रतीकांचा अंत

गडचिरोली जिल्हा हा भौगोलिकदृष्ट्या अतिदुर्गम, विस्तीर्ण जंगलांनी व्यापलेला आणि अनेक वर्षे डाव्या, कडव्या विचारसरणीच्या प्रभावाखाली राहिलेला भूभाग आहे. या पार्श्वभूमीवर येथे शांतता, सुरक्षितता आणि विकासाचा मार्ग प्रशस्त करणे हे पोलीस यंत्रणेसाठी मोठे आव्हान राहिलेले आहे. तथापि, मागील काही वर्षांमध्ये गडचिरोली पोलीस दलाच्या सी- ६० कमांडो, केंद्रीय राखीव पोलीस दल (सीआरपीएफ) तसेच इतर सुरक्षा यंत्रणांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे माओवादी चळवळीचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर कमी करण्यात यश आले आहे.

माओवादविरोधी कारवाया केवळ सशस्त्र चकमकींपुरत्याच मर्यादित नसून त्या विविध पातळ्यांवर राबविल्या जात आहेत. एका बाजूला सुरक्षा दलांकडून अत्यंत दुर्गम जंगल परिसरात धाडसी आणि नियोजनबद्ध अभियान राबवून माओवादी संघटनांच्या सशस्त्र क्षमतेला मोठा धक्का देण्यात येत आहे, तर दुसऱ्या बाजूला त्यांच्या दहशतीची प्रतीके आणि मानसिक प्रभाव संपविण्यासाठीही ठोस उपाययोजना करण्यात येत आहेत.

याच व्यापक धोरणाचा भाग म्हणून राबविण्यात आलेल्या काही महत्त्वपूर्ण कारवायांमुळे गडचिरोली जिल्ह्यातील माओवादी चळवळीच्या प्रभावावर निर्णायक परिणाम झाला आहे. अत्यंत कठीण परिस्थितीत राबविण्यात आलेल्या माओवादविरोधी अभियानांच्या दरम्यान सी-६० जवानांनी उल्लेखनीय शौर्य आणि धैर्य दाखवून अनेक जहाल माओवाद्यांना निष्प्रभ केले. तसेच त्यांच्या दहशतीची प्रतीके ठरलेली स्मारकेही नष्ट करून स्थानिक नागरिकांच्या मनातील भीती दूर करण्यामध्ये मोठे योगदान दिले.

या कारवायांमुळे जिल्ह्यातील नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना

अधिक दृढ होत असून पोलीस दलाविषयीचा विश्वासही वृद्धिंगत होत आहे. माओवादमुक्त, शांत आणि विकासाभिमुख गडचिरोली घडविण्याच्या दिशेने ही पावले अत्यंत महत्त्वाची ठरत आहेत

### अबूझमाड सीमावर्ती जंगलातील माओवादविरोधी धाडसी अभियान: सात जहाल माओवाद्यांचा अंत

गडचिरोली जिल्हा हा दीर्घकाळापासून डाव्या अतिरेकी चळवळीच्या प्रभावाखाली राहिलेला भाग आहे. तथापि, मागील काही वर्षांमध्ये गडचिरोली पोलीस दलाच्या सी–६० कमांडो आणि केंद्रीय राखीव पोलीस दल (CRPF) यांच्या समन्वयातून सातत्याने राबविण्यात येत असलेल्या माओवादविरोधी मोहिमांमुळे या चळवळीचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर कमी करण्यात यश आले आहे. आजच्या घडीला जिल्ह्यातील बहुतांश परिसर हा माओवादी प्रभावापासून मुक्त झाला असून उर्वरित हालचाली प्रामुख्याने अबूझमाडच्या परिसराच्या लगत असलेल्या भामरागड तालुक्याच्या सीमावर्ती दुर्गम जंगलांपुरताच मर्यादित राहिला आहे. या पार्श्वभूमीवर गडचिरोली पोलीस दलाने फेब्रुवारी २०२६ मध्ये राबविलेल्या एका महत्त्वपूर्ण माओवादविरोधी अभियानादरम्यान सात जहाल माओवाद्यांना ठार करण्यात यश मिळविले. ही कारवाई केवळ एक यशस्वी लढाई नसून जिल्ह्यातील माओवादी चळवळीच्या कमकुवत होत चाललेल्या अवस्थेचे द्योतक आहे. ०३ फेब्रुवारी २०२६ रोजी गडचिरोली आणि छत्तीसगड राज्यातील नारायणपूर जिल्ह्यांच्या सीमावर्ती जंगल परिसरात कंपनी क्रमांक १० चे उर्वरित माओवादी तसेच छत्तीसगड राज्यातील अज्ञात दलममधील माओवादी एकत्र येऊन घातपात घडवून आणण्याच्या उद्देशाने दबा धरून बसल्याची विश्वसनीय माहिती गुप्त सूत्रांकडून प्राप्त झाली. या माहितीची गांभीर्याने दखल घेऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी, भामरागड श्री. अमर मोहिते यांच्या नेतृत्वात गडचिरोली पोलीस दलाच्या विशेष अभियान पथकाच्या १४ तुकड्या तातडीने सदर भागात रवाना करण्यात आल्या. अत्यंत दुर्गम, डोंगराळ व घनदाट जंगल असलेल्या अबूझमाडच्या सदरील परिसरात अभियान राबविणे हे नेहमीच आव्हानात्मक असते. तरीदेखील पोलीस जवानांनी धैर्य, संयम आणि शिस्त यांचा परिचय देत अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत या अभियानाची सुरुवात केली.

**०४ फेब्रुवारी २०२६ या दिवशी पोलीस पथके जंगल परिसरात शोधमोहीम राबवत असताना दबा धरून बसलेल्या माओवाद्यांनी अचानक जवानांच्या दिशेने अंदाधुंद गोळीबार सुरू केला. या परिस्थितीत जवानांनी स्वसंरक्षणासाठी आणि प्रत्युत्तरादाखल माओवाद्यांच्या दिशेने अचूक गोळीबार केला. काही काळ चाललेल्या या चकमकीदरम्यान पोलीस पथकांनी माओवाद्यांचे दोन तळ उद्‌ध्वस्त केले व टनास्थळावरून मोठ्या प्रमाणावर माओवादी साहित्य जप्त केले.**

दिनांक ०४ फेब्रुवारी २०२६ या दिवशी पोलीस पथके जंगल परिसरात शोधमोहीम राबवत असताना दबा धरून बसलेल्या माओवाद्यांनी अचानक जवानांच्या दिशेने अंदाधुंद गोळीबार सुरू केला. या परिस्थितीत जवानांनी स्वसंरक्षणासाठी आणि प्रत्युत्तरादाखल माओवाद्यांच्या दिशेने अचूक गोळीबार केला. काही काळ चाललेल्या या चकमकीदरम्यान पोलीस पथकांनी माओवाद्यांचे दोन तळ उद्ध्वस्त केले व घटनास्थळावरून मोठ्या प्रमाणावर माओवादी साहित्य जप्त केले. मात्र परिसरातील अतिशय घनदाट जंगल, कठीण भूभाग आणि माओवाद्यांच्या हालचालींची पद्धत यांमुळे त्यावेळी माओवाद्यांचा थेट शोध लागणे शक्य झाले नाही. यानंतर ०५ फेब्रुवारी २०२६ रोजी अभियान अधिक तीव्र करण्याचा निर्णय घेण्यात आला. विशेष अभियान पथकाच्या अतिरिक्त चार तुकड्या तसेच सीआरपीएफच्या क्यूएटीचे




एक पथक या मोहिमेत सहभागी करण्यात आले. दिवसभर माओवादी व पोलीस यांच्या दरम्यान चकमकी होत राहिल्या. अशाच एका तीव्र चकमकीमध्ये पोलीस पथकांना घटनास्थळी तीन जहाल माओवाद्यांचे मृतदेह मिळाले. तसेच एक एके–४७ रायफल आणि एक एसएलआर रायफल अशी दोन अग्निशस्त्रे जप्त करण्यात आली. यामुळे परिसरात मोठ्या संख्येने माओवादी उपस्थित असल्याचे स्पष्ट झाले.

अभियान अखंडपणे सुरू ठेवत पोलीस पथकांनी परिसराची काटेकोर तपासणी सुरू ठेवली. दिनांक ०६ फेब्रुवारी २०२६ रोजी पुन्हा एकदा माओवादी आणि पोलीस यांच्यात चकमक झाली. या चकमकीनंतर घटनास्थळावरून आणखी चार जहाल माओवाद्यांचे मृतदेह हस्तगत करण्यात आले. अशा प्रकारे तीन दिवस चाललेल्या या कठीण आणि धाडसी अभियानादरम्यान एकूण सात माओवाद्यांना ठार करण्यात गडचिरोली पोलीस दलास यश मिळाले.

या चकमकीत ठार झालेल्या माओवाद्यांच्यामध्ये गडचिरोली विभागीय समितीचा प्रभारी, पश्चिम सबझोनल ब्युरोचा प्रभारी आणि कंपनी क्रमांक १० चा प्रभारी डीकेएसझेडसी प्रभाकर ऊर्फ रवी ऊर्फ प्रकालवीर ऊर्फ स्वामी ऊर्फ लोकेती चंदरराव (वय ५७ वर्षे, रा. कामारेड्डी, तेलंगाणा) याचा समावेश होता. प्रभाकर हा माओवादी संघटनेतील अत्यंत महत्त्वाचा आणि अनुभवी नेता मानला जात होता. त्याच्यावर महाराष्ट्र शासनाने २५ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. त्याच्याविरुद्ध चकमकी, खून, जाळपोळ आणि इतर अशा एकूण ११३ गंभीर गुन्ह्याची नोंद होती. त्याच्यासह कंपनी क्रमांक ०५ चा सीवायपीसी कमांडर पागू मोड्याम, पीपीसीएम अनिला ऊर्फ बुदरी कोवाची, स्पेशल प्लाटून कमांड एरिया पीपीसीएम/ कमांडर कामेश पदा, परालकोट दलमचा एसीएम भजनाथ ऊर्फ भिमा होळी तसेच मंगली कुरसाम आणि जोगी सोढी–मडावी या सदस्य पदावरील माओवाद्यांचा देखील या कारवाईत समावेश होता. या सर्व माओवाद्यांवर एकत्रितपणे महाराष्ट्र शासनाने ७१ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते.

सदर अभियानाच्या दरम्यान घटनास्थळावरून तीन एके–४७ रायफली, एक एसएलआर रायफल आणि एक ३०३ रायफल अशी एकूण पाच अग्निशस्त्रे जप्त करण्यात आली. याशिवाय १७३ जिवंत काडतुसे, सात मॅगझिन्स, तीन बीजीएल, दोन बंडल कॉर्टेक्स वायर, दहा जिलेटीन कांड्या तसेच मोठ्या प्रमाणावर माओवादी साहित्य व दैनंदिन वापराचे साहित्य देखील हस्तगत करण्यात आले.

या संपूर्ण अभियानादरम्यान गडचिरोली पोलीस दलातील जवानांनी अत्यंत धैर्याने आणि समर्पणवृत्तीने आपले कर्तव्य बजावले. मात्र या कारवाईत विशेष अभियान पथक, प्राणहिता येथील पोलीस अंमलदार दीपक चिन्ना मडावी हे दिनांक ०५ फेब्रुवारी २०२६ रोजी संध्याकाळी झालेल्या तीव्र गोळीबारात जखमी झाले. त्यांना तातडीने अबूझमाडच्या दुर्गम जंगलातून हेलिकॉप्टरच्या मदतीने बाहेर काढून उपजिल्हा रुग्णालय,

भामरागड येथे हलविण्यात आले. दुर्दैवाने उपचारादरम्यान त्यांना वीरमरण आले. त्यांच्या या सर्वोच्च बलिदानास गडचिरोली पोलीस दल सदैव कृतज्ञतेने स्मरणात ठेवेल. त्यांना दिनांक ०६ फेब्रुवारी २०२६ रोजी पोलीस मुख्यालय, गडचिरोली येथे शासकीय मानवंदना देऊन भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या चकमकीदरम्यान विशेष अभियान पथकातील जवान जोगा मडावी हे देखील जखमी झाले होते. त्यांना हेलिकॉप्टरच्या साहाय्याने गडचिरोली येथे उपचारासाठी आणण्यात आले असून सध्या त्यांची प्रकृती स्थिर आहे.

गेल्या काही वर्षांपासून गडचिरोली पोलीस दल सातत्याने माओवादाच्या विरोधात कारवाया राबवत आहे. सन २०२१ पासून आजपर्यंतच्या कालावधीत अशा कारवायांमधून ९९ कट्टर माओवादी ठार करण्यात आले आहेत. १४० माओवाद्यांना अटक करण्यात आली आहे. तसेच १५३ माओवाद्यांनी आत्मसमर्पण करून मुख्य प्रवाहात परतण्याचा मार्ग स्वीकारला आहे. यामुळे जिल्ह्यातील शांतता आणि विकास प्रक्रियेला गती मिळाली आहे.

या संपूर्ण अभियानात सी– ६० कमांडो आणि सीआरपीएफच्या जवानांनी दाखविलेल्या धैर्यपूर्ण कामगिरीचे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या एक्स अकाऊंटवरून कौतुक केले आहे.

**२०२१ पासून आजपर्यंतच्या कालावधीत अशा कारवायांमधून ९९ कट्टर माओवादी ठार करण्यात आले आहेत. १४० माओवाद्यांना अटक करण्यात आली आहे. तसेच १५३ माओवाद्यांनी आत्मसमर्पण करून मुख्य प्रवाहात परतण्याचा मार्ग स्वीकारला आहे. या संपूर्ण अभियानात सी- ६० कमांडो आणि सीआरपीएफच्या जवानांनी दाखविलेल्या धैर्यपूर्ण कामगिरीचे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या एक्स अकाऊंटवरून कौतुक केले आहे.**

### दहशतीच्या अनेक प्रतीकांवर घाव: जिल्ह्यातील ४४ माओवादी स्मारके एकाच दिवशी उद्ध्वस्त

गडचिरोली जिल्हा परिसरात माओवादी संघटनांनी सशस्त्र कारवाया करून तसेच मानसिक दहशत निर्माण करून आपले वर्चस्व टिकवण्याचा प्रयत्न केला. या दहशतीच्या प्रतीकांपैकी एक महत्त्वाचा भाग म्हणजे विविध दुर्गम गावांमध्ये उभारण्यात आलेली तथाकथित माओवादी स्मारके. या स्मारकांच्या माध्यमातून माओवादी संघटना स्थानिक नागरिकांच्या मनात भीती निर्माण करणे, स्वत:चे अस्तित्व आणि प्रभाव दर्शविणे तसेच नव्या सदस्यांना प्रेरित करणे या दृष्टीने प्रयत्न करत असत.

मात्र मागील काही वर्षांमध्ये गडचिरोली पोलीस दल, सी– ६० कमांडो, केंद्रीय राखीव पोलीस दल (सीआरपीएफ) तसेच इतर सुरक्षा यंत्रणांच्या समन्वित प्रयत्नांमुळे जिल्ह्यातील माओवादी चळवळ मोठ्या प्रमाणावर कमकुवत झाली आहे. अनेक भागांमधून माओवादी प्रभाव कमी झाला असून नागरिकांमध्ये आता प्रशासनाविषयी विश्वास वाढताना दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात अजूनही उभ्या असलेल्या माओवादी स्मारकांमुळे निर्माण होणारी मानसिक भीती पूर्णपणे दूर करण्याचा निर्णय घेण्यात आला. माओवाद्यांच्या दहशतीचे प्रतीक म्हणून उभ्या असलेल्या अशा सर्व स्मारकांविरुद्ध जिल्ह्यात व्यापक अभियान राबविण्यात आले. या अभियानाचा उद्देश केवळ स्मारके नष्ट करणे हा नसून जिल्ह्यातील स्थानिक नागरिकांना माओवाद्यांच्या दहशतीपासून पूर्णपणे मुक्त करून शांतता आणि सुरक्षिततेचे वातावरण दृढ करणे हा होता. दिनांक १८ फेब्रुवारी या दिवशी गडचिरोली पोलीस दलाच्या सी– ६० कमांडो, सीआरपीएफ तसेच जिल्हा पोलीस दलाच्या विविध पोलीस स्टेशन्स, उप पोलीस स्टेशन्स आणि पोलीस मदत केंद्रांमधील जवानांचा समावेश करून मोठ्या प्रमाणावर एकत्रित शोध अभियान राबविण्यात आले. या अभियानात एकूण १६ बीडीडीएस (bomb detection and disposal



squad) पथके, विशेष अभियान पथके, सीआरपीएफचे जवान तसेच जिल्हा पोलीस दलाचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. एकूण १८ पथकांमध्ये सुमारे ८०० जवानांनी जिल्ह्यातील विविध जंगल परिसरात समन्वयाने शोधमोहीम सुरू केली.

या शोधमोहिमेच्या दरम्यान जिल्ह्यातील विविध दुर्गम भागांमध्ये माओवाद्यांनी उभारलेली अनेक स्मारके निदर्शनास आली. सुरक्षेच्या दृष्टीने पराकोटीची दक्षता बाळगून बीडीडीएस पथकांनी प्रत्येक स्मारकाची आणि परिसराची कसून तपासणी केली, कारण अशा ठिकाणी स्फोटके किंवा सापळे लपविलेले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. संपूर्ण परिसर सुरक्षित असल्याची खात्री झाल्यानंतर जवानांनी नियोजनबद्ध पद्धतीने ही स्मारके उद्ध्वस्त करण्याची कारवाई केली. या व्यापक कारवाईदरम्यान जिल्ह्यातील एकूण १५ पोलीस स्टेशन्स, उप पोलीस स्टेशन्स आणि पोलीस मदत केंद्रांच्या हद्दीत असलेली एकूण ४४ माओवादी स्मारके एकाच दिवशी नष्ट करण्यात आली. यामध्ये एटापल्ली उपविभागातील १८, हेडरी उपविभागातील १७, भामरागड उपविभागातील ०५, जिमलगट्टा उपविभागातील ०२, धानोरा उपविभागातील ०१ आणि पेंढरी उपविभागातील ०१ अशा स्मारकांचा समावेश होता.

विशेष म्हणजे पेनगुंडा, कवंडे, तुमरकोठी, गर्देवाडा, वांगेतुरी आणि गट्टा (जां.) यांसारख्या माओवाद्यांचे





**Devendra Fadnavis** @Dev_Fadnavis · 18h

गडचिरोली जिल्ह्यातील नारायणपूर या सीमावर्ती भागात गेल्या 3 दिवसांपासून सुरू असलेल्या नक्षलविरोधी मोहिमेत आपल्या C-60 पथकाच्या बहाद्दर जवानांनी माओवाद्यांचे 2 तळ मोठ्या शौर्याने उद्ध्वस्त केले आहेत. या कारवाईत आतापर्यंत 7 माओवाद्यांचे मृतदेह आणि 5 अग्निशस्त्रे हस्तगत करण्यात यश आले आहे.
मात्र, दुर्दैवाने या अभियानादरम्यान माओवाद्यांचा मुकाबला करताना आमचे C 60 पथकातील वीर जवान दीपक चिन्ना मडावी हे गोळी लागून जखमी झाले होते. त्यांना तातडीने हेलिकॉप्टरच्या साहाय्याने बाहेर काढून भामरागड येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु डॉक्टरांच्या प्रयत्नांची शर्थ सुरु असतानाच त्यांना वीरमरण प्राप्त झाले.
राष्ट्राच्या सुरक्षिततेसाठी आणि माओवादाला समूळ उच्चाटनासाठी दीपक मडावी यांनी दिलेली ही सर्वोच्च आहुती आम्ही कधीही विसरणार नाही. त्यांचे हे बलिदान कदापि व्यर्थ जाणार नाही.
महाराष्ट्र पोलीस दल आणि शासन त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात पूर्णतः सहभागी आहे.
मी शहीद जवान दीपक चिन्ना मडावी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.
त्यांच्या कुटुंबीयांना राज्य सरकारची मदत आणि विविध लाभांसह एकूण ₹ 2.25 कोटी रुपये अर्थसहाय्य तसेच कुटुंबातील एका पात्र सदस्याला शासकीय नोकरी देण्यात येईल.

आश्रयस्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अतिदुर्गम गावांमध्येही ही कारवाई यशस्वीपणे पार पाडण्यात आली. या भागांमध्ये दीर्घकाळ माओवाद्यांचा प्रभाव असल्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. परंतु सुरक्षा दलांनी या ठिकाणी पोहोचून माओवादी स्मारके उद्ध्वस्त केल्याने नागरिकांच्या मनातील भीती कमी होण्यास मोठी मदत झाली.

ही स्मारके केवळ भौतिक रचना नसून माओवादी हिंसाचार, दहशत आणि भीतीचे प्रतीक होती. मात्र ही स्मारके नष्ट करून त्या मानसिक दहशतीलाच निर्णायक धक्का देण्यात आला आहे. या कारवाईमुळे परिसरातील ग्रामस्थांमध्ये सुरक्षिततेची भावना अधिक दृढ झाली असून पोलीस दल आणि प्रशासनाविषयी त्यांचा विश्वास वृद्धिंगत झाल्याचे दिसून येत आहे.

जिल्ह्यामध्ये कायमस्वरूपी शांतता प्रस्थापित करण्यासाठी आणि विकास प्रक्रियेला गती देण्यासाठी या माओवादविरोधी कारवायांसोबतच स्थानिक जनतेचा विश्वास संपादन करणे हे तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे एकीकडे माओवाद्यांविरुद्ध कठोर कारवाई सुरू ठेवत असताना दुसरीकडे आत्मसमर्पण, पुनर्वसन आणि विविध जनहितकारी उपक्रमांच्या माध्यमातून सामान्य नागरिकांना मुख्य प्रवाहात सामावून घेण्याचे प्रयत्न सातत्याने सुरू आहेत. जिल्ह्यातील माओवादी चळवळीची उर्वरित प्रतीकेदेखील पूर्णपणे नष्ट करून गडचिरोली जिल्हा शांतता, सुरक्षितता आणि विकासाच्या मार्गावर आणण्याचा निर्धार कायम ठेवण्यात आला आहे.

सदरचे हे माओवादविरोधी अभियान अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती) डॉ. श्री. छेरिंग दोरजे, विशेष पोलीस महानिरीक्षक (नक्षलविरोधी अभियान) नागपूर, श्री. संदिप पाटील, पोलीस उप महानिरीक्षक गडचिरोली परिक्षेत्र श्री. अंकित गोयल, पोलीस उप महानिरीक्षक (अभियान) सीआरपीएफ श्री. अजय कुमार शर्मा, अपर पोलीस अधीक्षक (अभियान) श्री. एम. रमेश, अपर पोलीस अधीक्षक, अहेरी श्री. कार्तिक मधिरा, अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) श्री. गोकुल राज जी, पोलीस उप अधीक्षक

(अभियान), श्री. विशाल नागरगोजे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी, भामरागड श्री. अमर मोहिते यांच्या नेतृत्वात सी–६० पथक, गडचिरोली/ प्राणहिता, आणि सीआरपीएफच्या जवानांनी यशस्वीपणे पार पाडले.

सदर माओवाद्यांच्या दहशतीचे प्रतीक असलेली स्मारके उद्ध्वस्त करण्यासाठी राबविण्यात आलेल्या मोहिमेच्या यशस्वीतेसाठी अपर पोलीस अधीक्षक (अभियान)श्री. एम. रमेश, अपर पोलीस अधीक्षक अहेरी, श्री. कार्तिक मधिरा, पोलीस उप अधीक्षक (अभियान) श्री. विशाल नागरगोजे व सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष अभियान पथक व पोलीस स्टेशन्स/ उप पोलीस स्टेशन्स/ पोलीस मदत केंद्रे येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. ■

**कविता**

# माझी आई

**भेट देवाजीची अनमोल लाभली मज माझी आई**
**ऋणानुबंध सात जन्मांचा कधी होऊ ग मी उतराई**
**रूप गुण अन माया ममता वसल्या आईच्या उदरात**
**किती चुका अन खोड्या घेते आई तिच्या पदरात**
**मागील ते आणून हातात देत असे आईच माझी सारे**
**दुःख त्रास पचवून स्वतः देते आम्हा सुखाचे वारे**
**आहे प्रेमळ तशी कठोर करते आम्हावर संस्कार**
**अमूल्य अशी शिकवण नसे तिला कधी अहंकार**
**मिळावी अशी आई सर्वा विनविते परमेश्वराला मी**
**बनेल विश्वच सुखी सदा देते आईच्या प्रेमाची हमी**
**सानेगुरुजी जिजाऊंची आहे शिष्या माझी आई**
**स्तोत्र आरत्या गीताईचे ज्ञान देते ती गात अंगाई**
**भूतमात्रांवर प्रेम करण्या शिकवले आईनेच आम्हा**
**रेशीम बंध सासर माहेरचे जोडता ना बाळगली तमा**
**कथा सांगून शिवरायांच्या पेरते मनामनात ती देश प्रेम**
**नको अन्याय करू कुणावर जरी शिकली ती जेमतेम**



**भारती सावंत**
**नवी मुंबई**



सुनिल पाटील
कोल्हापूर

आज सगळीकडे डिजिटल क्रांतीचा बोलबाला आहे. या क्रांतीचे जसे फायदे आहेत तसेच काही तोटेही आहेत. पुस्तकांचे डिजिटायझेशन झाल्यामुळे ती हाताळण्यास सोपी झाली आहेत. तसेच माहिती मिळण्यास लागणारा वेळही मोठ्या प्रमाणावर कमी झाला आहे. पण त्याच्या अतिवापरामुळे आरोग्याशी संबंधित समस्या माणसाला भेडसावण्याची शक्यता आहे. त्या समस्या कोणत्या याचे विवेचन सदर लेखात केले आहे.

### डिजिटलच्या महासागरात कागदी पुस्तकाचा दीपस्तंभ

# डिजिटल युगात फिजिकल पुस्तक वाचनाचे महत्त्व



आजचे २१ वे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे आणि 'डिजिटल क्रांती'चे युग आहे. हातातील स्मार्टफोन, टॅब्लेट, ई-बुक्स आणि किंडलच्या माध्यमातून हजारो पुस्तके एका क्लिकवर उपलब्ध आहेत. स्क्रीनच्या या वाढत्या प्रभावामुळे कागदी पुस्तकांचे युग संपले की काय? असा प्रश्न वारंवार उपस्थित केला जातो. मात्र सखोल अभ्यास केला असता असे दिसून येते, की डिजिटल वाचनाच्या तुलनेत भौतिक पुस्तक वाचण्याचे महत्त्व आजही अनन्यसाधारण आहे.

मानवाच्या ज्ञानप्रवासात पुस्तकांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे राहिले आहे. हजारो वर्षांच्या इतिहासात पुस्तकांनी

ज्ञान, संस्कृती, तत्त्वज्ञान, विज्ञान आणि अनुभव यांचा खजिना पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवला. प्राचीन काळातील हस्तलिखित ग्रंथांपासून ते मुद्रणयुगातील पुस्तके आणि आजच्या डिजिटल युगातील ई–बुक्स इथपर्यंत ज्ञानप्रसाराची साधने सतत बदलत राहिली. तथापि, डिजिटल तंत्रज्ञानाने जग व्यापले असले तरी कागदी पुस्तकांचे महत्त्व अजूनही कमी झालेले नाही. उलट माहितीच्या महासागरात दिशादर्शक दीपस्तंभाप्रमाणे कागदी पुस्तके मनुष्याला सखोल ज्ञान, एकाग्रता आणि बौद्धिक समृद्धी प्रदान करत आत.

आज इंटरनेट, मोबाईल, टॅब्लेट आणि संगणक यांच्या माध्यमातून ज्ञान काही क्षणांमध्ये उपलब्ध होते. Kindle, Google Play Books किंवा Apple Books यांसारख्या डिजिटल प्लॅटफॉर्म्समुळे हजारो पुस्तके एका छोट्या उपकरणात साठवता येतात. त्यामुळे अनेकांना वाटते, की कागदी पुस्तकांचा काळ संपत चालला आहे. परंतु प्रत्यक्षात पाहिले असता कागदी पुस्तक वाचनाचे अनेक असे फायदे आहेत, जे डिजिटल माध्यम पूर्णपणे देऊ शकत नाही. सर्वप्रथम, कागदी पुस्तक वाचनामुळे निर्माण होणारी एकाग्रता आणि सखोलता ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. डिजिटल माध्यमांवर वाचताना वाचकाचे लक्ष सतत विचलित होत राहते.



स्क्रीनवर वाचताना नोटिफिकेशन्स, जाहिराती, सोशल मीडियाचे संदेश आणि इतर ॲप्स यांमुळे वाचनात सातत्य राहत नाही. उदाहरणार्थ, Facebook, Instagram किंवा WhatsApp यांसारख्या ॲप्समुळे वाचनाचा प्रवाह वारंवार खंडित होतो. याउलट कागदी पुस्तक हातात घेतल्यावर वाचक पूर्णपणे त्या पुस्तकाच्या जगात प्रवेश करतो. पुस्तकाची पाने उलटताना, शब्दांचा प्रवाह अनुभवताना आणि कथानक किंवा विचारसरणीमध्ये रमून जाताना मनाची एकाग्रता वाढते.

दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे स्मरणशक्ती आणि आकलनशक्तीवर होणारा सकारात्मक परिणाम. अनेक संशोधनांनुसार कागदी पुस्तक वाचताना मेंदू शब्दांची रचना, पानावरील स्थान आणि वाचनाचा भौतिक अनुभव लक्षात ठेवतो. त्यामुळे माहिती अधिक काळ स्मरणात राहते. मात्र डिजिटल स्क्रीनवर वाचताना वाचन अधिक वेगाने होते, पण त्याची सखोल समज कमी असते. कागदी पुस्तक वाचनात वाचक हळूहळू वाचतो, विचार करतो, अधोरेखित करतो आणि टिपणे लिहितो. ही प्रक्रिया ज्ञान अधिक दृढ बनवते.

तिसरे म्हणजे डोळ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने कागदी पुस्तके अधिक सुरक्षित असतात. डिजिटल स्क्रीनमधून निघणाऱ्या निळ्या प्रकाशामुळे डोळ्यांवर ताण येतो. दीर्घकाळ मोबाईल किंवा संगणकावर वाचन केल्याने डोळ्यांमध्ये कोरडेपणा, थकवा आणि डोकेदुखी निर्माण होऊ शकते. आधुनिक वैद्यकीय संशोधनांमध्येही डिजिटल स्क्रीनचा अतिरेक डोळ्यांच्या आरोग्यासाठी हानिकारक असल्याचे स्पष्ट झाले

आहे. कागदी पुस्तक वाचताना मात्र असा प्रकाशाचा ताण नसतो. नैसर्गिक प्रकाशात किंवा साध्या दिव्याच्या प्रकाशात पुस्तक वाचणे डोळ्यांसाठी अधिक आरामदायी असते.

कागदी पुस्तक वाचनाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे भावनिक व सांस्कृतिक अनुभव. पुस्तक हातात घेण्याचा अनुभव, त्याचा सुगंध, कागदाची स्पर्शानुभूती आणि पानांची रचना या सर्व गोष्टी वाचकाला एक वेगळा आनंद देतात. पुस्तक म्हणजे केवळ माहितीचे साधन नसून एक सांस्कृतिक वस्तू आहे. घरातील पुस्तकांची कपाटे, वाचनालयातील शांत वातावरण आणि पुस्तकांच्या संगतीत घालवलेला वेळ हा मानवी संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. इतिहासातदेखील अनेक महान विचारवंत, तत्त्वज्ञ आणि लेखकांनी पुस्तकांच्या महत्त्वावर भर दिला आहे. उदाहरणार्थ, फ्रान्सिस बेकन यांनी म्हटले होते, की ''Reading maketh a full man.'' म्हणजेच वाचन माणसाला परिपूर्ण बनवते. तसेच महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या महान व्यक्तिमत्त्वांच्या जीवनातही पुस्तकांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे होते. त्यांच्या वैचारिक जडणघडणीत पुस्तकांनी मोठी भूमिका बजावली.

सर्जनशीलता, कल्पनाशक्तीच्या विकासासाठीही कागदी पुस्तके अत्यंत उपयुक्त ठरतात. डिजिटल माध्यमांमध्ये बहुतेक वेळा दृश्य, व्हिडिओ आणि जलद माहिती यांचा भर असतो. त्यामुळे वाचकाच्या कल्पनाशक्तीला कमी वाव मिळतो. कागदी पुस्तक वाचताना मात्र वाचक स्वतःच्या मनात पात्रांची प्रतिमा तयार करतो, घटनांची कल्पना करतो आणि लेखकाच्या विचारांशी संवाद साधतो. ही प्रक्रिया मेंदूच्या सर्जनशीलतेला चालना देते.

कागदी पुस्तक वाचनाचा सामाजिक आणि शैक्षणिक प्रभावही महत्त्वाचा आहे. शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक वाचनालये ही ज्ञानसंस्कृतीची केंद्रे आहेत. या ठिकाणी विद्यार्थ्यांना शांत वातावरणात अभ्यास करण्याची संधी मिळते. पुस्तकांच्या संगतीत वाढलेली पिढी अधिक विचारशील, विवेकी आणि सर्जनशील बनते. डिजिटल माध्यमांमध्ये माहितीचा वेग जरी जास्त असला, तरी त्यात अनेकदा अपूर्ण किंवा चुकीची माहिती असू शकते. कागदी पुस्तकांचे संपादन, पुनरावलोकन आणि प्रकाशन ही प्रक्रिया अधिक जबाबदार असते, त्यामुळे त्यातील माहिती अधिक विश्वासार्ह असते.

डिजिटल युगातील माणूस अनेकदा वेगवान जीवनशैलीत, माहितीच्या गर्दीत हरवून जातो. अशा वेळी कागदी पुस्तक हे शांततेचे, चिंतनाचे आणि आत्मसंवादाचे माध्यम ठरते. पुस्तक वाचताना माणूस स्वतःशी संवाद साधतो, विचारांच्या खोल प्रवाहात प्रवेश करतो आणि जीवनाबद्दलचा अधिक व्यापक दृष्टिकोन प्राप्त करतो.

आजच्या काळात डिजिटल माध्यमांचा उपयोग नाकारता येणार नाही. संशोधन, माहिती शोधणे आणि त्वरित संवाद यासाठी डिजिटल साधने अत्यंत उपयुक्त आहेत. परंतु त्याचवेळी कागदी पुस्तकांचे महत्त्व कायम राखणेही आवश्यक आहे. डिजिटल आणि फिजिकल या दोन्ही माध्यमांचा समतोल वापर करणे हीच आजच्या काळाची गरज आहे.

डिजिटल युगातील माणूस अनेकदा वेगवान जीवनशैलीत, माहितीच्या गर्दीत हरवून जातो. अशा वेळी कागदी पुस्तक हे शांततेचे, चिंतनाचे आणि आत्मसंवादाचे माध्यम ठरते. पुस्तक वाचताना माणूस स्वतःशी संवाद साधतो, विचारांच्या खोल प्रवाहात प्रवेश करतो आणि जीवनाबद्दलचा अधिक व्यापक दृष्टिकोन प्राप्त करतो.

अखेरीस असे म्हणता येईल, की डिजिटल तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले तरी कागदी पुस्तकांची जागा पूर्णपणे कोणीही घेऊ शकत नाही. कारण पुस्तक म्हणजे केवळ माहितीचा संग्रह नसून ते मानवी अनुभव, संस्कृती आणि ज्ञान व परंपरेचे जिवंत प्रतीक आहे. डिजिटलच्या झगमगाटातही कागदी पुस्तकाचा दिवा सतत प्रकाश देत

राहतो. म्हणूनच आजच्या पिढीने डिजिटल साधनांचा योग्य वापर करत असतानाच कागदी पुस्तक वाचनाची सवय जपली पाहिजे. कारण कागदी पुस्तक वाचणे म्हणजे केवळ ज्ञान मिळवणे नव्हे तर ती मन, बुद्धी आणि संस्कृती यांना समृद्ध करणारी एक जीवनप्रक्रिया आहे.

डिजिटलच्या जमान्यात भौतिक पुस्तके का श्रेष्ठ ठरतात, याची काही शास्त्रीय आणि मानसशास्त्रीय कारणे खालीलप्रमाणे आहेत:

### सखोल वाचन आणि एकाग्रता

डिजिटल साधनांवर वाचन करताना इंटरनेट, सोशल मीडिया नोटिफिकेशन्स किंवा जाहिरातींचे पॉप–अप्स सतत व्यत्यय आणतात. याउलट, हातात घेतलेले छापील पुस्तक वाचताना अशा कोणत्याही तांत्रिक अडथळ्याला जागा नसते. यामुळे वाचकाची एकाग्रता दीर्घकाळ टिकून राहाते आणि तो विषयाच्या खोलवरपर्यंत जाऊ शकतो. या प्रक्रियेला 'डीप रीडिंग' म्हणतात, जे वैचारिक प्रगल्भतेसाठी अनिवार्य आहे. डिजिटल वाचन सुरू असताना आलेल्या नोटिफिकेशन्स, सोशल मीडियाचे संदेश किंवा इतर जाहिरातींमुळे लक्ष विचलित होण्याची शक्यता जास्त असते. याउलट, हातात घेतलेले भौतिक पुस्तक वाचताना बाह्य जगाशी संपर्क तुटतो. संशोधनानुसार, कागदी पुस्तकामुळे वाचकाची एकाग्रता वाढते, ज्यामुळे विषयाचे आकलन खोलवर होते.

### मेंदूची ग्रहणक्षमता आणि स्मृती

अनेक मनोवैज्ञानिक प्रयोगांमधून असे सिद्ध झाले आहे, की स्क्रीनवर वाचलेल्या माहितीपेक्षा कागदावर वाचलेली माहिती मेंदू जास्त काळ लक्षात ठेवतो. पुस्तकाचा स्पर्श, पानांचा वास आणि प्रत्यक्ष पाने उलटण्याची क्रिया यामुळे मेंदूला एक प्रकारचे 'स्पेशल ओळखीचे' (Spatial recognition) संकेत मिळतात. एखादा विशिष्ट मजकूर पानावर डाव्या बाजूला होता की उजव्या हे मेंदूला चटकन आठवते. हे ई–बुक्सच्या बाबतीत घडत नाही.

### चांगले आकलन आणि स्मरणशक्ती–

अनेक संशोधनांतून असे सिद्ध झाले आहे, की स्क्रीनपेक्षा कागदावर वाचलेली माहिती मेंदू अधिक प्रभावीपणे ग्रहण करतो आणि ती जास्त काळ स्मरणात राहते. जेव्हा आपण प्रत्यक्ष पुस्तकाची पाने उलटतो तेव्हा आपल्या मेंदूमध्ये त्या माहितीचा एक विशिष्ट इंडेक्स किंवा नकाशा तयार होतो. डाव्या बाजूचे पान, उजव्या बाजूचा मजकूर आणि पानाची जाणीव यामुळे माहितीचे स्मरण होणे सोपे जाते.

### डोळ्यांना आराम आणि सुदृढ आरोग्य–

ई–बुक्स आणि टॅब्लेट्समधून बाहेर पडणाऱ्या निळ्या प्रकाशामुळे (Blue Light) डोळ्यांवर प्रचंड ताण येतो. त्यामुळे डोळे कोरडे होणे किंवा दृष्टी कमकुवत होणे अशा समस्या उद्भवतात. रात्रीच्या वेळी स्क्रीनवर वाचन केल्यामुळे 'मेलाटोनिन' या संप्रेरकावर परिणाम होऊन निद्रानाशाचा (Insomnia) त्रास होऊ शकतो. याउलट, फिजिकल पुस्तके डोळ्यांसाठी अत्यंत सुखद असतात आणि शांत झोप लागण्यास मदत करतात. डिजिटल स्क्रीनमधून बाहेर पडणारा ब्लू लाईट (Blue Light ) डोळ्यांना ताण देतो आणि डोळ्यांच्या कोरडेपणाला कारणीभूत ठरतो. यातही सर्वात महत्त्वाचे म्हणजे, रात्री झोपण्यापूर्वी स्क्रीनवर वाचन केल्याने शरीरातील 'मेलाटोनिन' या संप्रेरकाची निर्मिती मंदावते, ज्यामुळे झोपेवर विपरित परिणाम होतो. भौतिक पुस्तकांचे वाचन डोळ्यांना शांतता देते आणि रात्रीची झोप सुखावह करण्यास मदत करते.

### स्पर्शानुभव, गंध आणि भावनिक जवळीक–

पुस्तकाचा स्पर्श, पानांचा विशिष्ट वास आणि पुस्तक हातात धरण्याची भावना एक वेगळाच आनंद आणि मानसिक समाधान देते. हे समाधान कोणत्याही स्क्रीनवर मिळू शकत नाही. वाचकाला पुस्तकाशी एक प्रकारचे भावनिक नाते जाणवते, ज्यामुळे वाचनाचा अनुभव अधिक समृद्ध आणि चैतन्यदायी होतो. पुस्तकाचा स्पर्श, नवीन पुस्तकाचा सुवास आणि पाने उलटताना होणारा आवाज हा एक वेगळाच आनंद देणारा अनुभव असतो. पुस्तक केवळ माहितीचा स्रोत नसून ते एक

सजीव सोबती असल्यासारखे वाटते. भौतिक पुस्तके संग्रही ठेवण्यात एक प्रकारचा स्वाभिमान आणि समाधान असते, जे डिजिटल फाईल्समध्ये कधीही मिळू शकत नाही.

## संदर्भ शोधणे आणि टिपणे काढणे

अनेक अभ्यासक आणि लेखकांसाठी भौतिक पुस्तके ही संदर्भासाठी सोयीची ठरतात. पुस्तकाच्या कडेला पेन्सिलने टिपणे काढणे, महत्त्वाच्या ओळी अधोरेखित करणे किंवा विशिष्ट पानाची घडी घालणे ही प्रक्रिया अभ्यासाला गती देते. स्क्रीनवर हायलाईट करणे शक्य असले, तरी कागदावरील हस्तलिखिताचा प्रभाव शिकण्याच्या प्रक्रियेत जास्त परिणामकारक ठरतो.

## डिजिटल डीटॉक्स-

आजच्या काळात आपला जास्तीत जास्त वेळ स्क्रीनसमोर जातो. अशा वेळी पुस्तक वाचणे हे 'डिजिटल डीटॉक्स'चे उत्तम साधन ठरते. इंटरनेटच्या जगातून काही काळ बाहेर पडून स्वतःच्या विचारांशी नाते जोडण्यासाठी भौतिक पुस्तक हे एक सशक्त माध्यम आहे. आजच्या काळात आपला जास्तीत जास्त वेळ लॅपटॉप किंवा मोबाईलसमोर जातो, ज्यामुळे मानसिक थकवा आणि 'डिजिटल फटीग' निर्माण होतो. या डिजिटल व्यसनापासून दूर राहाण्यासाठी आणि स्वतःला रिफ्रेश करण्यासाठी पुस्तक वाचणे हा एक उत्तम मार्ग आहे. हे आपल्याला काही काळ आभासी जगातून बाहेर काढून वास्तवाशी आणि शांततेशी जोडते.

## माहितीचे कायमस्वरूपी जतन

डिजिटल जगातील माहिती कधीही एडिट, डिलीट किंवा बदलली जाऊ शकते. तांत्रिक बिघाडामुळे ई-बुकची फाईल नष्ट होऊ शकते. मात्र, छापील पुस्तकातील आशय हा कायमस्वरूपी असतो. तो ऐतिहासिक दस्तावेज म्हणून पिढ्यान्‌पिढ्या जतन केला जाऊ शकतो. एकदा छापलेले शब्द हे सत्याचा आणि ज्ञानाचा चिरंतन पुरावा ठरतात.

## वाचनसंस्कृती आणि समृद्ध ग्रंथालय

भौतिक पुस्तके ही केवळ माहितीचा स्रोत नसून ती आपल्या संस्कृतीचा आणि परंपरेचा भाग आहेत. आपल्या घरात असलेले एक छोटेसे वैयक्तिक ग्रंथालय हे केवळ घराची शोभा वाढवत नाही, तर ते घरातील पुढील पिढीवर वाचनाचे संस्कार करते. ग्रंथालयातील पुस्तकांचे अस्तित्व घरात एक वैचारिक आणि शैक्षणिक वातावरण निर्माण करते. एखाद्या व्यक्तीच्या घरातील ग्रंथसंग्रह हा त्या व्यक्तीच्या विचारांचा आणि संस्कृतीचा आरसा असतो. वाचनालय हे केवळ पुस्तके ठेवण्याचे ठिकाण नसून ते ज्ञानाचे मंदिर असते. पुढील पिढीला वाचनाची सवय लावण्यासाठी घरात भौतिक पुस्तके असणे अत्यंत प्रभावी ठरते. मुलांनी पालकांना पुस्तक वाचताना पाहणे, हे त्यांना वाचनाकडे आकर्षित करण्याचे सर्वात मोठे प्रोत्साहन असते.

## निष्कर्ष


डिजिटल पुस्तके प्रवासादरम्यान किंवा तातडीच्या माहितीसाठी उपयुक्त असू शकतात, परंतु ज्ञानाची साधना, मानसिक शांतता आणि बौद्धिक विकासासाठी भौतिक पुस्तकांना पर्याय नाही. तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले, तरी कागदाचा स्पर्श आणि शाईचा गंध यांच्यातून मिळणारे ज्ञान हे चिरंतन आहे. म्हणूनच, डिजिटलच्या या महासागरात आपल्या अस्तित्वाचे बेट सुरक्षित ठेवण्यासाठी भौतिक पुस्तक वाचण्याची सवय जोपासणे, ही आजच्या काळाची गरज आहे. डिजिटल साधने ही तात्पुरत्या सुविधेसाठी आणि प्रवासासाठी चांगली असू शकतात, परंतु खऱ्या अर्थाने ज्ञानाची साधना करण्यासाठी भौतिक पुस्तकांशिवाय कोणताही पर्याय नाही. बौद्धिक विकास, स्मरणशक्तीची सुधारणा आणि मानसिक शांततेसाठी 'कागदी पुस्तकांचे सोबती' होणे हेच आजच्या डिजिटल युगात आपले मानसिक आरोग्य जपण्याचे गुपित आहे. ■



सुरेश वांदिले
मुंबई

# आकडेमोडीचं शास्त्र आणि उत्कृष्ट संधी

**मोठ्या आयटी कंपन्या, कन्सल्टिंग फर्म्स, बँकिंग, एमएफसीजी आणि ॲनालिटिक्स कंपन्यांमध्ये तसेच रीसर्च ऑर्गनायझेशन्स, फार्मा कंपन्या, बायोटेक्नॉलॉजी आणि हेल्थकेअर ॲनालिटिक्स क्षेत्रे अशा विविध ठिकाणी उत्कृष्ट प्लेसमेंट संधी मिळण्यासाठी आजकाल सांख्यिकी आणि गणित या विषयातील शिक्षण/प्रशिक्षण उपयुक्त ठरत आहे. त्याचाच आढावा घेणारा लेख.**



इंडियन स्टॅटिस्टिकल इंस्टिट्यूट–आयएसआय (भारतीय सांख्यिकी संस्था) ही भारतातील सांख्यिकी आणि गणित या विषयातील शिक्षण/प्रशिक्षण देणारी सर्वोत्कृष्ट संस्था आहे. १९३१ साली प्रख्यात सांख्यिकीतज्ज्ञ प्रशांतचंद्र महालनोबिस यांनी तिची स्थापना केली. सुरुवातीला ही संस्था केवळ सांख्यिकी संशोधनासाठी होती, परंतु कालांतराने ती बहुज्ञानविषयक संशोधन केंद्र बनली. भारताची पहिली पंचवार्षिक योजना तयार करण्यात या संस्थेचा महत्त्वाचा वाटा होता.

या संस्थेचे मुख्य कॅम्पस सेंटर कोलकात्यात आहे, तर दिल्ली, बेंगळुरू, चेन्नई आणि तेजपूर येथे उपकेंद्रे आहेत. याशिवाय पुणे, मुंबई, हैदराबाद, वडोदरा, कोइंबतूर अशा




ठिकाणी औद्योगिक सल्ला व संशोधनासाठी शाखा कार्यालये कार्यरत आहेत.

या संस्थेत सांख्यिकी, गणित, डेटा सायन्स, क्वांटिटेटिव्ह इकॉनॉमिक्स, क्वालिटी कंट्रोल, ऑपरेशन्स रीसर्च या विषयांमध्ये पदवी, पदव्युत्तर आणि पीएचडी स्तरावरील अभ्यासक्रम चालवले जातात. सांख्यिकी, गुणवत्ता नियंत्रण, ऑपरेशन्स रीसर्च, कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सायन्स आणि अर्थशास्त्र या क्षेत्रांतील संशोधनात ही संस्था अग्रगण्य मानली जाते. भारत सरकारने या संस्थेला नॅशनल इंस्टिट्यूट ऑफ इम्पॉर्टन्सचा दर्जा दिला आहे.

अशा या अत्यंत प्रतिष्ठेच्या आणि महत्त्वाच्या शैक्षणिक संस्थेत मराठी मुले अभावानेच प्रवेशासाठी प्रयत्न करतात. त्यामुळे उच्च श्रेणीच्या अनेक करिअर संधींना ते मुकतात. ही बाब लक्षात घेऊन मराठी विद्यार्थ्यांनी या संस्थेत प्रवेशासाठी प्रयत्न करायला हवेत.

या संस्थेतील विविध अभ्यासक्रमांसाठी आयएसआय टेस्ट ही चाळणी परीक्षा घेतली जाते. यंदा ही परीक्षा दि. १० मे २०२६ रोजी देशभरातील विविध शहरांमध्ये घेतली जाईल. यामध्ये महाराष्ट्रातील मुंबई, नागपूर आणि पुणे या केंद्रांचा समावेश आहे.

### अभ्यासक्रम

**(१) बॅचलर ऑफ मॅथेमॅटिक्स (ऑनर्स)**

कालावधी– तीन वर्षे.

हा अभ्यासक्रम बेंगळुरु कॅम्पस येथे शिकवला जातो.

अर्हता– गणित आणि इंग्रजी या विषयांसह १२ वी विज्ञान परीक्षा उत्तीर्ण.

**(२) बॅचलर ऑफ स्टॅटिस्टिक्स (ऑनर्स)**

कालावधी– तीन वर्षे.

हा अभ्यासक्रम कोलकाता कॅम्पस येथे शिकवला जातो.

अर्हता– गणित आणि इंग्रजी या विषयांसह १२ वी विज्ञान परीक्षा उत्तीर्ण.

**(३) मास्टर ऑफ मॅथेमॅटिक्स (ऑनर्स)**

कालावधी– दोन वर्षे.

हा अभ्यासक्रम कोलकाता आणि दिल्ली कॅम्पस येथे शिकवला जातो.

अर्हता– गणित विषयासह

बीएससी परीक्षा उत्तीर्ण.

### (४) मास्टर ऑफ स्टॅटिस्टिक्स (ऑनर्स)

कालावधी– दोन वर्षे.

हा अभ्यासक्रम कोलकाता आणि दिल्ली कॅम्पस येथे शिकवला जातो.

अर्हता– गणित विषयासह बीएससी परीक्षा उत्तीर्ण.

## प्रवेश प्रक्रिया

बी. मॅथ./ बी. स्टॅट आणि एम. मॅथ/एम. स्टॅट या अभ्यासक्रमांना देशस्तरीय चाळणी परीक्षेद्वारे प्रवेश दिला जातो.

(१) बी. मॅथ./ बी. स्टॅट. या अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेसाठी दोन पेपर असतात. पहिला पेपर हा बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रकारचा असतो. दुसरा पेपर हा वर्णनात्मक असतो. या पेपरमधील प्रश्न १२ वी च्या गणितावर आधारित असतात.

(२) एम. स्टॅट. प्रवेशासाठीच्या पेपर मधील प्रश्न बीएससी स्टॅट (ऑनर्स) च्या स्तरावरील असतात. या पेपरमध्ये पहिल्या भागात सांख्यिकी आणि गणितावर आधारित बहुपर्यायी प्रश्न असतात,तर दुसऱ्या भागात लघुत्तरी प्रश्न असतात.

(३) एम. मॅथ. प्रवेशासाठीच्या पेपर मधील प्रश्न हे बीएससी मॅथ. (ऑनर्स) च्या स्तरावरील असतात. या पेपरमध्ये पहिल्या भागात गणितावर आधारित बहुपर्यायी प्रश्न असतात, तर दुसऱ्या भागात लघुत्तरी प्रश्न असतात.

गणित या विषयासह बीई किंवा बीटेक किंवा या संस्थेची बी. स्टॅटिस्टिक्स आणि बी. मॅथ. ही पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना एम. मॅथ. अभ्यासक्रमाला थेट प्रवेश दिला जातो.

इंटरनॅशनल मॅथेमॅटिकल ऑलिम्पियाड ट्रेनिंग कॅम्पसाठी निवड झालेल्या उमेदवारांना लेखी परीक्षेतून सूट देण्यात येते. या ऑलिम्पियाडचे आयोजन हे नॅशनल बोर्ड ऑफ हाय्यर मॅथेमॅटिक्स, डिपार्टमेन्ट ऑफ ॲटोमिक एनर्जी यांच्यामार्फत केले जाते. मात्र या उमेदवारांना इतर उमेदवारांसारखा अभ्यासक्रमासाठी अर्ज करावा लागतो. या उमदेवारांची अंतिम निवड मुलाखतीची प्रक्रिया पार पाडल्यानंतर केली जाते.

### (५) बॅचलर ऑफ स्टॅटिस्टिक्स ॲण्ड डेटा सायन्स (ऑनर्स)

हा अभ्यासक्रम यंदा (२०२६) च्या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात आला आहे.

कालावधी– चार वर्षे.

(इच्छुक विद्यार्थी या अभ्यासक्रमाचा कालावधी आणखी एक वर्षासाठी वाढवू शकतात. अशा विद्यार्थ्यांना इंटीग्रेटेड मास्टर्स डिग्री इन स्टॅटिस्टिकल डाटा सायन्स ही पदवी दिली जाते.)

हा अभ्यासक्रम कोलकता, बेंगळुरु आणि दिल्ली कॅम्पस येथे शिकवला जातो.

अर्हता– गणित किंवा उपयोजित गणित आणि इंग्रजी या विषयांसह १२ वी विज्ञान परीक्षा उत्तीर्ण. १२ वीमध्ये सरासरीने ७५ टक्के गुण मिळायला हवेत. राखीव संवर्गासाठी ६५ टक्के गुण मर्यादा.

या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी

- जेईई मेन २०२५,
- जेईई मेन २०२६,
- गणित आणि इंग्रजी हे विषय घेऊन दिलेली सीयुईटी युजी (कॉमन युनिव्हर्सिटी एन्ट्रस टेस्ट– अंडरग्रॅज्युएट) २०२५ किंवा २०२६

या परीक्षांमधील गुण ग्राह्य धरले जातील.

## शिष्यवृत्ती

(१) बी. मॅथ. – दरमहा ५ हजार रुपये आणि दरवर्षी पुस्तके व इतर शैक्षणिक खर्चासाठी ५ हजार रुपये.

(२) एम. मॅथ. – दरमहा ८ हजार रुपये आणि दरवर्षी पुस्तके व इतर शैक्षणिक खर्चासाठी ८ हजार रुपये.

## प्लेसमेंट

या संस्थेचे अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर विद्यार्थ्यांना पुढील ठिकाणी प्लेसमेंट्स मिळाल्या आहेत – अमेरिकन एक्सप्रेस, ॲक्सिस बँक, बीएआरसी इंडिया,

बीसीएस टेक्नॉलॉजी, ब्लॅक रॉक, बार्कलेज शेअर्ड सर्व्हिस, कॅपिटल वन, सिटी बँक, क्रिसिल, सिटी कॉर्पोरेशन, डेलॉइट, आयबीएम, आयसीआयसीआय, अर्न्स्ट ॲण्ड यंग, गोल्डमन सॅक्स, एचएसबीसी टेक्नॉलॉजी ॲण्ड सर्व्हिसेस, जे. पी. मॉर्गन, केपीएमजी, मॅकेन्झी, मीडिया नेट, मायक्रोसॉफ्ट, नोव्हार्टिस, निलसेन, पेट्राबाईट्स, रिलायन्स, सॅमसंग, स्टँडर्ड चार्टर्ड, टीसीएस ॲनालिटिक्स, टीसीएस इनोव्हेशन लॅब, युनायटेड हेल्थ ग्रुप, वॉलमार्ट

### इतर अभ्यासक्रम

(१) पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन स्टॅटिस्टिकल मेथड्स ॲण्ड ॲनालिटिक्स

या अभ्यासक्रमात सांख्यिकीचे मूलभूत सिद्धांत, डेटा ॲनालिटिक्स आणि संगणकीय कौशल्ये शिकवली जातात. यासाठी गणित विषयासह कोणत्याही शाखेतील पदवीधर, किंवा बीई/ बीटेक पदवीधर पात्र ठरतात. प्रवेश प्रक्रिया लेखी परीक्षा आणि मुलाखतीवर आधारित असते. हा एक वर्षाचा अभ्यासक्रम असून डेटा ॲनालिटिक्स, बँकिंग, वित्तीय संस्था आणि आयटी कंपन्यांमध्ये करिअर संधी उपलब्ध होतात.

(२) पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन ॲग्रिकल्चरल ॲण्ड रूरल मॅनेजमेंट

ग्रामीण विकास, कृषी व्यवस्थापन आणि सांख्यिकीचा वापर करून कृषी विषयक धोरणांची रूपरेषा ठरवण्यासाठी हा अभ्यासक्रम उपयुक्त ठरतो. कृषी, अर्थशास्त्र, व्यवस्थापन किंवा संबंधित शाखेतील पदवीधर यासाठी पात्र असतात. प्रवेश लेखी परीक्षा आणि मुलाखतीद्वारे होतो. हा एक वर्षाचा अभ्यासक्रम असून कृषी कंपन्या, ग्रामीण विकास संस्था, सरकारी प्रकल्प आणि अशासकीय संस्थांमध्ये संधी मिळतात.

(३) पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन बिझनेस ॲनालिटिक्स

हा संयुक्त अभ्यासक्रम आयआयटी खरगपूर आणि आयआयएम कोलकाता यांच्या सहकार्याने सुरू करण्यात आला आहे. व्यवसाय निर्णय प्रक्रियेत डेटा सायन्स, मशीन लर्निंग आणि सांख्यिकीच्या वापराचे तंत्र आणि कौशल्य या अभ्यासक्रमात शिकवले जातात. कोणत्याही शाखेतील पदवीधर यासाठी पात्र असतात, मात्र गणित/ सांख्यिकी/इंजिनिअरिंग पार्श्वभूमीला प्राधान्य दिले जाते. प्रवेशासाठी स्वतंत्र चाळणी परीक्षा आणि मुलाखत घेतली जाते. हा दोन वर्षांचा अभ्यासक्रम असून मोठ्या आयटी कंपन्या, कन्सल्टिंग फर्म्स, बँकिंग, एमएफसीजी आणि ॲनालिटिक्स कंपन्यांमध्ये उत्कृष्ट प्लेसमेंट संधी मिळतात.

(४)पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन स्टॅटिस्टिकल ॲण्ड कॉम्प्युटेशनल जिनॉमिक्स

सदर अभ्यासक्रमामध्ये जिनॉमिक्स (जनुकशास्त्र), बायो इन्फर्मेटिक्स (जैव माहितीशास्त्र) आणि सांख्यिकी या तीन विषयांचा समावेश आहे. जीवशास्त्र, बायोटेक्नॉलॉजी, बायोइन्फर्मेटिक्स, सांख्यिकी किंवा संगणकशास्त्रातील पदवीधर यासाठी पात्र असतात. प्रवेशासाठी लेखी परीक्षा आणि मुलाखत घेतली जाते. हा एक वर्षाचा अभ्यासक्रम असून रीसर्च ऑर्गनायझेशन्स, फार्मा कंपन्या, बायोटेक्नॉलॉजी आणि हेल्थकेअर ॲनालिटिक्स क्षेत्रे अशा विविध ठिकाणी करिअर संधी उपलब्ध होतात.

या सर्वच अभ्यासक्रमांची संरचना अशा पद्धतीने करण्यात आली आहे, की तो पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्याला गणित, सांख्यिकी, संगणकशास्त्र, गणितीय भौतिकशास्त्र या विषयांमध्ये उच्च शिक्षण घेता येणे सुलभ व्हावे. गणित विषयाचा ज्या ठिकाणी थेट उपयोग केला जातो, तिथे या विद्यार्थ्यांना तत्काळ करिअर संधी मिळते.

**संपर्क**

इंडियन स्टॅटिस्टिकल इंस्टिट्यूट, २०३, बराकपोर ट्रंक रोड, कोलकाता–७००१०८

**संकेतस्थळ**

https://www.isical.ac.in

**ईमेल**

admissionsupport@isical.ac.in

**दूरध्वनी:** ०३३–२५७५२५०४ ■

# प्रोजेक्ट त्रिनेत्र

## २३ पोलीस ठाणी, १८२९ सराईत गुन्हेगार, ५८५० एकूण गुन्हे नोंदी




### १. समस्या, प्रेरणा आणि दृष्टी

पोलिसिंगमधील सर्वात मोठी जागतिक समस्या गुन्हेगार कोण आहे याबद्दल माहिती नसणे ही नाही. माहीत असलेल्यांमधील कोण सद्यस्थितीत सर्वात धोकादायक आहे हे सांगणारी व्यवस्था नाही ही खरी समस्या आहे. अकोल्यात १,८२९ सवयीचे गुन्हेगार बहुतांश गुन्ह्यांसाठी जबाबदार होते. त्यांची नावे माहीत होती. पण त्यातील सर्वाधिक धोका कोणाकडून, हे सांगणारे शास्त्र नव्हते.

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक (IPS) यांनी एक मूलभूत प्रश्न विचारला : बँका कर्ज देताना गणिताचे मॉडेल वापरतात, वैद्यकीय क्षेत्रात ट्रायल असते. सायबर फ्रॉड AI ओळखतो – मग जीव–सुरक्षेचे निर्णय बँकेच्या कर्जमंजुरीपेक्षा कमी विश्लेषणावर का घेतले जातात?


Forbes 30 Under 30 विजेते आणि अकोल्याचे रहिवासी किशन पनपालिया यांनी तंत्रज्ञानाच्या बाजूने हाच प्रश्न मांडला. या दोन विचारांच्या संगमातून Project TRINETRA जन्मले – एक AI–सक्षम प्रतिबंधात्मक पोलिसिंग व्यवस्था.

## २. डेटा डिजिटायझेशन आणि TRINETRA प्लॅटफॉर्म

२०१५ ते२०२५ या दहा वर्षांचा, २३ ठाण्यांमधील संपूर्ण गुन्हेगारी डेटा चार स्तरांमध्ये डिजिटल केला गेला– ओळख (Identity), गुन्हे इतिहास (Criminal History), प्रतिबंधक कृती (Preventive Actions), आणि सामाजिक–आर्थिक माहिती (Socio-Economic Data).

५,८५०+ प्रकरणे एकाच एकीकृत व्यासपीठावर आली.

या डेटावर TRINETRA प्लॅटफॉर्म चालतो – SP कार्यालयापासून ते बीट ऑफिसरपर्यंत चार स्तरांवर प्रत्येक ठाण्याचे अधिकारी त्यांच्या गुन्हेगारांची RORS – आधारित यादी पाहतात, बुधवारी परेड हजेरी डिजिटल पद्धतीने नोंदवतात, आणि CRITICAL श्रेणीतील गुन्हेगाराने परेड चुकवली तर त्वरित सूचना मिळते.



## 3. RORS- Repeat Offender Risk Score आणि AI

- TRINETRA च्या केंद्रस्थानी आहे – ० ते १०० मधील एक गणिती क्रमांक जो प्रत्येक गुन्हेगाराची पुनर्गुन्ह्याची जोखीम दर्शवतो. हा गुन्हेगारी जगतातील CIBIL स्कोअर आहे– फक्त कर्जासाठी नाही, सुरक्षिततेसाठी.
- RORS पाच घटकांवर आधारित आहे:


तीव्रता (Severity–0.30), वारंवारता (Frequency-0.25), ताजेपणा (Recency-0.25), वाढ (Escalation-0.20), आणि लवकर प्रारंभ (Early Onset Multiplier).

Escalation हे TRINETRA चे सर्वात महत्त्वाचे नावीन्य – जर गुन्हेगार साध्या चोरीतून दरोड्याकडे जात असेल तर तो येत्या काळात आणखी गंभीर गुन्हा करेल हे गणित आधीच सांगते.

- स्कोअर फक्त वाढत नाही – तो कमी होतो.


गुन्हेमुक्त काळ (max 35% घट), बुधवारी परेड नियमित हजेरी (max 15% घट), आणि नोकरी–कुटुंब स्थिरता (max 10% घट) – या तीन घटकांमुळे स्कोअर कमी होतो. सुधारणेला बक्षीस मिळते.

- अंतिम RORS तीन AI मॉडेल्सच्या वर आधारित आहे: Deep learning - 40%, XGBoost - 35%, Random Forest - 25%. एकूण AUROC 0.847 - 84.7% अचकूता. जोखीम श्रेणी:CRITICAL(85-100): तत्काळ SP सूचना । HIGH (70-84): २४ तासांत आढावा । MEDIUM(40-69): द्विसाप्ताहिक तपासणी । LOW(40): मासिक देखरेख.





## ४. बुधवारी परेड – परंपरा आधुनिक बनली

महाराष्ट्र पोलिसांची बुधवारी परेड ही पारंपरिक व्यवस्था – इतिहास – पत्रकधारकांनी दर बुधवारी ठाण्यावर हजर व्हायचे. TRINETRA आधी हे कागदी सोपस्कार होते. आता प्रत्येक उपस्थिती–अनुपस्थिती तत्काळ RORS मध्ये अद्यतनित होते. गुन्हेगार हजर नाही तर तत्काळ सूचना. सलग पाच परेड हजेरी म्हणजे स्कोअरमध्ये सुधारणा. आतापर्यंत ५,०००+ परेड नोंदवल्या गेल्या असून आजही हे सुरूच आहे. देखरेखीत असल्याची जाणीव हाच सर्वात मोठा प्रतिबंध आहे.



### ५. परिणाम – आकड्यांमधील सत्य

हे परिणाम अधिक पोलिसिंगमुळे नाहीत – हुशार पोलिसिंगमुळे आहेत. त्याच अधिकाऱ्यांनी, त्याच संसाधनांनी, फक्त डेटाच्या मार्गदर्शनाने योग्य माणसांकडे लक्ष केंद्रित केले. प्रतिबंधक कारवाई: MP Act कलम 55-57-73, MPDA – 21, MCOCA– 1.




### ६. राष्ट्रीय मान्यता

SCOCH Award (राष्ट्रीय निवड): देशातील सर्वात प्रतिष्ठित outcome–based civic governance पुरस्कारासाठी अंतिम निवड. सोहळा २८ मार्च, सिल्व्हर ओक हॉल, इंडिया हॅबिटॅट सेंटर, नवी दिल्ली.

NCRB दिल्ली: AI based Predictive Policing Architecture म्हणून राष्ट्रीय समितीद्वारे विशेष दखल.

CM 150 Days Program : Digital Innovation श्रेणीत महाराष्ट्रात तृतीय.

All India Police Duty Meet (AIPDM) : महाराष्ट्र CID च्या नामांकनाने राज्याचे प्रतिनिधित्व; ex-DG श्रीमती रश्मि शुक्ला यांच्या नेतृत्वाखाली All India DG Meet मध्ये AI Projects संशोधन पेपरमध्ये सादर.

देशभरातील 20+ SP यांनी त्यांच्या जिल्ह्यात राबवण्यात स्वारस्य दाखवले.

### ७. समारोप – अकोला पुरावा, भारत संधी

TRINETRA एका साध्या सत्यातून जन्मले: त्याच लोकांनी वारंवार गुन्हे करत राहणे आणि आपण ते थांबवू शकत नाही – हे स्वीकारायला आपण तयार नाही. पोलीस अधीक्षक श्री. चांडक यांनी प्रश्न उपस्थित केला, किशन पनपालिया यांनी उत्तर शोधले, आणि अकोल्याच्या अधिकाऱ्यांनी ते प्रत्यक्षात उतरवले.

'पारंपरिक पोलिसिंगला दोन डोळे होते– अनुभव आणि स्मृती. TRINETRA ने त्याला तिसरा डोळा दिला – डेटा, गणित आणि AI. अकोला पुरावा आहे. महाराष्ट्र आणि भारत संधी आहे.' ■



डॉ. अनिल शर्मा
बॉम्बे हॉस्पिटल, मुंबई

# पेट्रोकेमिकल्स : आजारांचे नवे द्वार



गोष्ट तशी खूप जुनी नाही. १९९१ मध्ये आखाती युद्धादरम्यान माघार घेणाऱ्या सैन्यदलांनी कुवेतमधील शेकडो तेलविहिरींना आग लावली. अनेक महिने जळणाऱ्या पेट्रोलियम आणि कच्च्या तेलातून निर्माण होणारा दाट काळा धूर आकाशात पसरत राहिला आणि संपूर्ण प्रदेशावर काळे सावट फैलावत राहिला. काही वर्षांनंतर जेव्हा शास्त्रज्ञांनी त्याच्या परिणामांचा अभ्यास केला, तेव्हा त्याचे आरोग्यावर होणारे दीर्घकालीन परिणाम समोर येऊ लागले. श्वसनरोगांचे वाढते प्रमाण, हृदयविकार, आणि कर्करोगाच्या धोक्यात वाढ. ही घटना त्या सुरुवातीच्या


मोठ्या उदाहरणांपैकी एक होती, ज्यामुळे जगाला हे जाणवले की पेट्रोकेमिकल पदार्थांपासून तयार होणारी उपउत्पादने किंवा बायप्रॉडक्ट्स हे फक्त औद्योगिक प्रदूषण करण्यास कारणीभूत नाहीत, तर मानवी आरोग्यासाठीही गंभीर स्वरूपाचे धोके निर्माण करू शकतात.

गेल्या अनेक दशकांपासून यावर संशोधन सुरू आहे आणि त्यातून मिळालेल्या वैज्ञानिक पुराव्यांनी या इशाऱ्याला अधिक बळकट केले आहे. जागतिक आरोग्य संघटनेची कर्करोग संशोधन शाखा असलेल्या इंटरनॅशनल एजन्सी फॉर रीसर्च ऑन कॅन्सर (IARC) ने पेट्रोलियमशी संबंधित विविध प्रकारच्या घटकांना ग्रुप–१ कार्सिनोजेन म्हणून वर्गीकृत केले आहे. उदाहरणार्थ, गॅसोलीन इंजिनमधून निघणारे उत्सर्जन आणि पेट्रोकेमिकल ज्वलनातून निर्माण होणारे पदार्थ. याचा अर्थ असा, की हे पदार्थ मानवामध्ये कर्करोग निर्माण करतात हे सिद्ध झाले आहे. या उत्सर्जक पदार्थांमध्ये बेन्झीन, पॉलिसायक्लिक ॲरोमॅटिक हायड्रोकार्बन्स (PAHs) आणि इतर विषारी रसायने यांचा समावेश होतो, जी आपल्या डीएनएला हानी पोहोचवतात आणि ट्यूमर तयार होण्याच्या प्रक्रियेला चालना देतात. जीवाश्म इंधनांच्या ज्वलनामुळे निर्माण होणारे सूक्ष्म कण (फाइन पार्टिक्युलेट मॅटर) आणि विषारी वायू शरीरात मोठ्या प्रमाणावर दाह निर्माण करून ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेस वाढवतात. तसेच यामुळे रक्तवाहिन्यांच्या आतील बाजूला असलेले आवरण खराब झाल्याने धमनीकाठिण्य, रक्तवाहिन्यांमध्ये मेदाचा संचय होऊन त्या अरुंद बनणे या समस्या उद्भवतात.



याचे परिणाम गंभीर असू शकतात. यामुळे हृदयविकाराचा झटका, पक्षाघात, हार्ट फेल्युअर आणि अनियमित ठोके यांचा धोका वाढतो. अनेकदा संशोधन असेही सूचित करते की दीर्घकाळ प्रदूषित हवेच्या संपर्कात राहणे हे हृदयाच्या आरोग्यासाठी धूम्रपान किंवा मधुमेह यांच्यासारख्या पारंपरिक जोखमीच्या घटकांइतकेच धोकादायक ठरू शकते.

प्रत्यक्षात, व्यक्तीला असलेला हृदयविकारांचा एकूण धोका हा तिचा प्रदूषित पर्यावरणाशी कितपत संपर्क आहे आणि जीवनशैलीशी संबंधित जोखमीचे घटक किती आहेत या दोन्ही घटकांवर अवलंबून असतो. अमेरिकन हार्ट असोसिएशनने अनेक पुराव्यांच्या आधारे बदलता येऊ शकणारे असे जोखीम घटक निश्चित केले आहेत, जे जगभरातील हृदयविकारांच्या वाढलेल्या प्रमाणास जबाबदार



आहेत. यामध्ये धूम्रपान, उच्च रक्तदाब, डिस्लिपिडेमिया, मधुमेह, स्थूलता, निष्क्रिय जीवनशैली आणि अयोग्य पद्धतीचा आहार यांचा समावेश होतो.

तथापि, व्यक्ती ज्याप्रमाणे आपल्या जीवनशैलीशी संबंधित असलेल्या जोखीम घटकांवर नियंत्रण ठेवू शकते, तसे इतर घटकांचे नाही. किंबहुना प्रदूषित हवा यांसारखे धोकादायक पर्यावरणीय घटक बहुतेक वेळा वैयक्तिक नियंत्रणाबाहेरच असतात. वेगाने शहरीकरण होत असलेल्या अनेक परिसरांमध्ये पेट्रोकेमिकल द्रव्यांचे उत्सर्जन आणि वाहनांचा धूर हे पारंपरिक जोखमीच्या घटकांच्या व्यतिरिक्त हृदयविकाराचा अदृश्य धोका निर्माण करतात.

म्हणूनच दरवर्षी ७ एप्रिल रोजी साजरा केला जाणारा जागतिक आरोग्य दिन, जो जागतिक आरोग्य संघटनेच्या नेतृत्वाखाली पाळला जातो, आज पूर्वीपेक्षा अधिक महत्त्वाचा ठरला आहे.

जागतिक आरोग्य दिन २०२६ ची थीम आहे 'Together for Health: Stand with Science.' ही मोहीम वैज्ञानिक सहकार्य आणि पुराव्यावर आधारित धोरणांच्या शक्तीवर भर देते, ज्यामुळे मानव, प्राणी, वनस्पती आणि संपूर्ण पृथ्वीच्या आरोग्याचे संरक्षण करता येईल.

शेवटी, एक निरोगी विश्व आणि निरोगी मानवसमाज निर्माण करणे हे केवळ सामूहिक प्रयत्नांद्वारे आणि विज्ञानाधारित निर्णयांद्वारेच शक्य आहे. ■

लेख



संजीवनी भिंगारे
कोल्हापूर

# पालक आणि मुलांमधील सुसंवाद: काळाची गरज

'आजकाल घरातील संवाद हरवत चालला आहे,' हे वाक्य अनेकदा कानावर पडते. या पार्श्वभूमीवर सातत्याने संवाद सुरू ठेवणे आवश्यक आहे. पालक आणि मुलांमध्ये व्यवस्थित संवाद झाला नाही तर त्याचे काय परिणाम होऊ शकतात? हा संवाद व्यवस्थित होण्यासाठी काय करावे? याची माहिती देणारा लेख.

भारतात कुटुंब ही सर्वात प्रभावी संस्था मानली जाते. कुटुंबामध्येच व्यक्तीचे बालपण व्यतीत होते. या अवस्थेतच संस्कारांची बीजे रोवली जातात. तसेच जीवनमूल्यांची पायाभरणी होते. या संपूर्ण प्रक्रियेत पालक आणि मुलांमधील संवाद हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा असतो.

संवाद म्हणजे केवळ बोलणे नव्हे, तर एकमेकांचे विचार, भावना, अपेक्षा आणि अनुभव समजून घेणे यांचाही समावेश या प्रक्रियेत होतो. आजच्या वेगवान आणि तंत्रज्ञानप्रधान युगात हा संवाद कमी होत चालला आहे. त्यामुळेच पालक आणि मुलांमधील संवाद ही आजच्या काळातील अत्यंत महत्त्वाची सामाजिक गरज ठरली आहे. पूर्वी कुटुंबातील सदस्य एकत्र राहायचे, एकत्र जेवायचे आणि दिवसातील अनेक क्षण परस्परांच्या सहवासात घालवायचे. त्यामुळे संवाद नैसर्गिकरित्या घडत असे. परंतु आधुनिक जीवनशैलीत परिस्थिती मोठ्या प्रमाणावर बदलली



आहे. शहरातील धकाधकीचे जीवन, कामाचा वाढलेला ताण, शिक्षणाची स्पर्धा आणि तंत्रज्ञानाचा अतिरेक या कारणांमुळे पालक आणि मुलांमध्ये भावनिक अंतर निर्माण होऊ लागले आहे. अनेकदा घरांमध्ये एकाच छताखाली राहूनही संवादाचा अभाव दिसून येतो. आज अनेक मुलांचे बालपण मोबाईल, संगणक आणि इंटरनेटच्या सहवासात जात आहे. युट्यूब, इन्स्टाग्राम आणि व्हॉट्सअ‍ॅप यांच्यासारख्या डिजिटल माध्यमांमुळे माहिती आणि मनोरंजन सहज उपलब्ध झाले असले, तरी त्याचा अतिरेक मानवी संवादात बाधा आणतो. मुले त्यांच्या समस्या, भावना किंवा शंका पालकांशी शेअर करण्याऐवजी अनेकदा डिजिटल जगात हरवून जातात. परिणामी, कुटुंबातील भावनिक नातेसंबंध कमकुवत होण्याचा धोका निर्माण होतो.

पालक आणि मुलांमधील सुसंवादाचा पहिला आणि सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे विश्वास. जेव्हा मुलांना वाटते, की पालकांना त्यांच्या भावना समजून घ्यायच्या आहेत तेव्हा मुलांचा विश्वास वाढतो. विश्वासाच्या या नात्यामुळे मुलांना आपल्या समस्या आणि अनुभव पालकांसोबत मोकळेपणाने मांडण्याचे धैर्य मिळते.

पालक आणि मुलांमधील सुसंवादाचा पहिला आणि सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे विश्वास. जेव्हा मुलांना वाटते, की पालकांना त्यांच्या भावना समजून घ्यायच्या आहेत तेव्हा मुलांचा विश्वास वाढतो.

दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे ऐकण्याची कला. अनेक वेळा पालक मुलांना सल्ला देण्यास किंवा सूचना देण्यास तत्पर असतात, पण मुलांचे म्हणणे शांतपणे ऐकण्याची सवय कमी असते. सुसंवादासाठी बोलण्याइतकेच ऐकणेही आवश्यक आहे. मुलांचे विचार, त्यांची भीती, त्यांचे आनंद आणि त्यांच्या समस्या समजून घेण्यासाठी पालकांनी संयमाने ऐकले पाहिजे. जेव्हा मुलांना असे वाटते, की त्यांचे मत महत्त्वाचे आहे आणि ते घरात ऐकले जात आहे तेव्हा त्यांचा आत्मविश्वास वाढतो.

पालक आणि मुलांमधील सुसंवादाचा शैक्षणिक आणि बौद्धिक विकासावरही मोठा परिणाम होतो. जे पालक मुलांच्या शिक्षणात रस घेतात, त्यांच्या अभ्यासाबद्दल चर्चा करतात आणि त्यांच्या जिज्ञासेला प्रोत्साहन देतात, त्या मुलांचा बौद्धिक विकास अधिक चांगल्या प्रकारे होतो. अशा वातावरणात वाढलेली मुले प्रश्न विचारायला घाबरत नाहीत आणि नव्या कल्पनांचा शोध घेण्यास उत्सुक असतात. याशिवाय, सुसंवादाचा भावनिक आरोग्यावरही सकारात्मक प्रभाव पडतो. बालपण आणि किशोरावस्था या व्यक्तिमत्त्व घडण्यासाठीच्या अत्यंत संवेदनशील अवस्था असतात. या काळात मुलांना मार्गदर्शन, आधार आणि प्रेम यांची गरज असते. जर पालक मुलांशी नियमित संवाद साधत असतील, त्यांच्या भावना समजून घेत असतील आणि योग्य मार्गदर्शन करत असतील, तर मुलांमध्ये आत्मविश्वास, संयम आणि सकारात्मक दृष्टिकोन विकसित होतो.

इतिहासातदेखील अनेक महान विचारवंतांनी कुटुंबातील संवादाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. उदाहरणार्थ, Jean-Jacques Rousseau, Maria Montessori या विचारवंतांच्या मतांनुसार बालकाचा सर्वांगीण विकास हा प्रेम, समजूतदारपणा आणि संवाद यांच्यावर आधारित असतो. आजच्या काळात सुसंवादाची गरज आणखी वाढली आहे, कारण समाजात अनेक नवीन आव्हाने निर्माण झाली आहेत. इंटरनेटवरील माहितीचा प्रचंड ओघ, सामाजिक दबाव, स्पर्धात्मक शिक्षणपद्धती आणि मानसिक ताण या सर्वांचा वाढता प्रभाव या परिस्थितीत पालकांनी मुलांसाठी विश्वासार्ह मार्गदर्शक बनणे आवश्यक आहे. मुलांना योग्य–अयोग्य याची जाणीव करून देण्यासाठी संवाद हा सर्वात प्रभावी मार्ग ठरतो.

सुसंवाद वाढवण्यासाठी काही साधे, पण परिणामकारक उपायही आहेत. कुटुंबातील सदस्यांनी दररोज काही वेळ एकत्र घालवणे, एकत्र जेवण करणे, दिवसभरातील अनुभवांवर चर्चा करणे आणि एकमेकांच्या आवडी–निवडी जाणून घेणे यांमुळे नात्यातील जवळीक वाढते. पालकांनी मुलांवर अतिरेकी नियंत्रण ठेवण्याऐवजी त्यांना योग्य स्वातंत्र्य दिले पाहिजे. त्याचवेळी मुलांनीही पालकांचा आदर राखत आपले विचार मांडण्याची सवय विकसित केली पाहिजे. पालक आणि मुलांमधील सुसंवाद हा केवळ कुटुंबापुरता मर्यादित नसून समाजाच्या आरोग्यासाठीही अत्यंत महत्त्वाचा आहे. ज्या कुटुंबांमध्ये संवादाचे वातावरण सकारात्मक असते, त्या कुटुंबातील मुले अधिक जबाबदार, संवेदनशील आणि सामाजिकदृष्ट्या सजग बनतात. अशा व्यक्ती समाजाच्या प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावतात. अखेरीस असे म्हणता येईल, की पालक आणि मुलांमधील सुसंवाद हा नात्यांचा सेतू आहे. या सेतूमुळे पिढ्यांमधील अंतर कमी होते, विश्वास दृढ होतो आणि कुटुंबातील प्रेम अधिक गहिरे बनते. आधुनिक जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी हा संवाद अत्यंत आवश्यक आहे. म्हणूनच प्रत्येक कुटुंबाने हे लक्षात ठेवले पाहिजे, की मुलांच्या संगोपनात केवळ शिक्षण, शिस्त किंवा सुविधा पुरेशा नसतात; तर त्यासाठी प्रेमळ संवाद, समजूतदारपणा आणि परस्परांचा आदर आवश्यक असतो. ज्या घरात संवाद जिवंत असतो, त्या घरातील नातीही जिवंत राहातात. आजच्या काळात मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी सुसंवाद ही केवळ गरज नसून ते एक अनिवार्य कर्तव्य ठरले आहे.

### १. सुसंवाद म्हणजे नक्की काय?

बऱ्याचदा पालकांना वाटते, की मुलांशी बोलणे, त्यांना सूचना देणे किंवा त्यांच्या अभ्यासाची चौकशी करणे म्हणजे संवाद. परंतु सुसंवाद ही दुहेरी प्रक्रिया आहे. यात केवळ पालकांनी बोलणे अपेक्षित नाही, तर मुलांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे, त्यांच्या भावना समजून घेणे आणि त्यांना सुरक्षिततेची जाणीव करून देणे याचा समावेश होतो. अनेकदा मुलांना फक्त आपले म्हणणे कोणीतरी समजून घ्यावे अशी अपेक्षा असते. ही अपेक्षा पूर्ण झाली तर पालक आणि मुलांमधील नाते अधिक दृढ होते.

### २. डिजिटल युगाचे आव्हान आणि वाढते अंतर

स्मार्टफोन आणि सोशल मीडियाच्या आक्रमणामुळे एकाच घरात राहूनही व्यक्ती एकमेकांपासून मैलोन्मैल दूर गेल्या आहेत. मुले मोबाईल गेम्स किंवा युट्यूबमध्ये मग्न असतात, तर पालक ऑफिसच्या कामात किंवा सोशल मीडियावर व्यस्त असतात. या डिजिटल वॉलमुळे मुलांच्या मनात काय चालले आहे, हे पालकांपर्यंत पोहोचतच नाही. यामुळे मुलांमध्ये एकटेपणा, चिडचिड आणि नैराश्याची लक्षणे दिसू लागतात.

### ३. सुसंवादाचे मानसिक आणि भावनिक फायदे

आत्मविश्वास वाढतो: ज्या मुलांशी पालक नियमित संवाद साधतात, त्या मुलांचा आत्मविश्वास दांडगा असतो. त्यांना खात्री असते, की आपले पालक आपल्याला समजून घेतील.

नकारात्मक विचारांपासून संरक्षण: जेव्हा मुले पालकांशी मोकळेपणाने बोलतात, तेव्हा ती बाहेरच्या जगातील चुकीच्या गोष्टींना किंवा व्यसनांना बळी पडण्याची शक्यता कमी असते.

बौद्धिक विकास: संवादातून मुलांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळतो. पालकांचे अनुभव आणि मुलांचे प्रश्न यांच्या देवाणघेवाणीतून मुलांची विचार करण्याची पद्धत प्रगल्भ होते.

### ४. सुसंवाद कसा साधावा?

प्रभावी मार्ग म्हणजे सक्षम श्रोता बना: जेव्हा मुले काही सांगत असतील, तेव्हा हातातला मोबाईल बाजूला ठेवून त्यांच्या डोळ्यांत डोळे घालून त्यांचे म्हणणे ऐका. त्यांना जाणवू द्या, की त्यांचे बोलणे तुमच्यासाठी महत्त्वाचे आहे. टीका करणे टाळा: मुले जेव्हा काही चूक कबूल करतात, तेव्हा



लगेच ओरडण्याऐवजी ती चूक का झाली, हे त्यांना समजून सांगा. सततच्या टीकेमुळे मुले संवाद तोडून टाकतात.

**क्वालिटी टाईम निश्चित करा:** दिवसातील किमान १ तास असा असावा, ज्यात कोणतेही गॅजेट नसेल. रात्रीचे जेवण एकत्र करणे किंवा एकत्र फिरायला जाणे हे संवादाचे उत्तम निमित्त ठरू शकते.

**मित्रासारखे नाते जपा:** मुले जशी मोठी होतात, तसे पालकांनी पालक या भूमिकेतून बाहेर पडून मित्र बनणे गरजेचे असते. त्यांच्या आवडीनिवडी, मित्र-मैत्रिणी आणि सोशल मीडियावरील त्यांचे जग याबद्दल कुतूहलाने जाणून घ्या.

### ५. सुसंवादाचा अभाव आणि त्याचे दुष्परिणाम:

जर पालक आणि मुलांमध्ये संवाद नसेल, तर मुले चुकीच्या मार्गाला लागण्याची शक्यता असते. इंटरनेटवर मिळणारी अपुरी माहिती, चुकीची संगत आणि भावनिक आधाराची कमतरता यांमुळे मुलांमध्ये गुन्हेगारी प्रवृत्ती किंवा मानसिक आजार बळावू शकतात. अनेकदा संवाद नसल्यामुळे मुले स्वतःच्या समस्या स्वतःतच दडवून ठेवतात, ज्याचे रूपांतर पुढे मोठ्या संकटात होऊ शकते.

### ६. पालकांसाठी काही महत्त्वाचे कानमंत्र:

- मुलांशी तुलना करणे थांबवा. प्रत्येक मूल वेगळे असते. त्यांच्या यशाचे कौतुक कराच, पण अपयशातही त्यांच्या पाठीशी उभे राहा.
- घरात लोकशाहीचे वातावरण ठेवा, जिथे मुलांना आपली मते मांडण्याचे स्वातंत्र्य असेल.
- आज काळाची पाऊले ओळखण्याची गरज निर्माण झाली आहे. आभासी जगाच्या विळख्यामुळे सजग पालकत्व अंगिकारणे आवश्यक आहे. आजच्या डिजिटल युगात मुलांच्या हातातले स्मार्टफोन हे केवळ मनोरंजनाचे साधन उरले नसून ते त्यांच्यासाठी एक समांतर जग बनले आहे. अभ्यासापासून छंदापर्यंत सर्व गोष्टी ऑनलाईन झाल्या असल्या तरी या आभासी जगातील मुलांच्या वावरावर पालकांचे बारीक लक्ष असणे अनिवार्य बनले आहे.

**६.१ गेमिंगचे जग:** मुले कोणता गेम खेळतात, हे बघणे पालकांचे प्राथमिक कर्तव्य आहे. अनेक गेम्समध्ये हिंसेचे उदात्तीकरण केलेले असते किंवा इन-गेम चॅटिंगद्वारे मुले अनोळखी व्यक्तींच्या संपर्कात येतात. या परिस्थितीत पालकांनी काय करावे, तर मुलांच्या गेमचे एज रेटिंग तपासावे. तो गेम मुलाच्या मानसिकतेवर काय परिणाम करतोय हे त्याच्या वागण्यातील बदलांवरून ओळखावे.

**६.२ सोशल मीडिया:** मुले

सोशल मीडियावर काय शेअर करतात, कोणाशी मैत्री करतात आणि कोणत्या प्रकारच्या पोस्टवर प्रतिक्रिया देतात, यावर पालकांची नजर असायला हवी. सायबर बुलिंग किंवा ऑनलाईन ग्रूमिंग यांसारख्या संकटांना मुले बळी पडण्याची शक्यता असते. स्वतःचे फोटो किंवा वैयक्तिक माहिती सार्वजनिक करणे भविष्यात धोक्याचे ठरू शकते याची जाणीव त्यांना करून देणे आवश्यक आहे.

### ६.३ मोबाईलचा वापर:

मोबाईलचा वापर नक्की शिक्षणासाठी की विरंगुळ्यासाठी अर्थात कोणत्या कामासाठी होतोय, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. अभ्यासाच्या नावाखाली मुले तासनतास रील्स किंवा विनाकारण सर्फिंग करत नाहीत ना, याकडे लक्ष द्यावे. स्क्रीन टाईम मर्यादित ठेवणे हे शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी महत्त्वाचे आहे.

### ६.४ 'वॉचमन' नव्हे, 'मेंटॉर' बना:

या संपूर्ण प्रक्रियेत पालकांची भूमिका महत्त्वाची आहे. पालकांची नजर असणे म्हणजे मुलांवर संशय घेणे किंवा त्यांच्या खासगी आयुष्यात सतत हस्तक्षेप करणे नव्हे. पालकांनी मुलांच्या डिजिटल जगात पोलीस म्हणून नाही तर मार्गदर्शक म्हणून वावरावे. मुले कोणता नवीन ट्रेंड फॉलो करत आहेत, त्याबद्दल त्यांच्याशी कुतूहलाने बोलावे.

> **पालकांची नजर असणे म्हणजे मुलांवर संशय घेणे किंवा त्यांच्या खासगी आयुष्यात सतत हस्तक्षेप करणे नव्हे. पालकांनी मुलांच्या डिजिटल जगात पोलीस म्हणून नाही तर मार्गदर्शक म्हणून वावरावे.**

पालकांनी स्वतःचेही मोबाईल वापरण्याचे नियम पाळावेत, तसेच मोबाईल वापरताना पारदर्शकता ठेवावी, जेणेकरून मुले तुमचे अनुकरण करतील.

### ६.५ वेळोवेळी संवाद:

केवळ तांत्रिक निर्बंध लादून चालणार नाही, तर मुलांशी होणारा संवाद हेच सर्वात मोठे सुरक्षा कवच आहे. जर मुलाला ऑनलाईन जगात काही अस्वस्थ करणारे अनुभव आले, तर ते न भिता पालकांना सांगू शकले पाहिजेत इतका विश्वास त्यांच्यात निर्माण करणे गरजेचे आहे.

### पालकांसाठी काही महत्त्वाच्या टिप्स:

मुलांना मैदानी खेळ, वाचन किंवा चित्रकलेसारख्या प्रत्यक्ष जगातील छंदांकडे वळवा.

आपल्या मुलांशी मैत्रीपूर्ण आणि विश्वासाचे नाते निर्माण करा.

दररोज काही वेळ एकत्र बसणे, एकत्र जेवण करणे किंवा दिवसभरातील अनुभवांवर चर्चा करणे या गोष्टी आवर्जून करा.

मुलांना तंत्रज्ञानाचा संतुलित वापर कसा करावा हे शिकवा.

### निष्कर्ष:

आभासी जग हे दुधारी तलवारीसारखे आहे. जर पालकांनी मुलांच्या या जगातील प्रवासाकडे योग्य वेळी लक्ष दिले आणि संवादाची साथ दिली, तर मुले या तंत्रज्ञानाचा वापर प्रगतीसाठी करतील. अन्यथा ते या चक्रव्यूहात अडकण्याची भीती नाकारता येत नाही. पालक आणि मुले यांच्यातील सुसंवाद हा एका सुंदर बागेला पाणी घालण्यासारखा आहे. जर हे नाते संवादाने फुलले, तर येणारी पिढी केवळ यशस्वीच नाही, तर सुसंस्कृत आणि भावनिकदृष्ट्या सक्षम असेल. या जागतिक स्पर्धेच्या युगात आपल्या मुलाला सर्वात मोठी भेट कोणती द्यायची असेल, तर ती म्हणजे तुमचा वेळ आणि कान (ऐकून घेण्याची वृत्ती). लक्षात ठेवा, तुटलेला संवाद नात्यात दरी निर्माण करतो, तर जोडलेला संवाद आयुष्य समृद्ध करतो. ■

लेख

# ऊब मायेची




प्रशांत जोशी
छत्रपती संभाजीनगर




आमच्या समोरच्या एका आलिशान फ्लॅटमध्ये मीनाक्षी काकू राहायला आल्या तेव्हा त्यांच्या डोळ्यांमध्ये खूप स्वप्ने होती. मुलगा अमित आणि सून सोनल दोघेही आयटी क्षेत्रातील मोठे अधिकारी. सुरुवातीचे काही दिवस खूप छान गेले. सोनल कौतुकाने त्यांना मॉलमध्ये फिरायला न्यायची, नवीन साड्या घ्यायची. पण जसजसा काळ लोटला तसतसे शहरी वास्तव समोर येऊ लागले.

एके दिवशी दुपारी मीनाक्षी काकूंनी सोनलच्या बेडरूमचा दरवाजा उघडला फक्त विचारण्यासाठी, की 'संध्याकाळी काय बनवू?'

सोनल लॅपटॉपवर मीटिंगमध्ये होती. तिने रागाने काकूंकडे बघितले आणि मीटिंग संपल्यावर म्हणाली,

''आई प्लीज... तुम्ही दरवाजा नॉक केल्याशिवाय आत नका येत जाऊ. ही माझी प्रायव्हसी आहे. कामात व्यत्यय येतो.''

काकूंना ते नॉक करणे पचनी पडले नाही. त्यांना वाटले, 'पोटच्या लेकाच्या

खोलीत जायला आता परवान्याची गरज लागणार?' तिथूनच नात्यात एक अदृश्य भिंत उभी राहिली.

दिवसेंदिवस सोनल आणि अमित आपल्या कॉर्पोरेट आयुष्यात इतके गुंतले, की मीनाक्षी काकू त्या घरात फक्त मुलाला सांभाळणाऱ्या आणि स्वयंपाक करणाऱ्या व्यक्ती उरल्या. संवादाची जागा मोबाईलच्या मेसेजेसनी घेतली. एके रात्री घराच्या बाल्कनीत मीनाक्षी काकू एकट्याच बसल्या होत्या. सोनल बाहेर आली पण ती फोनवर बोलत होती. मीनाक्षी काकू म्हणाल्या,

''सोनू, आज तुझ्या आवडीची पुरणपोळी केलीये गं. ये लवकर जेवायला.''

सोनलने चिडून उत्तर दिले, ''आई मी डाएटवर आहे आणि मला खूप कॉल्स आहेत. तुम्ही जेवून घ्या. माझं मला कळतं.''

त्या रात्री जेवणाचे ताट समोर असूनही मीनाक्षी काकूंच्या घशाखाली घास उतरला नाही. ज्या मुलाला आणि सुनेला त्यांनी आपले जग मानले त्यांच्याच जगात आज त्यांना स्थान उरले नव्हते. काही दिवसांनी मीनाक्षी काकूंनी निर्णय घेतला, की त्या गावी परत जाणार आहेत. अमितला हे समजताच त्याने विचारले,

''का आई? इथे काय कमी आहे? एसी आहे, गाडी आहे, सगळं सुख आहे...''

तेव्हा मीनाक्षी काकूंच्या डोळ्यांमधून पाणी आले. त्या शांतपणे म्हणाल्या, ''बाळा, या घराच्या भिंती चकचकीत आहेत, पण त्या बोलत नाहीत. इथे एसीची थंडी आहे, पण मायेची ऊब नाही. सोनलला तिची स्पेस हवीय आणि

कपाट अर्धवट उघडे होते. आतल्या साड्यांच्या घड्या जणू काही त्यांनाच थांबवयाचा प्रयत्न करत होत्या. सोनल दाराशी उभी होती. पहिल्यांदाच तिच्या हातातला फोन शांत होता आणि मनातला आवाज मोठा. त्या रात्री घरात कोणीच जेवले नाही. अमित ऑफिसच्या मेल्सकडे पाहात बसला होता. पण अक्षरे धूसर दिसत होती. आईच्या डोळ्यांमधले पाणी त्याला सतत आठवत होते. 'एसीची थंडी आहे पण मायेची ऊब नाही' हे वाक्य त्याच्या कानात घुमत राहिले.

मला माझं अंगण. काळ बदलला म्हणून माणसांनी एकमेकांकडे पाहायची दृष्टी इतकी बदलावी, की नात्याचंही ओझं वाटावं?''

सोनल दारात उभी राहून हे सगळे ऐकत होती. तिला तिची चूक उमजली होती. पण तोपर्यंत मीनाक्षी काकूंनी आपली बॅग भरली होती. काळ बदलला होता आणि त्या काळाच्या ओघात एक सुंदर नाते प्रायव्हसी आणि व्यस्ततेच्या नावाखाली कायमचे दुभंगले होते! मीनाक्षी काकूंची बॅग भरलेली होती. कपाट अर्धवट उघडे होते. आतल्या साड्यांच्या घड्या जणू काही त्यांनाच थांबवयाचा प्रयत्न करत होत्या. सोनल दाराशी उभी होती. पहिल्यांदाच तिच्या हातातला फोन शांत होता आणि मनातला आवाज मोठा. त्या रात्री घरात कोणीच जेवले नाही. अमित ऑफिसच्या मेल्सकडे पाहात बसला होता. पण अक्षरे धूसर दिसत होती. आईच्या डोळ्यांमधले पाणी त्याला सतत आठवत होते. 'एसीची थंडी आहे पण मायेची ऊब नाही' हे वाक्य त्याच्या कानात घुमत राहिले.

पहाटेच्या सुमारास सोनल हळूच मीनाक्षी काकूंच्या खोलीत आली. काकू जाग्याच होत्या. त्यांच्या हातात जुन्या फोटोचा अल्बम होता. अमितच्या लहानपणीच्या आठवणी होत्या त्यात. शाळेचा पहिला दिवस, वाढदिवस, त्याच्या बाबांच्या छायाचित्रासमोरचा दिवा...

सोनल शांतपणे त्यांच्या पायाशी बसली.

''आई, माफ करा मला.'' तिचा आवाज थरथरत होता. ''मी माझी स्पेस मागत होते, पण तुम्हाला मनातून दूर करत होते हे मला कळलंच नाही. मी करिअर, डेडलाईन्स, प्रायव्हसी यांच्यात इतकी गुंतले, की तुमच्या मनातलं ऐकलचं नाही.''

मीनाक्षी काकूंनी काही क्षण तिच्याकडे बघितले. त्या नजरेत राग नव्हता. फक्त खोल दुखावलेपण

होते.

''सोनू, मला तुमच्या आयुष्यात अडथळा व्हायचं नव्हतं गं. फक्त एवढंच वाटायचं, की या मोठ्या घरात कुणीतरी मला दोन मिनिटं बसून विचारावं 'आई कशी आहेस?''

तेवढ्यात अमितही आत आला. त्याच्या डोळ्यांमध्ये अपराधाची जाणीव स्पष्ट दिसत होती.

''आई, चूक माझी आहे. मीच दोघींमध्ये दुवा व्हायला हवं होतं. ऑफिसच्या नावाखाली मी जबाबदारी टाळली. तू कधी काही मागितलंच नाही... म्हणून आम्ही देणंही विसरलो.''

क्षणभर खोलीत शांतता पसरली. बाहेरून पहाटेचा हलका उजेड आत शिरत होता. जणूकाही नव्या सुरुवातीची चाहूल देत होता. सोनल उठली. बॅग उघडली आणि कपडे परत कपाटात ठेवू लागली.

''आई, तुम्ही कुठेही जाणार नाही. पण एक वचन द्या. तुम्हाला जे खटकतं ते मला थेट सांगा. आम्हीही शिकलो पाहिजे. या घरात तुमचाही हक्क असू दे, पण मनावर ओझं नको.''

मीनाक्षी काकूंच्या ओठांवर हलकेसे हसू उमटले.

''ठीक आहे. मी दरवाजा नॉक करून येईन, पण तुम्हीही कधीमधी माझ्या अंगणात या. माझ्या गोष्टी ऐका.''

त्या दिवशी संध्याकाळी वेगळेच चित्र होते. तिघेही एकत्र बसून जेवत होते. सोनलने स्वतःहून पुरणपोळीचा छोटासा तुकडा घेतला.

''आई, डाएट उद्यापासून.'' ती हसत म्हणाली.

बाल्कनीत पुन्हा तेच तिघे उभे होते. पण आज वातावरण वेगळे होते. एसीची थंडी होतीच, पण त्यात मायेची ऊब मिसळली होती. कधी कधी नाते दुभंगत नाही. आपणच त्याकडे पाहणारा आरसा धुळीने झाकतो. ती धूळ साफ करायला थोडे धैर्य, थोडी कबुली आणि थोडे प्रेम पुरेसे असते. या घरात आता प्रायव्हसी होती, पण त्याहून मोठे आपलेपणा होता आणि दुभंगलेला आरसा पुन्हा एकदा अखंड झाला होता.

अमितने आईचा हात हातात घेतला.

''आई घर मोठं आहे म्हणून माणसं दूर असायला नकोत. आपण नियम बनवू. रोज किमान एक चहा एकत्र... फोन बाजूला ठेवून.''

बाल्कनीत पुन्हा तेच तिघे उभे होते. पण आज वातावरण वेगळे होते. एसीची थंडी होतीच, पण त्यात मायेची ऊब मिसळली होती.

कधी कधी नाते दुभंगत नाही. आपणच त्याकडे पाहणारा आरसा धुळीने झाकतो. ती धूळ साफ करायला थोडे धैर्य, थोडी कबुली आणि थोडे प्रेम पुरेसे असते. या घरात आता प्रायव्हसी होती, पण त्याहून मोठे आपलेपणा होता आणि दुभंगलेला आरसा पुन्हा एकदा अखंड झाला होता.

या दिवसानंतर घरातले नियम बदलले होते. रोजचा एक चहा, आठवड्यातून एकदा बाहेर फेरफटका आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे मनातले न भिता बोलायचे. काही दिवस सगळे खरेच सुरळीत चालले. पण आयुष्य नेहमीच सरळ रेषेत चालत नाही.

एका दुपारी अचानक मीनाक्षी काकूंना चक्कर आली. स्वयंपाकघरातल्या उकळत्या आमटीचा सुवास सर्वत्र पसरलेला होता. गॅस चालूच होता आणि त्या खाली बसल्या होत्या. सोनलने धावत जाऊन त्यांना सावरले. तिने अमितला फोन केला. दोघांनी मिळून त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल केले. डॉक्टरांनी शांतपणे सांगितले,

''वय झालंय. शरीर थकायला लागतं. काळजी घ्या. त्यांना ताण नको.''

त्या रात्री हॉस्पिटलच्या पांढऱ्या भिंतीमध्ये बसून सोनल पहिल्यांदाच स्वतःला पूर्णपणे असहाय्य समजत होती. लॅपटॉप नव्हता. मीटिंग नव्हती, डेडलाईन नव्हती, फक्त आईच्या श्वासांचा मंद आवाज होता. तिने हळूच काकूंचा हात हातात घेतला. तो हात उबदार होता, पण

थरथरत होता.

''आई तुम्हाला बरं व्हायलाच पाहिजे. अजून मला तुमच्याकडून पुरणपोळी शिकायची आहे. अजून तुमच्याकडून गोष्टी ऐकायच्या आहेत.''

मीनाक्षी काकूंनी डोळे उघडले. ओठांवर हलकीशी रेष उमटली.

''सोनू, मी आहे गं इथेच. पण एक सांगू, त्या दिवशी मी जायला निघाले होते ना, तेव्हा मनात खूप भीती होती. वाटलं माझा लेक माझ्याशिवाय जगायला शिकलाय. मी उगाचच ओझं झाले आहे.''

अमित बाजूलाच उभा होता. त्याच्या डोळ्यांमधून अश्रू ओघळले.

''आई, आम्ही मोठे झालो म्हणून तुझी गरज कमी झाली असं नाही. उलट आम्हाला समजायला वेळ लागला.''

काही दिवसांनी काकू घरी परतल्या. पण त्या पूर्वीसारख्या राहिल्या नाहीत. शरीर कमकुवत झाले होते. आता स्वयंपाक सोनल करत होती. सकाळी ऑफिसला जाण्यापूर्वी ती काकूंच्या खोलीत डोकवायची. त्यांच्या केसांवरून हात फिरवायची. अमित रोज त्यांच्या शेजारी बसून जुने फोटो पाहायचा. एक संध्याकाळी बाल्कनीत तिघे बसले होते. आकाशात सूर्य मावळत होता. मीनाक्षी काकूंनी शांतपणे म्हटले,

''माझं अंगण आता इथेच आहे. गावी परत जायची गरज नाही. कारण अंगण मातीचं नसतं रे माणसांचं असतं.''

सोनलने त्यांच्या खांद्यावर डोके टेकवले.

''आई तुम्ही आम्हाला उशिरा का होईना पण शिकवलंत, घर फक्त चार भिंतींचं नसतं. ते नात्यांचं आणि शब्दांचं असतं.''

काही महिन्यांनी एक पहाट मात्र वेगळीच उजाडली. मीनाक्षी काकू शांत झोपेतच निघून गेल्या. चेहऱ्यावर समाधान होते. जणूकाही अपूर्ण राहिलेले काहीच नव्हते. घर पुन्हा एकदा शांत झाले. पण यावेळी ती शांतता रिकामी नव्हती. ती आठवणींनी भरलेली होती. स्वयंपाकघरात सोनल पुरणपोळी करत उभी होती. डोळ्यांमध्ये पाणी होते, पण ओठांवर हलकेसे हसूही होते. अमितने मागून येऊन तिला मिठी मारली.

''आई असती तर म्हणाली असती, गोड जरा कमी पडलंय.''

दोघेही हसले आणि रडलेही. बाल्कनीत उभे राहून अमित म्हणाला,

''एसीची थंडी आहे, पण आता मायेची ऊब नाही. कारण आई ती आपल्यासोबत घेऊन गेली.''

कधीकधी नाते तुटत नाही. ते वेळेआधी समजून घेतले नाही तर हातातून निसटते. पण जेव्हा समज येते, तेव्हा माणूस सोबत नसल्यास त्याचे प्रेम आयुष्यभर साथ देत राहाते. त्या घरात आता एक फोटो होता हसऱ्या मीनाक्षी काकूंचा आणि त्या फोटोसमोर रोज दिवा लावला जायचा. फक्त प्रकाशासाठी नाही तर त्या मायेच्या ऊबेसाठी, जी शेवटी घराला खरे घर बनवून गेली.

**कधीकधी नाते तुटत नाही. ते वेळेआधी समजून घेतले नाही तर हातातून निसटते. पण जेव्हा समज येते, तेव्हा माणूस सोबत नसल्यास त्याचे प्रेम आयुष्यभर साथ देत राहाते. त्या घरात आता एक फोटो होता हसऱ्या मीनाक्षी काकूंचा आणि त्या फोटोसमोर रोज दिवा लावला जायचा. फक्त प्रकाशासाठी नाही तर त्या मायेच्या ऊबेसाठी, जी शेवटी घराला खरे घर बनवून गेली.**

## महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे

# ‘मराठी भाषा संवर्धन पंधरवडा’ साजरा



महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे दिनांक १४ ते २८ जानेवारी २०२६ या कालावधीत ‘मराठी भाषा संवर्धन पंधरवडा’ उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

सदर पंधरवड्याच्या कालावधीत प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक, आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी यांच्यामध्ये मराठी भाषेच्या वापरास चालना मिळावी, मराठी साहित्याविषयी रुची निर्माण व्हावी तसेच प्रशासकीय कामकाजात शुद्ध व प्रभावी मराठीचा वापर व्हावा, या हेतूने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यात निबंध लेखन, चारोळी / कविता लेखन, पोलीस दलासाठी घोषवाक्य, वक्तृत्व, हस्ताक्षर लेखन व कथा वाचन इत्यादी उपक्रमांचा समावेश होता.

सदर उपक्रमात सत्र क्रमांक १२७ मधील प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक, महाराष्ट्र पोलीस अकादमी आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी यांनी सहभागी होऊन उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विविध स्पर्धांमधील विजेत्या स्पर्धकांना बक्षीस वितरण समारंभात मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

| क्र. | उपक्रमाचे नाव | बक्षीसपात्र स्पर्धकाचे नाव | चेस्ट क्रमांक | बक्षीस क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | मराठी निबंध लेखन | विक्रम कर्डिले | ५४७ | प्रथम |
| | | विद्या झाडे | ५८ | द्वितीय |
| | | अंकिता जाधव | ४०७ | तृतीय |
| २ | चारोळी/कविता लेखन | ज्योती चव्हाण | १९० | प्रथम |
| | | स्नेहल राजपूत | ७ | द्वितीय |
| | | वल्लभ जाधव | २०१ | तृतीय |
| ३ | पोलिसांसाठी घोषवाक्य स्पर्धा | विद्या झाडे | ५८ | प्रथम |
| | | अमितकुमार धामोरे | २९० | द्वितीय |
| | | वल्लभ जाधव | २०१ | तृतीय |
| ४ | वक्तृत्व स्पर्धा | वैशाली शेळके | ३२८ | प्रथम |
| | | किरण पाटील | २२१ | द्वितीय |
| | | वल्लभ जाधव | २०१ | तृतीय |
| ५ | कथा वाचन स्पर्धा | स्नेहल राजपूत | ७ | प्रथम |
| | | अमितकुमार धामोरे | | द्वितीय |
| | | श्रद्धा राठोड | १३६ | तृतीय |
| ६ | मराठी हस्ताक्षर लेखन स्पर्धा | संतोष पवार | ४५९ | प्रथम |
| | | ऋतुजा मानुगडे | ३०० | द्वितीय |
| | | पूजा खामकर | १९१ | तृतीय |

कार्यक्रमाच्या माध्यमातून मराठी भाषेचे सांस्कृतिक, सामाजिक व प्रशासकीय महत्त्व अधोरेखित झाले असून मराठी भाषेचा दैनंदिन तसेच शासकीय वापर अधिक प्रभावीपणे करण्याची जाणीव सर्वांमध्ये निर्माण झाली.

सदर आराखड्यात (दिनांक १४ ते २८ जानेवारी २०२६) मराठी भाषेचा वापर, जतन व संवर्धन करणे, पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यात मराठी भाषेबद्दल अभिमान निर्माण करणे दैनंदिन शासकीय कामकाजात शुद्ध मराठी वापरास प्रोत्साहन देणे यांचा समावेश करण्यात आला.

यामध्ये मराठी निबंध लेखन स्पर्धा प्रस्तावित होती. यासाठी पोलीस प्रशासनात मराठीचे महत्त्व, पोलीस प्रशिक्षण संस्था : ओळख व महत्त्व, मराठी भाषेचे संवर्धन: काळाची गरज, डिजिटल युगातील मराठी नियम हे विषय देण्यात आले होते. सदर स्पर्धेसाठी पुढीलप्रमाणे नियमावली तयार करण्यात आली होती.

१) निबंध स्वलिखित व मराठी भाषेत असावा. २) निबंध वेळेत सादर करावा.३) शब्दमर्यादा ५०० शब्द४) निबंध सादर करण्याची अंतिम तारीख २३ जानेवारी २०२६ व वेळ सायंकाळी ५.०० पर्यंत.

याशिवाय पोलीस दलासाठी घोषवाक्य (स्लोगन) स्पर्धा ठेवण्यात आली होती. या स्पर्धेसाठी पोलीस व जनता, कायदा व सुव्यवस्था, महिला व बाल सुरक्षा, सुरक्षित समाज–सक्षम पोलीस, मराठी पोलीस, लोकाभिमुख पोलीस हे विषय देण्यात आले होते. या स्पर्धेसाठी नियम व अटी याप्रमाणे सुनिश्चित करण्यात आल्या होत्या.

१) घोषवाक्य स्वलिखित, अप्रकाशित व मराठी भाषेत असावे. २) एका सहभागीला जास्तीत




जास्त ५ ते १० घोषवाक्ये सादर करता येतील. ३) घोषवाक्य संक्षिप्त, प्रभावी व आशयपूर्ण असावे. आक्षेपार्ह, राजकारण किंवा व्यक्तीविशेषांवर आधारित नसावे. ४) सादर करण्याची अंतिम तारीख: २३ जानेवारी २०२६; वेळ: सायंकाळी ५.०० पर्यंत

यादरम्यान चारोळी/ कविता लेखन स्पर्धाही आयोजित करण्यात आली. यासाठी पोलीस जीवन, कर्तव्य, समाजसेवा, तसेच मराठी भाषेचे महत्त्व व संवर्धन, मराठी संस्कृति व परंपरा हे विषय देण्यात आले. या स्पर्धेसाठी नियम व अटी पुढीलप्रमाणे होत्या.

१) या स्पर्धेसाठी जास्तीत जास्त ५ चारोळी / कविता यांसाठी १२ ते २० ओळी असणे अपेक्षित होते. २) शिवाय लेखन स्वलिखित, अप्रकाशित व मराठीत असणे क्रमप्राप्त होते. ३) सादर करण्याची अंतिम तारीख २० जानेवारी असून सादरीकरणासाठीची वेळ सायंकाळी ५.०० पर्यंत

पोलीस व नागरिक यांच्यातील संवादाचे महत्त्व, पोलीस प्रशासनात मराठी भाषेचा प्रभावी वापर, समाज सुरक्षिततेत पोलिसांची भूमिका, संवेदनशील पोलिसिंग व संवाद कौशल्य, मराठी भाषा: ओळख, अभिमान व जबाबदारी इत्यादी. भाषण करण्यासाठी ४-५ मिनिटे देण्यात आली होती. भाषण दिलेल्या वेळेत सादरीकरण करणे बंधनकारक करण्यात आले. भाषण आक्षेपार्ह, राजकारण किंवा व्यक्तीविशेषांवर आधारित नसेल याची दक्षता घेणे बंधनकारक करण्यात आले. स्पर्धेची तारीख २३ जानेवारी २०२६ शुक्रवार असून वेळ दुपारी ५-२० ते ६.१० पर्यंतची देण्यात आली होती.

या कालावधीत मराठी हस्ताक्षर लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली. यावेळी लेखनाचा मजकूर हा आयोजकांकडून दिलेला उतारा/ परिच्छेद होता. सदर स्पर्धेसाठी २० ते ३० मिनिटांची वेळ देण्यात आली होती. मजकूर लेखनासाठी काळा किंवा निळा पेन वापरणे बंधनकारक होते, तर कागद आयोजकांकडून देण्यात आला. सदर स्पर्धेसाठी स्वच्छ, सुबक व वाचनीय हस्ताक्षर अपेक्षित होते. या स्पर्धेसाठी खोडरबर/ व्हाईटनर वापरण्यास मनाई होती. शुक्रवारी २३ जानेवारी २०२६ या दिवशी दुपारी ४.४० ते ५.१० या कालावधीत पार पडली.

कथा वाचन स्पर्धाही आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत पोलीस तपास कथा, सामाजिक, प्रेरणादायी, राष्ट्रभक्तीपर, पोलिसी मूल्यांशी सुसंगत कथा, तसेच मराठी लघुकथा/ कथांश, संत साहित्य/ प्रेरणादायी कथा असे कथेचे विविध प्रकार अंतर्भूत करण्यात आले होते.

सदर स्पर्धेसाठी सहभागीने स्वतः निवडलेली एकच मराठी कथा वाचणे आवश्यक होते. तर पुस्तकातून किंवा छापील प्रतीतून वाचनास अनुमती होती. त्यासाठी ५ ते ७ मिनिटे वेळ देण्यात आली होती. यात प्रामुख्याने स्पष्ट उच्चार, भाव व वाचन शैलीवर भर देण्यात देण्यात आला. वेळेचे पालन बंधनकारक करण्यात आले होते. कथा अश्लील, राजकीय अथवा वादग्रस्त नसणे आवश्यक होते.

२३ जानेवारी २०२६, शुक्रवार या दिवशी दुपारी ३.३० ते ४.३५ या वेळेत सदर स्पर्धा पार पडली. ■



रामकृष्ण अघोर
सोलापूर

# पालकांनो, मुलांना बेकायदेशीर वाहन चालवण्यापासून रोखा

आपले मूल जगात पुढे असावे ही इच्छा उराशी बाळगताना मुलाचे नको ते लाड करणे संकटाला आमंत्रण देते. लहान मुलाच्या हाती विनापरवाना गाडी देणे हा असाच एक प्रकार. यातून मुलाच्या तसेच इतरांच्याही जिवाला धोका निर्माण होऊ शकतो. याचे नियंत्रण करणे ही सुजाण पालकांचीच जबाबदारी आहे.




आज प्रत्येक नागरिकाची ओरड आहे, की रस्त्याने चालणे अवघड होत आहे. कोण कसा वाहन रस्त्यावर चालवतो आणि कोणाच्या अंगावर ते वाहन धडक मारेल हे सांगता येत नाही. यासाठी कोठे प्रवासालाच जावे लागेल असे नाही. शहर असो किंवा ग्रामीण भाग; रस्त्यावरील प्रत्येक व्यक्तीला जीव मुठीत धरूनच रस्त्यावरून जावे लागते. कारण सध्या वाहनांची संख्या एवढी वाढली आहे, की रस्त्याच्या दुतर्फा चारचाकी वाहने उभी असतात. त्याचप्रमाणे दुचाकी वाहनांची संख्यादेखील इतकी आहे, की सायकलस्वाराला व पायी जाणाऱ्या माणसाला प्राधान्य मिळतच नाही. हे सर्व झाले सुजाण नागरिकांचे.

आता प्रश्न राहिला मुलांचा. सध्या शाळेमध्ये जाणारी अनेक लहान मुले



आर. टी. ओ. च्या परवान्याशिवाय दुचाकी, चारचाकी वाहने चालवतात. कोणत्याही प्रकारची जबाबदारी, कायदे यांविषयी अज्ञानी असताना, बेकायदेशीरपणे पोलिसांची नजर चुकवून सर्वत्र वाहन चालवत असतात. त्यात मोबाईलची देखील भर पडलेली आहे. आधीच मुलांवर पालकांचे लक्ष नाही, त्यामुळे मुले बिघडत चालली आहेत अशी ओरड असते. मात्र वाहन चालविण्यास पात्र नसताना आपल्या आई–वडिलांची नजर चुकवून सर्रासपणे दुचाकी वाहनावर तिघे चौघे बसतात. चालत्या वाहनावर बसूनच मोबाईलवर बोलत असतात. नको तितक्या वेगाने वाहन चालवत असतात. त्यामुळे अनेक ठिकाणी अपघात झाल्याचे निदर्शनास आले आहे. काही पालक तर लहान वयात मुले गाडी चालवतात हे अभिमानाने सांगतात. पण कोणत्याही पालकांनी आपल्या मुलांना गाडी देऊ नये, कारण ते कधी ना कधी अंगलट आल्याशिवाय राहात नाही. याचे कारण असे, की मोटार वाहन

वाहन चालविण्यास पात्र नसताना आपल्या आई–वडिलांची नजर चुकवून सर्रासपणे दुचाकी वाहनावर तिघे चौघे बसतात. चालत्या वाहनावर बसूनच मोबाईलवर बोलत असतात. नको तितक्या वेगाने वाहन चालवत असतात. त्यामुळे अनेक ठिकाणी अपघात झाल्याचे निदर्शनास आले आहे. काही पालक तर लहान वयात मुले गाडी चालवतात हे अभिमानाने सांगतात. पण कोणत्याही पालकांनी आपल्या मुलांना गाडी देऊ नये.



कायद्यात दुचाकी, चारचाकी गाडी चालविण्याचे वय ठरविण्यात आले आहे. त्यामुळे कोणत्याही माता–पित्याने आपल्या पुत्र प्रेमापोटी मुलांना तितकी वयोमर्यादा गाठेपर्यंत गाडी चालविण्यास देऊ नये. दिल्यास त्याचे पुढे काय होणार याचे भान नसते.

नुकतीच नागपुरात एक जबरदस्त घटना घडली. मुलाने केलेल्या कृतीचा दंड म्हणजे भुरदंड त्याच्या वडिलांनाच बसला. त्या मुलाने वाहन कायद्याच्या केलेल्या भंगामुळे त्याच्या वडिलांना तीस हजार रुपयाचा दंड भरावा लागला. ही घटना सोनेगाव पोलीस स्टेशन अंतर्गत २६ नोव्हेंबर २०२५ या दिवशी घडली. पोलिसांनी त्या मुलावर दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला. तेव्हा वास्तविक पाहता त्यांच्या वडिलांनी आपल्या मुलाला समजावून सांगणे तसेच रागावणे गरजेचे होते. मात्र पुत्रप्रेमापोटी त्यांनी आपल्या मुलाला संरक्षण मिळावे म्हणून पोलिसांच्या विरोधात जात न्यायालयाचा दरवाजा ठोठावला.

> आम्हाला मुलाकडे लक्ष द्यायला वेळ नाही, ही सबब चालणार नाही. आपल्या मुलाचे कौतुक जरूर करा, पण तो कोणताही कायदा मोडणार नाही याची दक्षता घ्या. आपला मुलगा एक सुजाण नागरिक बनला पाहिजे, यासाठी डोळ्यांमध्ये तेल घालून लक्ष ठेवा. बेकायदेशीरपणे चालवलेले वाहन कोणाच्याही जिवावर बेतू शकते.

न्यायालयाने कायद्याचा आधार घेऊन पोलिसांच्या बाजूने निर्णय दिला.

या प्रकरणात न्यायालयाने पोलिसांची बाजू योग्य असल्याचा निर्वाळा दिल्यामुळे त्या मुलाच्या वडिलांना त्वरित दंड तर भरावा लागलाच, शिवाय समाजात नाचक्की झाली ती वेगळीच! या प्रसंगामुळे सर्व पालकांनी जागृत राहण्याची गरज अधोरेखित झाली आहे. आम्हाला मुलाकडे लक्ष द्यायला वेळ नाही, ही सबब चालणार नाही. आपल्या मुलाचे कौतुक जरूर करा, पण तो कोणताही कायदा मोडणार नाही याची दक्षता घ्या. आपला मुलगा एक सुजाण नागरिक बनला पाहिजे, यासाठी डोळ्यांमध्ये तेल घालून लक्ष ठेवा. बेकायदेशीरपणे चालवलेले वाहन कोणाच्याही जिवावर बेतू शकते. यासाठी सर्व पालकांना कळकळीची विनंती आहे, की मुलांना बेकायदेशीरपणे वाहन चालविण्यापासून रोखा आणि पोलिसांना सहकार्य करा. ■




ऐश्वर्या साळवी
फिजिओथेरपिस्ट
मुंबई

# स्मार्टफोन आणि संगणकाच्या युगात

# मान सांभाळा



आजच्या वेगवान डिजिटल जगात, स्मार्टफोन आणि संगणक हे आपल्या दैनंदिन आयुष्याचा अविभाज्य भाग बनले आहेत. ऑफिसच्या कामापासून आणि ऑनलाइन क्लासेसपासून ते सोशल मीडिया आणि मनोरंजनापर्यंत, लोक दररोज अनेक तास स्क्रीनकडे पाहण्यात घालवतात. तंत्रज्ञानाने जीवन सुखकर बनवले असतानाच, दुसरीकडे आरोग्याची एक नवीन चिंता निर्माण



केली आहे, ती म्हणजे मानदुखी. विशेष म्हणजे हे दुखणे आता तरुणांमध्येही मोठ्या प्रमाणात आढळून येते.

पूर्वीच्या काळात, सर्व्हायकल स्पॉन्डिलिसिस सारख्या मानेच्या समस्या ४० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या लोकांमध्ये सामान्यतः दिसून येत. आज मात्र हा पॅटर्न बदलला आहे. वीस आणि तीस वर्षांच्या लोकांमध्येही या समस्या आढळत आहेत. या बदलामागील मुख्य कारण म्हणजे बसण्याच्या चुकीच्या पद्धती आणि त्यासोबतच मोबाईल फोन आणि कॉम्प्युटरचा अतिवापर.

## स्क्रीनचा वापर आणि मानेवर होणारा परिणाम

अनेक लोकांना फोनवर मजकूर पाठवताना, स्क्रोल करताना किंवा व्हिडिओ पाहताना बरेच तास मान खाली वाकवून बसण्याची सवय असते. या विशिष्ट स्थितीमुळे मानेचे स्नायू, लिगामेंट्स आणि सांधे यांच्यावर सतत ताण पडतो. यामुळे कालांतराने स्नायूंचा थकवा, मानेतला कडकपणा आणि वेदना असे विकार जडतात.

त्याचप्रमाणे, अयोग्य स्थितीत बसून संगणकावर दीर्घकाळ काम केल्याने देखील मानेवर आणि पाठीच्या वरच्या भागावर ताण येऊ शकतो. जेव्हा स्क्रीन नजरेच्या पातळीपेक्षा खूप खाली असतो किंवा व्यक्ती काम करताना पुढे झुकते तेव्हा मान दीर्घकाळ तणावग्रस्त स्थितीत राहते. त्यातून विविध समस्या निर्माण होतात.

## मानेच्या विकाराची सुरुवातीची लक्षणे

मानेच्या समस्या बऱ्याचदा सौम्य लक्षणांनी सुरू होतात ज्याकडे बरेच लोक दुर्लक्ष करतात. यामध्ये खालील लक्षणे समाविष्ट असू शकतात.

- सततची मानदुखी
- मानेमध्ये कडकपणा
- खांद्याच्या वर जडपणा
- वारंवार डोकेदुखी
- मान वळवण्यात अडचण
- वेदना पाठीच्या वरच्या बाजूला पसरणे

या सुरुवातीच्या लक्षणांकडे दुर्लक्ष केल्यास कालांतराने परिस्थिती

बिघडू शकते.

### सर्व्हायकल स्पॉन्डिलिसिस कसा होतो?

अयोग्य पोश्चर आणि जास्त स्क्रीनटाईम ही 'अभद्र युती' दीर्घकाळ सुरू राहिल्यास, मानेच्या मणक्याच्या (मानेच्या हाडांच्या) संरचनेवर परिणाम होऊ शकतो. मानेच्या हाडांमधील उशी म्हणून काम करणाऱ्या चकत्या (डिस्क्स) या सतत तणावामुळे हळूहळू झिजायला लागतात.

या स्थितीला सर्व्हायकल स्पॉन्डिलिसिस म्हणतात. यात मानेच्या मणक्याची सामान्य रचना ढासळू लागते. काही प्रकरणांमध्ये, ही झीज झाल्याने जवळपासच्या नसा आकुंचित होतात. त्यामुळे हातापायांना मुंग्या येणे, बधिर होणे किंवा हात आणि पायांमध्ये कमकुवतपणा यासारखी लक्षणे उद्भवतात.

### मानेचे रक्षण करण्यासाठी सोपी खबरदारी

यात चांगली बातमी अशी आहे की जीवनशैलीच्या चुकांमुळे होणारी मानदुखी अनेकदा दैनंदिन दिनचर्येमध्ये लहानसहान बदल करून टाळता येते. त्यासाठी पुढे दिलेल्या गोष्टींचे पालन करा:

**पोश्चर योग्य ठेवा:**
मोबाईल फोन वापरताना, मान खाली झुकवण्याऐवजी फोन डोळ्यांच्या पातळीवर ठेवण्याचा प्रयत्न करा. संगणकावर काम करताना, स्क्रीन डोळ्याच्या पातळीवर ठेवली आहे आणि बसताना तुमची पाठ सरळ आहे याची खात्री करा.

**नियमित ब्रेक घ्या:**
जास्त वेळ सतत बसणे टाळा. दर ३०–४० मिनिटांनी छोटा ब्रेक घेतल्याने मानेच्या स्नायूंना आराम मिळतो आणि ताण कमी होतो.

> **अयोग्य पोश्चर आणि जास्त स्क्रीनटाईम ही 'अभद्र युती' दीर्घकाळ सुरू राहिल्यास, मानेच्या मणक्याच्या (मानेच्या हाडांच्या) संरचनेवर परिणाम होऊ शकतो.**

**मानेचे व्यायाम नियमितपणे करा:**
मान आणि खांद्यासाठीचे साधे स्ट्रेचिंग आणि स्ट्रेचिंगचे व्यायाम स्नायूंची ताकद आणि लवचिकता सुधारण्यास मदत करतात.

**योग्य उशी निवडा:**
खूप उंच किंवा खूप कठीण असलेली उशी वापरल्याने झोपताना मानेवर ताण येऊ शकतो. मानेच्या नैसर्गिक बाकाला आधार देणारी आरामदायक उशी वापरा.

**शारीरिकदृष्ट्या सक्रिय राहा:**
नियमित शारीरिक हालचालींमुळे स्नायूंची ताकद सुधारते आणि संपूर्ण मणक्याचे आरोग्य राखण्यास मदत होते.

### वैद्यकीय सल्ला कधी घ्यावा?

मानेचे दुखणे दोन ते तीन आठवड्यांपेक्षा जास्त काळ राहिल्यास, किंवा हात सुन्न होणे, मुंग्या येणे किंवा कमकुवतपणा यांसारखी लक्षणे दिसू लागल्यास वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक आहे. लवकर निदान आणि योग्य उपचार या स्थितीला गंभीर होण्यापासून रोखू शकतात.

### डिजिटल जीवनशैलीसाठी...

आजच्या जगात, स्मार्टफोन आणि संगणक पूर्णपणे टाळणे व्यावहारिक नाही. तथापि, पोश्चरची काळजी घेणे, जास्त स्क्रीनटाईम मर्यादित करणे आणि दैनंदिन जीवनात नियमित व्यायामाचा समावेश यामुळे मानदुखी आणि सर्व्हायकल स्पॉन्डिलिसिसचा धोका कमी होऊ शकतो.

त्यासाठी आजच आपल्या मानेची काळजी घ्या, जेणेकरून भविष्यात मणक्याच्या गंभीर समस्या टाळता येतील. ■

लेख



भारती सावंत
नवी मुंबई

# चाहूल वसंतऋतूची



*चैत्राची लागता*
*चाहूल*
*सण येई*
*गुढीपाडव्याचा*
*वसंताच्या*
*आगमनामुळे*
*पानाफुलांना बहर*
*नव्याचा*

चैत्र मास उगवला, की सर्वत्र चैतन्याचे वारे वाहू लागते. वृक्षराजीला नवी पालवी फुटल्याने एखाद्या नववधूने नववसने ल्याली आहेत असाच आभास होतो. सणांची रेलचेल आणि फुलाफळांना बहर, मोहोर येतो आणि

सारे वातावरण आल्हाददायक होऊन जाते. हिरव्या पोपटी पालवीने वनराई शोभून दिसते. वृक्षांवर बसून किलबिलणारे खग आनंदाने चिवचिवत राहतात. कोकिळ आम्रवृक्षावर आपल्या सुरेल आवाजात गात राहतो. गुढीपाडव्याच्या सणाला नवीन खरेदीसाठी बाजारात, दुकानात लोकांची झुंबड उडालेली दिसते. ललना नववस्त्रे, अलंकार यांच्या खरेदीसाठी तयार होतात.

वसंताचा उत्सव हा निसर्गाचा उत्सव आहे. वसंत पंचमीपासून वसंत ऋतू सुरू होतो. सुंदर असा असणारा निसर्ग वसंत ऋतूत सोळा कलांनी फुलून उठतो. यौवन हा जर आपल्या जीवनातील वसंत असेल तर वसंत हे सृष्टीचे यौवन आहे. महर्षी वाल्मिकींनी रामायणात वसंत ऋतूचे अतिशय सुंदर व मनोहारी चित्रण केले आहे. भगवान श्रीकृष्णांनी देखील गीतेमध्ये 'ऋतुनां कुसुमाकर:' असे म्हणून ऋतुराज वसंतांची बिरुदावली गायलेली आहे.

सतत आकर्षक वाटणारा निसर्ग वसंत ऋतूमध्ये अधिकच लोभस बनतो. जणूकाही आपल्या सौंदर्याने तो माणसाला स्वतःच्या बाजूला खेचून घेतो. म्हणून आपणदेखील वसंत ऋतूचे अवलोकन उघड्या डोळ्यांनी करून त्याचे कौतुक केले पाहिजे. यासाठी मनुष्याने निसर्गाच्या सहवासात राहायला

> **सतत आकर्षक वाटणारा निसर्ग वसंत ऋतूमध्ये अधिकच लोभस बनतो. जणूकाही आपल्या सौंदर्याने तो माणसाला स्वतःच्या बाजूला खेचून घेतो.**

हवे. वसंत ऋतू हा हिवाळ्यानंतर आणि उन्हाळ्यापूर्वी येणारा ऋतू असतो. तो निसर्गाचा उत्सवासम आनंदसोहळाच असतो. म्हणूनच वसंताला ऋतूंचा राजा म्हटले जाते. त्याला नवचैतन्य आणि उत्कर्ष यांचे प्रतीक म्हणून ओळखले जाते. वसंत ऋतूमध्ये कोणी निराश राहात नाही. वसंतात वृक्षांना फुटलेली पोपटी पालवी डोळ्यांना सुखावह भासते. थंडीच्या तुलनेत जास्त प्रकाश आणि उष्णता मिळते. हिरव्यागार वृक्षवेलींवर पक्ष्यांचा मंजुळ किलबिलाट खूप प्रसन्न भासतो.

वसंत ऋतूला तारुण्याचे प्रतीक मानले जाते. तो निसर्गाची युवावस्था आहे. या ऋतुकाळात दिवस मोठा होतो आणि रात्र लहान होत जाते. आपल्या अस्वस्थ प्रकृतीला स्वस्थ बनविण्यासाठी निसर्ग हाच खरा डॉक्टर आहे. निसर्गात अशी अजब जादू आहे, की मानवाला त्याच्या सर्व वेदनांचे विस्मरण व्हायला होते. निसर्ग आपले अनमोल सौंदर्य भरभरून वाटत असताना कधीच मोल मागत नाही. त्यामुळे तो परमेश्वरासम भासतो. निसर्गात गेल्यावर आपणाला परमेश्वराच्या सान्निध्यात गेल्याचेच समाधान मिळते. निसर्ग सहा ऋतूंमध्ये आपल्या रूपांचे सहा प्रकारे प्रदर्शन करत असतो आणि त्याची सर्व रूपे मनाला लुभावणारी असतात. जणूकाही परमेश्वराने त्याच्यावर कृपाप्रसादच बहाल केलेला आहे.

शिशिर ऋतूत वृक्षांची पाने गळून पडतात आणि वसंत ऋतूत पुन्हा सर्व वृक्षांना नवीन पालवी फुटते. म्हणजे जणूकाही निसर्गाची नवनिर्मितीच होत असते. वसंतात मनुष्यप्राणीदेखील नवीन विचारांनी प्रगल्भ होतो. आम्रवृक्षाला येणारा मोहोर, फुलांना आलेला बहर तसेच कोकिळेचे मधुर कूजन आपणाला नवचैतन्य मिळवून देतात.

कवीश्वर जयदेवांच्या काव्यात त्यांनी वसंत ऋतूचे अप्रतिम वर्णन केलेले आहे. कवी कवयित्रींच्या रसाळ काव्यामृतामुळे वसंताचे सौंदर्य अजुनच द्विगुणित होते. मला वसंताचे स्वागत करणाऱ्या कवी शांताराम आठवले यांच्या ओळी आजही स्मरणात आहेत.

***आला वसंत ऋतू आला***<br>***वसुंधरेला हसवायाला***<br>***सजवीत नटवीत लावण्याला***

तसेच कविवर्य गदिमांच्या

***आल्या वसंत गौरी***



*सांगे फुलांस वारा*
*वाऱ्यास गंध येतो*
*म्हणती ढगास तारा*

या ओळीत वसंत ऋतूत सृष्टीत सुरू असलेल्या संवादाचे वर्णन केलेले आहे.

वसंत ऋतू म्हणजे हिंदू नववर्षाची सुरुवात! गुढीपाडवा, रामनवमीचा सोहळा, हनुमान जयंती, चैत्रागौरीचे आगमन, अक्षय तृतीया अशा सणसमारंभांचा काळ... आमरसपुरी, कैरीचे पन्हे, लोणचे, ओल्या हरभऱ्याची ओटी, जांभूळ, बोरे, करवंदे असा रानमेवा, आईस्क्रीम, आंब्याफणसाचे विविध पदार्थ यांच्या संगतीने जिव्हालौल्य पुरवण्याचा काळ... पिवळा बहावा, संपूर्ण अंगावर काटे असणारी काटेसावर, मंद सुगंधाची मधुमालती, सूर्याचे तेज पिऊन फुललेला लाल रंगाचा पळस, देवळाबाहेर दिसणारा पिवळा देवचाफा, लालपिवळा गुलमोहर यांच्या विविधरंगी अदांनी नेत्रसुख अनुभवण्याचा काळ... परीक्षा संपल्यानंतर मुलांना मिळालेली मोकळीक, सहली, लग्नसराई यांनी मनाला नवचैतन्य देणारा काळ... असा हा सर्जनशील वसंत ऋतूचा महिमा. आपल्या गोड स्वरात कुहू कुहू करत तनामनाला तजेला देणारा हा ऋतू! होळीला होणारी नाना रंगांची उधळण, वृक्षतळीला पडलेला पानांफुलांचा सडा, ज्ञानदेवांनी कौतुक केलेला फुललेला मोगरा, केसांत माळल्यानंतर धुंदफुंद होणारे श्वास, वातावरणाला सुगंधित आणि प्रसन्न करणारा हा ऋतू म्हणजे कामदेवाचा पुत्रच!

प्रसिद्ध लेखिका श्रीमती दुर्गा भागवत या आपल्या ‘ऋतुचक्र’ पुस्तकात लिहितात, ‘चैत्र हा खरा वसंतात्मा आहे, मधुमास आहे, ऋतुराज वसंताचे स्पंदन पावणारे हृदय आहे.’ कवी दत्ता हलसगीकर लिहितात, ‘मला अजून पहाटेची स्वप्नं पडत आहेत, थोड्याशा अंधाराने मी निराश नाही, अजून मला वसंताची चाहूल लागत आहे, थोड्याशा पानझडीने मी हताश नाही.’ अशा अनेक कवींनी वसंतऋतूला आपल्या काव्यांमधून फुलवले, बहरवले आहे. ■



सचिन बेंडभर
पुणे

# जिवावर बेतलं की अगदी सोप्पं



डुंबरवाडी म्हणजे लई मिश्किल! दर महिन्याला एक तरी घटना अशी घडायची, की डुंबरवाडी महिना महिना हसत रहायची. पण सारं कसं गुण्या गोविंदानं... अजून शहराचं वारं वाडीला झोंबलं नव्हतं.

परवाचीच गोष्ट. गणपती विसर्जनाचा दिवस. तिथल्या रितीनुसार सार्वजनिक सजवलेला रथ पाटलाच्या आळीतून वाजत गाजत निघाला. रथापुढं ढोल–लेझीम रंगात आला. ज्याच्या घराजवळ रथ येईल, तो घरातला गणपती विर्सजनासाठी आणून रथात ठेवी अन् लेझीमच्या खेळात दंग होई. सगळ्या

वाडीतले गणपती रथात मांडून मग मिरवणूक वाजत गाजत सुकाळीवर जाई. पोरीसोरीही रथामागं चालत विर्सजनाला यायच्या. रस्त्याने त्याही गणपतीबाप्पाची भजनं म्हणायच्या.

सुकाळी म्हंजी डुंबरवाडीची नदी. पाऊस झाला तरच नदीत पाणी दिसायचं, म्हणून तिचं नाव सुकाळी पडलं होतं. वरून वाहत आलेलं पाणी तिनं कधीच पोटात ठेवलं नाय. पावसाळ्यात लोटलेलं पाणी ती डायरेक्ट भीमानदीत सोडायची अन् आठ महिने कोरडीच राहायची. तिची खोड बघून सरकारनं तिला बंधारा घातला. तेव्हापासून मात्र चांगलीच फुगून राहू लागली.

विर्सजन मिरवणूक सुकाळीवर पोहोचली. प्रत्येकानं आपला गणपती बाप्पा घेऊन बंधाऱ्यावर भली मोठी रांग तयार केली. कापूर लावून प्रत्येकानं ताट हातात घेतलं आन् दणक्यात आरती केली. मग विसर्जनाला सुरुवात झाली. कोणी कोणाच्या अंगावर गुलाल टाकायचा तर कोणी एकमेकाच्या अंगावर पाणी उडवायचे. पोरांनी धिंगाणाच घातला. अशा गोंधळात जाधवाच्या नारबाने शेलाराच्या गणपाला बंधाऱ्याहून पाण्यात ढकलून दिला. तो जसा गटांगळ्या खाऊ लागला तशी काठावरची मंडळी टाळ्या वाजवू लागली. सगळ्यांना ठाव होतं की गणपा पट्टीचा पोहणारा गडी; गटांगळ्या खाल्ल्यागत करतोय म्हणजे तो गंमतच करतोय...

पण खरी गोष्ट कुणालाच माहीत नव्हती. खरं तर गणपाला पोहताच येत नव्हतं! शाळेला तो बाहेरगावीच होता. गावाला आल्यावर त्याचं शेजारच्या रामा दगडेच्या अलकीबरोबर सुत जुळलं. विषय थेट लग्नापर्यंत पोहोचला. बऱ्याच मोठमोठ्यांनी मध्यस्थी केली, पण अलकीच्या आईनं फांदा मारला. ती म्हणायची, ''पोरगं शिकलं सवरलेलं हाये, पण घाळपट दिसतंय. माझी



**विर्सजन मिरवणूक सुकाळीवर पोहोचली. प्रत्येकानं आपला गणपती बाप्पा घेऊन बंधाऱ्यावर भली मोठी रांग तयार केली. कापूर लावून प्रत्येकानं ताट हातात घेतलं आन् दणक्यात आरती केली. मग विसर्जनाला सुरुवात झाली.**

अलकी इरुळ्यागत चपाळ. त्याला नाय आघायची. कशाला गरिबाच्या घराचं भिरभिरं करू.लगीन जोडातच व्हायला पाहिजे.''

सगळ्यांचा नाईलाज झाला. मग अलकीनंच आईकडं लग्नाचा विषय काढला. तशी तिच्यावरच तिची आई दात खाऊन डाफरली, ''अगं गडीमाणसावरच प्रपंचाचा गाडा अवलंबून असतो. गडीमाणसाची कशी घरादारावर छाप असावी. जरा गहाळ पांघरून असलं की बायामाणसालाच प्रपंच हाकाया लागतोय. बघतेस तुझ्या बापाचं...'' तरीही अलकी गणपाचा हेका सोडीना. मग ती अलकीवर आणखीच कावली. ''त्यानी काय तुला पुरात उडी टाकून वाचवली की आगीतून वढून काढली तव्हा त्याच्या वचनात गुतली...''

असंच सात आठ दिवस गेलं. अन् अलकीनं डोकं लढवलं. तिनं गणपाला गाठून सांगितलं, ''मी धुणं धुवायला आईसंगं बंधाऱ्यावर येते. पाणी घेता घेताच बंधाऱ्याहून पाण्यात पडते. आरडाओरडा झाला की तू येऊन पाण्यात उडी टाकून मला बाहेर काढ.''

गणपानं बारीक तोंड करून तिला सांगितलं, ''मला कुठं पोहता येतंय?'' अलकीचा निर्धार पक्का होता. ती म्हणाली, ''नसंना का तुला पोहता येत. मी उडी टाकली की तू पण उडी मार. एका हातानं माझ्या कमरेला जाम धर. दुसऱ्या हाताने पाणी वारायचं नाटक कर. मी तुला घेऊन काठावर येईन.''

शंका येऊन गणपा चाचरत म्हणाला, ''तुला तरी पोहता येतंय ना?''

मग ती रागानं गरजली, ''माझी नको तू काळजी करू.

समुद्रात बुडाला तरी सात वेळा तुला बाहेर काढीन. बघत नाय का टीव्हीत? प्रेमात असं करावंच लागतं राजा.''

बंधाऱ्याजवळच तिचं शेत होतं. सुताराचा परशा दुपारचा पोहायला जायचा. चिटपाखरू तिथं नसायचं. एक दिवस त्यानेच अलकीला खुणावलं. पव्हायला. ती पोरांना कव्हाच घाबरत नव्हती. त्याच्या हाताला धरून शिकता शिकता अठावड्यात इरुळ्यागत पाणी कापाया लागली. आई रागवंल म्हणून तिनं घरी सांगितलं नव्हतं. आन् शान्यासुरत्या पोरीला पाण्यात खेळवत व्हता म्हणून आपल्यावर संशय घ्यावा नाय, या भीतीनं परशानी तोंडाला कुलूप घातलं व्हतं.

शेवटी जिवावर उदार होऊन गणपानं व्हय भरली. ठरवल्याप्रमाणे अलकि पाण्यात घसरली. बायांचा आरडाओरडा झाला. गणपानं देवाचं नाव घेऊन डोळं झाकूनच पाण्यात उडी मारली. अलकीनं त्याला धरला. त्यानेही पाठीमागून तिच्या कमरेला मिठी मारली. अलकीनं पोहत पोहत किनारा गाठला. तळाला पाय टेकल्यावर त्याला सांगितलं, ''मला खांद्यावर उचलून बंधाऱ्यावर जा.''

सगळ्या वाडीत बोभाटा झाला– 'गणपा होता म्हणून अलकी वाचली.' पण बघणाऱ्या बाया म्हणत, 'जणू गणपाच तिच्या पाठीला चिकटला, अन् तिनंच त्याला पोहत किनाऱ्यावर आणला असं वाटत व्हतं...'

मग लखा सातव म्हणाला, ''असंच करावं लागतंय. पाण्यात पडलेलं माणूस पाठीवर घेतलं की घाबरून त्यानं पुढच्याचं नरडं आवळलंच म्हणून समजायचं. मग दोघंही खलास. गणपा पट्टीचा पोहणारा म्हणून पोर वाचली.''

अशी चर्चा सहा महिने वाडीत सुरू होती. यमाच्या तावडीतून पोरीला सोडवली म्हणून तिच्या



**शेवटी जिवावर उदार होऊन गणपानं व्हय भरली. ठरवल्याप्रमाणे अलकी पाण्यात घसरली. बायांचा आरडाओरडा झाला. गणपानं देवाचं नाव घेऊन डोळं झाकूनच पाण्यात उडी मारली. अलकीनं त्याला धरला.**

आईचीही टकळी बंद झाली.अन् गणपाचं व अलकीचं एकदाचं वाजलं. मग विसर्जनाच्या वेळी अशा पट्टीच्या पोहणाराला नारबानी पाण्यात ढकलला यात विशेष असं कोणालाच काही वाटलं नाय. पाऊसपाणी कमी झाल्यामुळे बंधाऱ्याला यंदा डोक्याइतकंच पाणी होतं. तरी गणपा गटांगळ्या खाऊ लागल्यावर तो गंमत करतोय असंच सर्वांना वाटलं. मग बघेही गमतीने टाळ्या वाजवू लागले. बाया माणसाच्या घोळक्यात अलकीही होती. तिने गणपाची दशा पाहिल्यावर ती पुढं झाली.तोंडासमोर भोंग्यासारखा हात धरून जोरात ओरडली, ''गणपा, बेडूक बन, गणपा, बेडूक बन.''

नाकातोंडात पाणी गेलं तरी गणपाने तिचा आवाज ऐकला. बेडूक मागच्या पायाला रेटा देवून पुढे ऊडी मारतो, हे ध्यानात येताच गणपानं तसं केलं. डोक्यापर्यंत बुडाला की पायचा रेटा देऊन उसळी मारायचा. डोकं पाण्याबाहेर आलं की श्वासही घ्यायचा. असं करता करता तो बराच पुढं आला. ठाव लागल्यावर थेट चालतच आला तो किनाऱ्यावर येताच साऱ्यांनी टाळ्या वाजवल्या.

म्होरं होऊन अलकीने त्याला विचारलं, ''कसं जमलं हे सारं?'' त्याची दमछाक झाली होती. शिवाय इतक्या लोकांसमोर तो तरी काय सांगणार? एवढंच म्हणाला, ''जिवावर बेतलं की अगदी सोप्पं.''

सगळ्या लोकांना हा नवराबायकोचा विनोदच वाटला. सर्वांनी टाळ्या वाजवून अन् मोठ्याने हसून त्यांना दाद दिली. अजूनही सारी डुंबरवाडी मात्र गणपाला पट्टीचा पोहणारा म्हणते अन् सुताराचा परशा मग गालात हसतो. ■

# ग्लॅमरस परवीन बाबी



संजीव देवकर
पुणे

जुनागड या गुजरातमधील संस्थानात जन्मलेली परवीन महम्मद अली ही तिच्या अभिनय कारकिर्दीतील काही काळ सर्वात जास्त मानधन घेणाऱ्या अभिनेत्रींपैकी एक होती. या गुणी अभिनेत्रीने अनेक हिट चित्रपट दिले. मात्र आयुष्याच्या उत्तरार्धात मात्र तिने अतिशय एकाकी जीवन व्यतीत केले. या गुणी अभिनेत्रीचा मृत्यू तिच्या तमाम चाहत्यांना विदीर्ण करून गेला.



आज एका अशा अभिनेत्रीबद्दल जाणून घेऊया, जिने सन १९७२ मध्ये मॉडेल म्हणून सुरुवात करत १९७३ सालात 'चरित्र' या हिंदी सिनेम ातून सिने कारकिर्दीचा शुभारंभ केला होता. सत्तर व ऐंशीच्या दशकात तिने एक ख्यातनाम नायिका म्हणून प्रसिद्धी मिळविली होती. सन १९७७ ते १९८० या कालावधीत सर्वात जास्त मानधन घेणाऱ्या नायिकांच्या यादीत तिचे नाव घेतले जात होते. हिंदी सिनेमात हेमा मालिनी, रेखा, झीनत अमान, जया बच्चन, रीना रॉय आणि राखी यांच्या बरोबरीने तिचे नाव घेतले जाई. मात्र अतिशय सुंदर, ग्लॅमरस अशा या नायिकेचा शेवट हा तितकाच दुर्दैवी व रसिकांना खिन्न करणारा झाला.

एकेकाळच्या जुनागड संस्थानाच्या राजघराण्यात जन्म घेतलेली परवीन मोहम्मद अली अर्थात सिनेअभिनेत्री परवीन बाबी ही शेवटपर्यंत अतिशय ग्लॅमरस आणि मॉड या प्रतिमेसह हिंदी चित्रपटसृष्टीत वावरत राहिली. साडीवर स्लीवलेस ब्लाऊज आणि अंगाला






चिकटणारे तंग सूट-कपडे परिधान करण्याची प्रथा चित्रपटसृष्टीत तिनेच प्रथम आणली. फिल्म इंडस्ट्रीत अभिनेत्री झीनत अमान हिच्या आगमनापूर्वीच हिरॉइन परवीन बाबी ही बोल्ड ॲक्ट्रेस म्हणून प्रसिद्धीच्या झोतात राहिली. १९७७ साली जगप्रसिद्ध मासिक 'टाईम'च्या मुखपृष्ठावर झळकणारी ती पहिली भारतीय अभिनेत्री ठरली. हिंदी कलाकार मार्क झुबेर सोबतचा 'ये नजदिकीयाँ' हा परवीन बाबीचा चित्रपट चर्चेचा विषय ठरला होता. या वादग्रस्त चित्रपटातील तिचा रोल ती वास्तवात जगत असलेल्या जीवनाशी मिळता-जुळता होता, असे त्याकाळी बोलले जात होते. दिग्दर्शक महेश भट्ट यांच्या अर्थ सिनेमात अभिनेत्री स्मिता पाटील यांनी पडद्यावर साकारलेली भूमिका परवीन बाबी वास्तवात जगली असे तत्कालीन चित्रपट समीक्षकांनी नमूद केलेले आहे.

> फिल्म इंडस्ट्रीत अभिनेत्री झीनत अमान हिच्या आगमनापूर्वीच हिरॉइन परवीन बाबी ही बोल्ड ॲक्ट्रेस म्हणून प्रसिद्धीच्या झोतात राहिली. १९७७ साली जगप्रसिद्ध मासिक 'टाईम'च्या मुखपृष्ठावर झळकणारी ती पहिली भारतीय अभिनेत्री ठरली.हदी कलाकार मार्क झुबेर सोबतचा 'ये नजदिकीयाँ' हा परवीन बाबीचा चित्रपट चर्चेचा विषय ठरला होता.

दिग्दर्शक बी. आर. इशारा यांच्या १९७३ सालात प्रदर्शित झालेल्या 'चरित्र' या चित्रपटातून परवीन बाबीची चित्रपट कारकिर्द सुरू झाली. त्यानंतर लगेचच १९७४ साली दिग्दर्शक रवी टंडन यांच्या 'मजबूर' या चित्रपटातून अभिनेते अमिताभ बच्चन यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली. पुढे ७० च्या दशकात सुपरस्टार






अमिताभ बच्चन यांच्यासोबत परवीनची चांगली जोडी जमली होती. या जोडीने जवळपास १० सुपरहिट चित्रपट रसिकांना दिले. या सर्व चित्रपटांमध्ये परवीन बाबी अमिताभ यांच्यासमोर अभिनयाच्या उंचीत कुठेही कमी पडल्याचे दिसत नाही. मग तो तिचा ‘मजबूर’ मधला संयमी अभिनय असो अथवा ‘दीवार’मधली मदमस्त अदा; ‘शान’मधील बोल्ड प्रतिमा असो किंवा ‘खुद्दार’मधील मस्तवाल आणि बिनधास्त बाजाची भूमिका... अमर अकबर अँथोनी, देशप्रेमी आणि दो और दो पाँच मधील अभिनय असो, नाहीतर कालिया, महान किंवा नमक हलाल सिनेमातील ग्लॅमरस भूमिका; परवीन प्रत्येक भूमिकेत उठून दिसली. लोकप्रियता आणि ग्लॅमर यामध्ये ती कुठेच मागे नव्हती. इतर कलाकारांसोबत काम केलेले काला सोना, ३६ घंटे, चरित्रहीन, क्रांती, रक्षा, रंगीला रतन, मेरी आवाज सुनो, रज़िया सुलतान, खून और पानी, जानी दोस्त, सुहाग, काला पत्थर, अर्पण, रंग बिरंगी, चोर-पुलीस हे तिचे काही गाजलेले चित्रपट होत.

एका परिघातच जीवन जगताना परवीन बाबीला आयुष्यात स्थिरता अशी मिळालीच नाही. अज्ञातवासाच्या गडद अंधारात परवीन बाबी खोल-खोल कोसळत गेली! व्यसन आणि असुरक्षिततेची जाणीव तिला नैराश्याकडे घेऊन गेली. नैराश्यात ती मानसिक रुग्ण बनत गेली.

मात्र एका परिघातच जीवन जगताना परवीन बाबीला आयुष्यात स्थिरता अशी मिळालीच नाही. अज्ञातवासाच्या गडद अंधारात परवीन बाबी खोल-खोल कोसळत गेली! व्यसन आणि असुरक्षिततेची जाणीव तिला नैराश्याकडे घेऊन गेली. नैराश्यात ती मानसिक रुग्ण बनत गेली. पाठीमागे अफाट संपत्ती आणि बेधडक जगलेले ५० वर्षांचे आयुष्य मागे ठेवून परवीन बाबी नैराश्याच्या गडद अंधारात विरून गेली! ■



अतुल झेंडे
तत्का. उपविभागीय
पोलीस अधिकारी
नाशिक (ग्रामीण)

# आमिष

**निळ्याजांभळ्या सोनेरी वेष्टनात गुंडाळलेले गोड चॉकलेट... छोट्या लालीसाठी हा खाऊ एरवी आनंदाचा ठेवा असला तरी आत्ता मुळीच तसे नव्हते. या आमिषाच्या आड दडली होती एक क्रूर लालसा आणि पाशवी अभिलाषा.**



नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी हा एक तालुका. आवली दुमाला हा या तालुक्यातला छोटासा पाडा. पाड्यात साधारण वीस पंचवीस घरे होती. त्या पाड्याच्या आजूबाजूला अजून दोन-तीन पाडे होते. या सगळ्या पाड्यांचे मिळून ते छोटेसे गावठाण तयार झाले होते.

आवली दुमाला या पाड्याच्या एका बाजूला असलेल्या आपल्या घराच्या ओट्यावर पाच वर्षांची लाली खेळत होती. दुपारची वेळ होती. साधारण चार



**काशिनाथ भोये**
सहा. पोलीस उपनिरीक्षक, घोटी पोलीस ठाणे, नाशिक (ग्रामीण)



**राजेंद्र जाधव**
पोलीस अंमलदार, घोटी पोलीस ठाणे, नाशिक (ग्रामीण)


वाजत आले होते. लालीबरोबर तिची चुलत बहीण काळूबाई ही पण होती. काळूबाई तिच्यापेक्षा दोन वर्षांनी मोठी होती आणि जवळच दोन घरांच्या पलीकडे राहात होती.

लाली आणि काळूबाईचा खेळ अगदी रंगात आला होता. छोटी लाली डाव जिंकण्याच्या बेतात होती, तेवढ्यात पाणी प्यायला म्हणून काळूबाई तिच्या घरी गेली. लाली काहीशी हिरमुसली, पण काळूबाई लवकरच परत येईल या आशेने ती तिची वाट बघत बसली.

दोन-तीन मिनिटे झाली असतील नसतील, एक काळ्या रंगाची सावली लालीच्या दिशेने सरकली. लालीला सुरुवातीला अशी हलणारी सावली बघून थोडी भीती वाटली. पण नंतर तिच्या डोळ्यासमोर तिला खूप आवडणारा आणि फारसा कधी न मिळणारा असा खाऊ आला. सोनेरी जांभळ्या चकचकीत वेष्टणात गुंडाळलेले चॉकलेट! लालीचे डोळे लकाकले. चॉकलेट दाखवणारा राकट पुरुषी हात तिला 'आपल्याबरोबर आपल्या मागे ये' असे खुणावत होता. संमोहित झाल्यासारखी लाली उठली आणि त्याच्या मागे चालू लागली.

***

पाणी पिऊन झाल्यावर काळूबाई परत खेळायला आली तेव्हा लाली तिथे नव्हती. बहुतेक कंटाळून ती घरी निघून गेली असेल असे वाटून काळूबाई पण तिथून निघून गेली.




**हे ऐकून कमळीबाई घाबरली. एकटी कुठे जाऊ शकेल इतकी लाली मोठी नव्हती. ती आपल्या पोरीला शोधायला निघाली. आजूबाजूच्या घरांमध्ये तिने लाली दिसते का याची चौकशी केली. पण लालीचा कुठेही ठावठिकाणा लागेना.**


थोड्या वेळाने आपले काम आटपून लालीची आई कमळीबाई लालीला बोलवायला आली. पाहते तर काही वेळापूर्वी ओट्यावर खेळणाऱ्या लालीचा पत्ताच नाही! काळूबाई पण गायब!!

कमळीला नवल वाटले. ती आपल्या जावेकडे गेली. घराबाहेर अंगणात काळूबाई फतकल मारून काहीतरी खेळत बसली होती.

''काय गं काळे, आमची लाली कुठे गेली? तुम्ही मगा खेळत होतात ना आमच्या हितं?''

''म्हाईत नाई काकू... मी पाणी प्यायले घरी आली होती, तेव्हा तर लाली होती. नंतर जाऊन पाहिलं तर लाली कुटं दिसंना. मला वाटलं कंटाळून कुटं गेली आसंल किंवा घरात जाऊन झोपली आसंल... म्हणून मग मी पण निगून आली.''

हे ऐकून कमळीबाई घाबरली. एकटी कुठे जाऊ शकेल इतकी लाली मोठी नव्हती. ती आपल्या पोरीला शोधायला निघाली. आजूबाजूच्या घरांमध्ये तिने लाली दिसते का याची चौकशी केली. पण लालीचा कुठेही ठावठिकाणा लागेना. कमळीबाई हवालदिल झाली. तिचा जीव थाऱ्यावर राहीना. पोरीला शोधायचं तरी कुठं? या विचाराने तिचे काळीज धडधडू लागले.

कमळीने अखेर घोटी पोलीस ठाणे गाठले.

''साहेब... माझी पोरगी... माझी पोरगी कुटं दिसंना झालीया. काय बी करा पन तिला शोधा,'' असे म्हणत तिने मोठ्ठा गळा काढला.

समोर बसलेल्या हतबल दिसणाऱ्या त्या २५-२६ वर्षाच्या तरुण स्त्रीला कसे शांत करावे हे अंमलदारांना समजेना.

त्यांनी तिला पाणी देण्याचा प्रयत्न केला. पण तिने ते नाकारले. खुर्चीवरून उठून ती खाली जमिनीवर बसली आणि कपाळ बडवू लागली. छाती पिटू लागली. शेवटी त्या अंमलदारांनी आपल्या एक दोन सहकाऱ्यांच्या मदतीने तिला कसेबसे शांत केले.

''ताई, शांत व्हा. तुमची मुलगी तुम्हाला मिळायला हवी आहे ना लवकरात लवकर? मग आम्हाला आधी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं द्या.''

हे ऐकल्यावर कमळीचा रडण्याचा भर काहीसा कमी झाला. तिने होकारार्थी मान डोलावली.

''याआधी तुम्ही तुमच्या पोरीला कधी बघितलं होतं?''

''दुपारची ओट्यावर खेळत बसली होती की काळूबाईच्या संगं,''

''ही काळूबाई कोण?''

''पुतनी माझी.''

''बरं पुढे?''

''मी माझं काम करायला घरात गेले. ओट्यावर दोघी खेळत होत्या. काही वेळाने तिथं येऊन बगितलं तर दोघींचाबी पत्ता नाई. पन काळूबाई तिच्या घरात सापडली. आन माझी पोर... काय म्हाइती साहेब माझी पोर कुटं असेल...'' असे म्हणत तिने परत ऊर बडवायला सुरुवात केली.

''तुम्ही सगळीकडे शोधलंत तिला?''

''हां तर साहेब! सगळा पाडा धुंडाळून झाला. सगळी घरं पायाखालून घातली. पोरीचा कुटं बी पत्ता नाई.''

''बरं. गावात असं कोणी आहे का ज्याच्याशी तुमचं काही भांडणतंटा, वादावादी, दुष्मनी असं काही आहे?''



**त्यांनी तिला पाणी देण्याचा प्रयत्न केला. पण तिने ते नाकारले. खुर्चीवरून उठून ती खाली जमिनीवर बसली आणि कपाळ बडवू लागली. छाती पिटू लागली.**

''नाई ना साहेब. तसं पन काही नाई.''

''तुमचा कोणावर संशय?''

''नाई.''

''ठीक आहे,'' असे म्हणत त्या अंमलदारांनी कमळीबाईची फिर्याद दाखल करून घेतली आणि ही हकीगत आपल्या वरिष्ठांच्या कानावर घातली.

या घटनेचा तपास करण्यासाठी तत्कालीन उपविभागीय पोलीस अधिकारी (नाशिक ग्रामीण) अतुल झेंडे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस पथक गठीत करण्यात आले. पोलिसांनी सर्वप्रथम गुन्ह्याच्या घटनास्थळाला भेट देऊन घटनास्थळाचा सविस्तर पंचनामा केला. त्यानंतर पोलिसांनी लालीची आई कमळी हिच्याकडेही चौकशी केली. त्याचप्रमाणे घटनास्थळाच्या परिसरात राहणाऱ्या वेगवेगळ्या लोकांकडे पोलीस चौकशी करू लागले.

ही चौकशी सुरू असताना एक चाळिशीचा माणूस पोलिसांच्या नजरेस पडला. त्याला बहुधा पोलिसांना काहीतरी सांगायचे असावे, पण त्याची सरळ समोर येऊन बोलण्याची हिंमत नव्हती. लांबवर एका झाडाच्या आडोशाला उभे राहून तो विडीचा झुरका घेत पोलिसांकडे चोरट्या नजरेने बघत होता.

''एऽऽ इकडे ये तर जरा...'' अखेर पोलीस पथकातील एका अंमलदारांनी त्याला हटकलेच.

तो हळूच पुढे सरकला.

''जी साहेब...''

''बोल काय बोलायचं ते. इथे

कुणाला घाबरायचं कारण नाही.''

त्याला आश्चर्य वाटले. किती अचूक ओळखले होते पोलिसांनी.

''बोल, बोल. त्या पोरीबद्दल तुला काही माहिती आहे का?''

''साहेब, तिला भोलाबरोबर जाताना पाहिली शेवटची.''

''कोण भोला?''

''गावातलाच आहे साहेब.''

''कुठे राहतो? त्याचं घर दाखव...''

तो जरा अस्वस्थ झाला. का कू करू लागला.

''काळजी करू नकोस. हे तू आम्हाला सांगितलं आहेस हे कुणालाही कळणार नाही. आलं लक्षात? लांबून दाखव त्याचं घर. मग तर झालं?''

तो तयार झाला.

त्याने पोलिसांना घर दाखवल्यावर पोलिसांनी सापळा रचून भोलाला ताब्यात घेतले.

''चल बोल. पोरगी कुठे आहे?''

''कोन पोरगी साहेब?'' भोला काहीच माहिती नसल्याचा आव आणत बोलला.

''एऽऽ जास्त शहाणपणा, चलाखी चालायची नाही इथे. मुकाट्याने बोल, ती लाली कुठाय? तिला तुझ्याबरोबर जाताना काही लोकांनी पाहिलंय. त्यामुळे खोटं बोलायचं मनातसुद्धा आणू नकोस. अन आता बोल पटापट.''

''ती पोरगी आता न्हाई...'' तो पोलिसांची नजर चुकवत बोलला.

''म्हणजे?''

''ती मेली?''

''कशी? तू काय केलंस? तूच मारलंस ना तिला?''



**भोलाने ती जागा दाखवली. त्या जागी लालीच्या सडलेल्या अवस्थेतल्या मृतदेहाचे अवशेष पोलिसांना सापडले. केवळ हाडांचा सापळा उरलेल्या त्या अवशेषांची डीएनए तपासणी करून मृतदेहाची ओळख पटवणे गरजेचे होते.**

त्याने मान हलवली.

''तिला त्या दिवशी पाह्यलं आणि कसंतरीच झालं. मग वाटलं थोडी मजा करावी. ती खेळत होती तवा चाकलेट घेऊन गेलो. मला म्हाईत होतं ती चाकलेटाला नाय म्हणणार नाय. चाकलेट दाखवून तिला बोललो चल माझ्यासंगं. ती पन माझ्या मागं यायला लागली. आम्ही असे थोडेसेच दूर गेलो आनि मी काम साधायला गेलो, तर तिनं आरडाओरडा सुरू केला. मला कळंना काय करावं. तिला गप करायला गेलो तर अजूनच आरडाओरडा. कुनी पाह्यलं असतं तर मुडदाच पाडला असता माझा! गावचे लोकं लय बेक्कार हायेत. समोर एक दगड दिसला तो उचलला आणि घातला तिच्या डोक्यात. पन काय म्हाईत ती मेली की न्हाई. डोस्कं तर पाऽऽर भैसाटून गेलेलं. त्या पोरीला जित्तं सोडून फायदा नव्हता. गळा आवळून मारलं तवा जिवात जीव आला.''

''बॉडी कुठे लपवलीस?''

भोलाने ती जागा दाखवली. त्या जागी लालीच्या सडलेल्या अवस्थेतल्या मृतदेहाचे अवशेष पोलिसांना सापडले. केवळ हाडांचा सापळा उरलेल्या त्या अवशेषांची डीएनए तपासणी करून मृतदेहाची ओळख पटवणे गरजेचे होते. घटनास्थळावरून लालीच्या अंगावरील कपडे तसेच इतर महत्त्वाचे जैविक व भौतिक पुरावे जप्त करण्यात आले. पीडित बालिकेच्या प्रेताचा इन्क्वेस्ट पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला. शवविच्छेदनानंतर मृतदेहाचे अवशेष ॲनॅटॉमी विभागाकडे पाठवण्यात आले. पीडितेचे डीएनए नमुने राखून ते तिच्या आई-वडिलांच्या डीएनए नमुन्यांसोबत तपासणीकरिता न्यायसहायक

प्रयोगशाळेकडे पाठवण्यात आले. गुन्ह्याच्या वेळी आरोपीच्या अंगावर असलेले कपडे जप्त करण्यात आले. आरोपीचे कपडे, त्याने गुन्ह्यात वापरलेले हत्यार, व गुन्ह्यातील इतर जप्त मुद्देमाल हे सर्व तपासणी करण्याकरिता न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांच्याकडे पाठवण्यात आले. याबाबत प्रयोगशाळेकडून पूरक असा अहवाल प्राप्त झाला. ॲनॅटॉमी विभागाकडील अहवालदेखील गुन्ह्यामध्ये समाविष्ट करण्यात आला. त्याचप्रमाणे मयत बालिकेचे डीएनए हे तिचे पालक म्हणजे कमळीबाई आणि तिचा नवरा रघू यांच्यासोबत जुळत असल्याबद्दलचा अहवाल प्राप्त झाला. गुन्ह्याचा तपास पूर्ण करून आरोपी विरुद्ध मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

यातील आरोपीला भादंवि कलम ३०२ अन्वये आजन्म कारावास व दहा हजार रुपये दंड, भादंवि कलम ३६३ अन्वये सात वर्षे सश्रम कारावास व पाच हजार रुपये दंड, भादंवि कलम २०१ अन्वये सात वर्षे सश्रम कारावास व पाच हजार रुपये दंड, लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण (पोक्सो) अधिनियम कलम ७ करिता कलम ८ अन्वये पाच वर्षे सश्रम कारावास आणि दोन हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावण्यात आली आहे.

नाशिक (ग्रामीण) चे तत्कालीन उपविभागीय पोलीस अधिकारी अतुल झेंडे, सहायक पोलीस उपनिरीक्षक काशिनाथ भोये (पैरवी अधिकारी), पोलीस अंमलदार राजेंद्र जाधव यांनी सदर गुन्ह्याचा तपास उत्कृष्ट प्रकारे पूर्ण केला आहे. सदर गुन्हेतपासाची गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयाकडून मे २०२५ या महिन्यासाठी सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी बक्षिसाकरिता निवड करण्यात आली आहे.

■ ***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***

# युद्ध नको बुद्ध हवा


**अणूरेणू आगियल डोंब जो,**
**उधळवूनिया पेटवी आकाश।**
**थांबवा युद्ध आग्यावेताळांनो,**
**आणि चराचराचा विध्वंस।।**

**चंद्र ग्रहावर स्वार होवोनि,**
**वैज्ञानिक पाहातात पृथ्वी।**
**अणू परमाणू जे घात करी,**
**लपून बसावे बंकरखाली।।**

**अग्निबाण जे कोसळूनी,**
**वेध घेत अचूक शत्रुतळाचे।**
**त्राही त्राही त्रस्त होवोनि ,**
**जगही सारे गांजूनिया गेले।।**

**कोण शत्रू नि कोण मित्र!**
**वसुधैव कुटुंबकमाचे नाते।**
**अंधश्रद्धा आणि अज्ञानाचे,**
**जातिभेद हे धर्मवेड खुळे।।**

**संगर मानवाशी मानवाचा,**
**न ठरो अंतकाळ सृष्टीचा।**
**सहिष्णू मानव उद्धाराया,**
**जगाला युद्ध नको बुद्ध हवा।।**



**रघुनाथ मोहिते**
**मुंबई.**

## तपासकथा




नितीन ढेरे
पोलीस निरीक्षक
जयगड पोलीस ठाणे
रत्नागिरी


# विश्वासघाताचा बळी

**१५ डिसेंबर २०२२ या दिवशी रत्नागिरी जिल्ह्यातील जयगड येथील दी डेक्कन ओव्हरसीज प्रा. लि. येथे काम करणारी नीलम कंपनीत जाण्यासाठी नेहमीसारखी बाहेर पडली. पण त्या दिवशी पुढे काय होणार आहे याची तिला जराही कल्पना घराबाहेर पडताना नव्हती. ज्या रमेशवर तिने विश्वास ठेवला त्याने सार्थ ठरवला का तिचा विश्वास?**



डिसेंबर १५, २०२२. रोजच्याप्रमाणे कामाला जाण्यासाठी म्हणून नीलमची लगबग सुरू होती. रत्नागिरी जिल्ह्यात जयगड तालुक्यामध्ये असलेल्या दी डेक्कन ओव्हरसीज प्रा. लि. या कंपनीत ती काम करत होती. घरातले आवरून तातडीने कसेही करून वेळेत कंपनीत पोहोचायचे हा तिचा रोजचा शिरस्ता होता. पण आज मात्र निघायलाच उशीर झाला होता

''चला अप्पा, निघते मी. तुमची भाजी पोळी करून ठेवली आहे. भूक लागली की खाऊन घ्या.'' आपल्या सासऱ्यांना असे सांगून ती घराबाहेर पडली. सुदैवाने आजही नीलमला एका


**शैलेश पाटील**
पोलीस अंमलदार
जयगड पोलीस ठाणे
रत्नागिरी

**वंदना लाड**
कोर्ट पैरवी
रत्नागिरी


माणसाने बाईकवरून सोडून मदत केली. त्यामुळे तिला आज वेळेत कंपनीत पोहोचणे शक्य होणार होते. थोड्याच वेळात ती कंपनीच्या गेट मधून आतमध्ये शिरली. आतमध्ये आल्याआल्या हजेरी पुस्तकात नोंदणी करून ती आपल्या कामासाठी जाण्यास निघाली.

''आज उशीर झाला?'' हजेरी पुस्तक पुढे करणाऱ्या काकांनी तिची चौकशी करत विचारले.

''हां ना, आज घरातूनच निघायला उशीर झाला आणि गाडीपण भेटली नाही लवकर.'' आपल्या हजेरी पुस्तकात नोंदणी करता करता तिने उत्तर दिले. मग ती कंपनीच्या स्टोअर रूममध्ये गेली. तिथे कामासाठी गरजेचे असलेले ॲप्रन, ग्लोव्हज इत्यादी कपडे घातले. 'कसं होणार काम आज सगळं? अजून किचनमध्ये गेलीपण नाहीये मी.' या विचारातच तिने तिच्यासमोर असलेली गेस्टरूम उघडली.

तिने झाडून पुसून सगळी रूम लख्ख केली. आता फक्त तिथे असलेल्या कोचवरती छानशी चादर अंथरणे बाकी होते. या सगळ्या गोष्टी करत असताना आपल्या आवडीची गाणी गुणगुणणे हा तिचा नेम होता. आज ती तिच्या लाडक्या आशाताईंचे 'घनराऽऽऽणी, घनराणीऽऽ...' हे गाणे गुणगुणत होती. गाणे गुणगुणण्यात ती अगदी दंग होऊन गेली होती. आपल्या मागच्या बाजूला कोणी येऊन उभे राहिले आहे याची तिला जाणीवही नव्हती. तिला घातलेल्या मिठीमुळे ती भानावर आली.




**थोड्या वेळाने रमेश खोलीच्या बाहेर आला आणि तिथून निघून गेला. थोड्या वेळाने पवन नावाचा रंगकाम करणारा एक कामगार आपल्या चेहऱ्यावरचा रंग नीट निघाला आहे की नाही, हे बघण्यासाठी म्हणून तिथेच जवळ असलेल्या आरशापाशी आला आणि आरशात बघू लागला.**


''तू आहेस होय! मला वाटलं...''

''का? तुला दुसरं कोणी हवं होतं का इथे?'' पंचावन्न वर्षीय रमेशने नाकपुड्या फुगवत विचारले.

''तसं नाही काही. तू उगाच काहीतरी खूळ घेतलंय डोक्यात.''

''हे बघ, मला नाही फसवायचं. खरं सांग... तू कोणाबरोबर सुत जुळवलंय?''

''जाऊ दे की ते सगळं. एकतर आपण कालनंतर आत्ता भेटतोय आणि तुला भांडायचं असेल तर मग..''

''मग काय? बोल की! गप का? दातखीळ बसली का काय तुझी?''

''राहू दे.. मला कामं आहेत खूप.'' नीलमने त्यांच्या हाताला जोराने धक्का देत बाजूला केले.

''एवढा माज? ही गुर्मी?? तू थांब जरा...''

थोड्या वेळाने रमेश खोलीच्या बाहेर आला आणि तिथून निघून गेला. थोड्या वेळाने पवन नावाचा रंगकाम करणारा एक कामगार आपल्या चेहऱ्यावरचा रंग नीट निघाला आहे की नाही, हे बघण्यासाठी म्हणून तिथेच जवळ असलेल्या आरशापाशी आला आणि आरशात बघू लागला. यावेळी त्याला समोर जे दिसले, ते बघून तो पुरता हादरला. समोरचा प्रकार बघता त्याने जयगड पोलीस ठाण्यात फोन केला. ठाण्यात कार्यरत पोलीस निरीक्षक नितीन ढेरे यांना सदर बातमी समजताच त्यांनी त्वरेने घटनास्थळी धाव घेतली. काही वेळातच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. एव्हाना संपूर्ण कंपनीत ही बातमी पसरली असल्याने घटनास्थळी अनेक लोक जमा झाले होते.

''कोणी केला होता फोन?'' साहेबांनी तिथे असणाऱ्या लोकांकडे बघून विचारणा केली.

''मी केला होता.''

तिथे असलेल्या जमावातून कपड्यांवर रंगाचे डाग असलेल्या पवनने पुढे होत उत्तर दिले.

''तू?''

''मी पवन. मी माझं काम झाल्यावर इथे आरशात चेहऱ्यावरचा रंग गेला की नाही हे बघायला आलो होतो, तेव्हा हे सगळं बघितलं.''

पोलिसांनी त्या खोलीच्या दरवाजाला लावलेली कडी उघडली. आतमधले दृश्य बघ्यांचा थरकाप उडवणारे होते. त्यांच्या डोळ्यांसमोर बत्तीस वर्षीय नीलम रक्ताच्या थारोळ्यात पडली होती. पोलिसांनी तिला तपासले तेव्हा ती जिवंत असल्याचे पोलिसांना समजले. साहेबांनी सहकारी पोलीस अंमलदार शैलेश पाटील यांना ॲम्ब्युलन्स बोलवण्याची सूचना केली. थोड्याच वेळात तिथे ॲम्ब्युलन्स दाखल झाली. तिला तातडीने रुग्णालयात उपचारार्थ नेण्यात आले. पण काही कारणास्तव उपचारार्थ तिला रत्नागिरी येथील जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. तिथे तिच्यावर तातडीने उपचार सुरू झालेदेखील. पण डॉक्टरांच्या प्रयत्नांना यश आले नाही. नीलमची प्राणज्योत मालवली.

***

दरम्यानच्या काळात पोलिसांनी घटनास्थळाचा दोन पंचांसमक्ष पंचनामा केला. घटनास्थळावरून एक लेडीज पर्स, लेडीज चप्पल, एक बटन, जमिनीवर तसेच फर्निचरवर पडलेले रक्त इत्यादी गोष्टी पोलिसांनी संकलित केल्या. ती पर्स आणि चप्पल नीलमची असल्याचे समोर आले.

''नीलम सोडून तुमच्या इथे किती कर्मचारी काम करतात? त्या सर्वांना इथे समोर आणा.'' साहेबांनी सूचना केली.



**पोलिसांनी त्या खोलीच्या दरवाजाला लावलेली कडी उघडली. आतमधले दृश्य बघ्यांचा थरकाप उडवणारे होते. त्यांच्या डोळ्यांसमोर बत्तीस वर्षीय नीलम रक्ताच्या थारोळ्यात पडली होती. पोलिसांनी तिला तपासले तेव्हा ती जिवंत असल्याचे पोलिसांना समजले.**

त्यानुसार सर्व कर्मचारी पोलिसांसमोर हजर झाले. त्यावेळी रमेश नावाचा एक कर्मचारी तेथे नसल्याचे तपासात पुढे आले. पोलिसांनी कंपनीच्या रेकॉर्ड्समधून रमेशचा पत्ता हस्तगत केला.

तपास सुरू असतानाच साहेबांना रत्नागिरी जिल्हा रुग्णालयातून फोन आला. नीलम मृत झाल्याचे रुग्णालयाद्वारे सांगण्यात आले. नीलमच्या मृतदेहाचा इन्क्वेस्ट पंचनामा करण्यात आला. तिच्या डोक्यावर रॉडसारख्या गोष्टीने जोरदार वार केल्याच्या खुणा होत्या. तिची नखे, केस व इतर नमुने पोलिसांनी संकलित केले. साहेबांनी तिचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. तपासात नीलम आणि रमेश यांच्याशी संबंधित काही महत्त्वाच्या गोष्टी पोलिसांसमोर आल्या. त्याच्या आधारे तसेच पोलिसांना मिळालेल्या माहितीच्या आधारे संशयित रमेशचा तपास सुरू झाला. त्याच्या शोधार्थ साहेबांनी तपासपथके रवाना केली. त्यांनी तो कुठे असू शकतो या दृष्टीने तपास करत असताना पोलिसांना निरनिराळ्या मार्गाने मिळालेल्या माहितीच्या आधारे कोल्हापूर येथून अटक केली. आरोपित रमेशला घेऊन पोलिसांचा ताफा जयगडच्या दिशेने निघाला. काही तासांतच तपासपथक रमेशला घेऊन जयगड पोलीस ठाण्याच्या आवारात दाखल झाले. संपूर्ण रस्ताभर रमेश शांत बसून होता. कपडे मळलेले होते. केस अस्ताव्यस्त झाले होते.

''उत्तर खालती.''

पोलिसांच्या या बोलण्याने तो अचानक भानावर आल्यासारखे करू लागला.

''साहेब, त्याला आणलंय.'' अंमलदार पाटील यांनी साहेबांना

कडक सॅल्यूट केला. ढेरे साहेब आता रमेशच्या समोर येऊन उभे राहिले.

''रमेश नाव ना तुझं?''

साहेबांच्या या प्रश्नावर त्याने होकारार्थी मान हलवून साहेबांकडे बघितले.

''१५ डिसेंबरला तू कुठे होतास?''

''काय साहेब! मी गरीब माणूस... अजून कुठे असणार? कंपनीत होतो.''

त्याने दिलेल्या उत्तरावर साहेब हसले, पण त्यांच्या त्या हास्यात बराच अर्थ दडलेला होता.

''साहेब काय विचारत आहेत ते कळलं नाही तुला? पटकन खरं काय ते सांग कुठे होतास त्या वेळी?''

''साहेब चेष्टा करताय गरिबाची? मी कंपनीत होतो.''

''हे बघ, थाप नाही पाहिजे. आता जर तू खोटं बोललास तर त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील.'' हे बोलताना साहेबांचा आवाज चढला. साहेबांचे ते रूप बघून आता आपली सुटका नाही हे रमेशच्या लक्षात आले.

''मी गेलो होतो कंपनीत. पण थोड्या वेळाने बाहेर पडलो.''

''त्या दिवशी काय झालं नेमकं?''

''१५ तारखेला रोजच्याप्रमाणे नीलमला घाईघाईत मी एका माणसाच्या बाईकवरून उतरताना मी बघितलं. ती रोज असंच करत होती. आमचं प्रेम होतं एकमेकांवर. पण तिला माझ्या प्रेमाची किंमतच नव्हती साहेब. म्हणून मी ठरवलं, की तिच्याशी बोलून एकदाचा या प्रकरणाचा काय तो सोक्षमोक्ष लावायचा. माझं काम झाल्यावर मध्ये थोडा वेळ होता. मी तिचा शोध घेत घेत रेस्टरूमपाशी पोचलो. तिथे



**पोलिसांनी रमेशकडून गुन्ह्यात वापरलेले हत्यार हस्तगत करून सर्व संपादित केलेल्या गोष्टी तपासणीसाठी न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेकडे पाठवल्या. तसेच नीलमचा शवविछेदन अहवाल पोलिसांनी प्राप्त केला.**

ती गाणं गुणगुणत होती. मी तिला मागून मिठी मारली. तिला पहिल्यांदा ओळखूच आली नाही. मग समजलं मी आहे ते. मी तिला विचारलं की तिला दुसरं कोणी अपेक्षित होतं का ते... तर ती सरळ उत्तर द्यायचं सोडून विषय भरकटवायला लागली. मी बोललो तिला, मी असताना ती दुसऱ्यांच्या मागे बसून का येते? तर ती जास्तच माज करायला लागली. आपलं टाळकं सटकलं. तिथे किचनमध्ये वापरतात तो रॉड पडला होता तोच घातला तिच्या डोक्यात. ती खाली पडली. मला काय करावं ते सुचेना. मग मी बाहेर आलो आणि दाराला कडी लावून बाहेर पडलो.''

पोलिसांनी रमेशकडून गुन्ह्यात वापरलेले हत्यार हस्तगत करून सर्व संपादित केलेल्या गोष्टी तपासणीसाठी न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेकडे पाठवल्या. तसेच नीलमचा शवविछेदन अहवाल पोलिसांनी प्राप्त केला. पोलिसांनी मा. न्यायालयात आरोपित रमेशविरोधात दोषारोपपत्र दाखल केले.

समोर आलेले सर्व साक्षीपुरावे ग्राह्य धरून तसेच दोन्ही बाजू ऐकून घेत मा. न्यायालयाने रमेशला भादंवि कलम ३०२ अन्वये आजन्म सश्रम कारावास आणि १० हजार रुपये दंड तसेच कलम ३४२ नुसार १ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा दुनावली आहे.

सदर प्रकरणाचा तपास जयगड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन ढेरे, पोलीस अंमलदार शैलेश पाटील आणि वंदना लाड (कोर्ट पैरवी) यांनी अत्यंत कौशल्याने व चतुराईने पूर्ण केला आहे. ■ ***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***



आशिष बोरकर
सहा. पोलीस निरीक्षक
सावली पोलीस ठाणे
चंद्रपूर

# एक काळरात्र...

चंद्रपूरमध्ये मे महिन्यातील एका काळ्या रात्री घडलेल्या प्रकाराने सावली व आसपासचा परिसर हादरला. 'त्या' रात्री बाळंतपणासाठी माहेरी आलेल्या मायाच्या घरात एक माणूस शिरला. घराचे दार बंद असताना घरात शिरायचे कसे हे त्याला चांगल्या प्रकारे ठाऊक होते. तो घरात आल्यावर क्षणार्धात होत्याचे नव्हते झाले. कोण होता तो मध्यमवयीन माणूस? त्याचा घरात राहणाऱ्यांशी काही संबंध होता का? सावली पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी कशी उकल केली या गुन्ह्याची?



मे महिना नुकताच सुरू झाला होता. २०२२ या वर्षी आकाशातला सूर्य आग ओकत होता. उन्हाच्या काहिलीने चंद्रपूर व आसपासचा परिसरातील लहानमोठे त्रस्त झाले होते. अशावेळी माया आणि ममता या सासू-सुना मायाच्या माहेरी आल्या होत्या. निमित्त होते मायाचे बाळंतपण.

''हो.. हो... काय झालं? काय होऊन राहिलं माज्या बाबूले?'' कडेवरच्या तान्ह्याला हाताने थोपटत ममता बाहेरच्या खोलीत एका लयीत फेऱ्या घालत होती. त्या उन्हाचा त्रास लहानग्यालाही होत होता. त्यामुळे त्याचे रडणे अखंड सुरू होते.



**शशिधर चिचखेडे**
पोलीस उपनिरीक्षक
सावली पोलीस ठाणे
चंद्रपूर



**दर्शन लाटकर**
पोलीस अंमलदार
सावली पोलीस ठाणे
चंद्रपूर



**धीरज पिदुरकर**
पोलीस अंमलदार
सावली पोलीस ठाणे
चंद्रपूर



**सपना बेल्लावार**
पोलीस अंमलदार
(कोर्ट पैरवी)
चंद्रपूर

ममता फेऱ्या घालत असताना तिची सून माया आतल्या खोलीतून तेथे आली.

''आई, तुम्ही झोपा आता. द्या त्याला माझ्याकडं. माझं झालं आतलं आवरून सगळं. तुमचं अंथरूणपण घालून ठेवलं.''

''हो ते सगळं खरं आहे, पण हा बघ ना. झोपत नाही अजून.''

''म्हणून तर म्हटलं द्या त्याला माझ्याकडे.'' असे म्हणत आपल्या मुलाला घेण्यासाठी तिने हात पुढे केले. ममताने अलगद आपल्या कडेवरून त्या बाळाला मायाकडे सोपवले.

''चलाऽऽऽ, गाईगाई करायची ना बाबू आपल्याला? तू गाईगाई केली नाही, तर आई कशी झोपणार? गाईगाई करायची हांऽऽऽ.''

त्या एवढ्याशा जिवावर मात्र आपल्या आईच्या, आजीच्या बोलण्याचा तिळमात्र परिणाम होत नव्हता. शेवटी दहा साडेदहा वाजेपर्यंत त्याला, मायाने तिच्या दिवाणाशेजारी असलेल्या पाळण्यात ठेवून झोके दिले. हळूहळू त्याचे रडणे थांबले. आता मायावरही निद्रेचा अंमल चढला. एव्हाना सगळी गल्ली शांत झाली होती. आता ते घरही शांत झाले.

अचानक मायाच्या घरातून आरडाओरडा ऐकू आला. तो



**काहींनी पुढे होत माया आणि ममता यांना तातडीने जवळपासच्या रुग्णालयात नेले. त्या रुग्णालयातून त्यांना जिल्हा रुग्णालयात नेण्यासंबंधीच्या सूचना केल्या गेल्या. एव्हाना सावली पोलीस ठाण्यात सहा. पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत असणारे आशिष बोरकर हे आपल्या पथकासह तेथे पोहोचले.**

गोंगाट ऐकून आजूबाजूचे लोक तातडीने मायाच्या घराकडे धावले. त्या घरातले दृश्य पाहून आलेल्या लोकांमध्ये एकच गोंधळ उडाला. त्यांच्यातल्याच कोणीतरी घाईघाईने पोलिसांना फोन लावला.

''एऽऽऽ, चला चला. उचला त्यांना. लागलीच दवाखान्यात घेऊन जाऊ'' असे म्हणत काहींनी पुढे होत माया आणि ममता यांना तातडीने जवळपासच्या रुग्णालयात नेले. त्या रुग्णालयातून त्यांना जिल्हा रुग्णालयात नेण्यासंबंधीच्या सूचना केल्या गेल्या. एव्हाना सावली पोलीस ठाण्यात सहा. पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत असणारे आशिष बोरकर हे आपल्या पथकासह तेथे पोहोचले होते.

''डॉक्टर, व्हॉट इज द सिच्युएशन? आम्ही बोलू शकतो त्यांच्याशी?''

''वेल... तुम्ही त्यांच्याशी बोलू शकता, पण फार स्ट्रेस देऊ नका. त्यांच्या डोक्यावर आणि बाकी अवयवांनाही बरंच जोरदारपणे हिट केलं गेलंय.''

''थँक्यू डॉक्टर.'' डॉक्टरांशी हस्तांदोलन करत बोरकर साहेब म्हणाले. त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना दोघींच्या बेडपाशी जाण्याचा इशारा केला. त्यांच्या जबाबावरूनच पोलिसांनी भादंवि कलम ३२५ नुसार गुन्हा दाखल केला. नंतर पोलिसांनी दोन पंचांसमक्ष घटनास्थळाचाही पंचनामा केला. घटनास्थळावरून रक्ताचे डाग असलेले कपडे जप्त

करण्यात आले. या दरम्यानच्या काळात ममता मृत झाल्याचे पोलिसांना कळविले गेले. आधी दाखल केलेल्या कलमात ३०२ या कलमाची वाढ करण्यात आली. साहेबांनी ममताच्या मृतदेहाचा इन्क्वेस्ट पंचनामा करून तिचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. इन्व्हेस्ट पंचनाम्यात ममताच्या डोळे, नाक आणि कपाळ या अवयवांवर घातक वार केल्याच्या खुणा असल्याचे पोलिसांना आढळले. ममताप्रमाणेच मायाच्या शरीरावरही तशाच प्रकारच्या खुणा पोलिसांना जबानी घेताना दिसल्या होत्या.

पोलिसांसमोर आता पुढचे आव्हान होते, ते म्हणजे संशयितास अटक करणे. पोलिसांनी संशयिताचा माग काढण्याचे काम युद्धपातळीवर सुरू केले. त्यांना मिळालेल्या माहितीनुसार संशयित विलास हा ट्रक ड्रायव्हर असून तो भारतात सर्वत्र ट्रक घेऊन मालाची डिलिव्हरी करण्याचे काम करत असे. पोलिसांनी विलासचा शोध सुरू केला.

''एक काम करा. आपल्या खबऱ्यांचं नेटवर्क ॲक्टिव्हेट करा. आय वॉन्ट हिम बिहाइंड द बार एट एनी कॉस्ट.'' साहेबांनी आपल्या सहकाऱ्यांना सूचना केली. या तपासकामी पोलीस गावातील पोलीस पाटील यांची मदत घेत होते. विलासचा शोध सुरू असतानाच सावली पोलीस ठाण्यात पोलीस अंमलदार म्हणून कार्यरत असणाऱ्या दर्शन लाटकर यांच्या फोनची रिंग वाजली. फोनवरचे नाव वाचताच लाटकर यांनी तातडीने फोन उचलला

''साहेब...''

''हे बघ, बोल पटकन. वेळ नाहीये माझ्याकडे.''

''बस काय साहेब! ऐकून तर घ्या आधी. तुमच्या फायद्याचं सांगून राहिलो आपून. एकदम वंटास खबर आहे.. तुम्हाला पाहिजे असणारा पोपट उडणारे लवकरच भुर्र.. राज्याच्या बाहेर जाणार आहे.''



**साहेबांच्या बोलण्यामागचे कारण त्यांच्या सहकाऱ्यांच्या लक्षात आले. साहेबांच्या सूचनेनुसार तो जाऊ शकतो अशा प्रत्येक लहानमोठ्या रस्त्यावर पोलिसांची पथके प्रत्येक ट्रकची तपासणी करू लागली. अखेरीस पोलिसांच्या प्रयत्नांना यश आले आणि पोलिसांनी लावलेल्या सापळ्यात विलास अडकला.**

''कधी? कुठे?''

अंमलदार साहेबांच्या या प्रश्नावर पलीकडून बोलणाऱ्या व्यक्तीने त्याला समजलेली माहिती सांगितली. माहिती समजताच अंमलदार लाटकर यांनी मिळालेली माहिती आपले वरिष्ठ बोरकर यांच्यापर्यंत पोहोचवली. माहिती कळताच साहेबांनी रस्त्यांचा नकाशा काढला.

''हा युपीकडे निघालाय. त्याला जाताना या रोड्सशिवाय पर्याय नाही. त्यामुळे तो या रोड्सनीच जाणार. त्यामुळे तो आपल्याला एखादा टोलनाका किंवा एखादा रस्त्यांचा जॉईंट अशा कुठल्यातरी ठिकाणी नक्की सापडेल. कम ऑन! क्विक! गाडी काढा. मी परत एकदा सांगतो, आय वॉंट हिम बिहाईंड दी बार्स.''

साहेबांच्या बोलण्यामागचे कारण त्यांच्या सहकाऱ्यांच्या लक्षात आले. साहेबांच्या सूचनेनुसार तो जाऊ शकतो अशा प्रत्येक लहानमोठ्या रस्त्यावर पोलिसांची पथके प्रत्येक ट्रकची तपासणी करू लागली. अखेरीस पोलिसांच्या प्रयत्नांना यश आले आणि पोलिसांनी लावलेल्या सापळ्यात विलास अडकला. संशयित विलासला घेऊन पोलिसांचा ताफा सावली पोलीस ठाण्याच्या दिशेने निघाला. काही वेळातच पोलिसांचे वाहन सावली पोलीस ठाण्याच्या आवारात आले.

''हं...विलास ना तू? बोल. का मारलं तू तुझी मुलगी माया आणि तिची सासू ममता यांना?''

''साहेब, मी कसा मारणार? मारण्यासाठी आधी घरात असायला पाहिजे ना मी?''

''हे बघ, आम्हाला थापा नाही मारायच्या. तुझ्या मुलीनी सांगितलंय आम्हाला, की तू त्या दिवशी रात्री

त्या दोघींना मारलं. त्यामुळे बऱ्या बोलानं खरं सागायचं.''

''मी त्या दोघींले काहून मारू?''

''ते तर तू सांगणार... का मारलं ते?''

''हे बगा साहेब, मले त्यांले मारायचं नव्हतं. पण मी त्यांले चुकून मारलं.

''चुकून मारलं? म्हणजे?''

''मले माही बायको आणि माही पोरगी माया ह्यांले मारायचं होतं.''

''पण का? त्यांना का मारायचं होतं? त्यांनी काय वाकडं केलं होतं तुझं?''

''मग काय करणार साहेब? दोगींनी जीव नकोसा केला होता माझा. मित्रांसोबत राहायचं म्हणजे खाणं-पिणं आलं की नाही? पर या दोघींना समजूनच न्हाई राहायचं ना बाप्पा... खालीपिली भांडण करायच्या दोगीबी. म्हणजे मी मित्रांबरोबर असलो की यांना खुपायचं आणि माझी बायको घरात नवरा असताना बाहेर जाऊन सगळं करणार? मी काहून सहन करायचं बे? मग भांडण व्हायचं आमच्यात. एक दिवस तर कहरच केला ना बाप्पा! माह्याच घरातून मले बाहेर काढलं. मग काय करणार?''

''म्हणून काय तू मारायचं?''

''साहेब, मी त्या दिवशी सकाळी सकाळी गावात आलो होतो बदला घ्यायचा म्हणून. पण त्या दिवशी रात्रीला घरात शिरण्याची संधी शोधत असताना संधी मिळाली. रात्री बंद दरवाजा कसा उघडायचा हे मला ठाऊक होतं. मी जवळच्या काठीनी दरवाजा उघडला. आत शिरलो. माझी बायको कुठे झोपते ते ठाऊक होतं. तिथे गेलो. रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन बरोबरच्या लोखंडी संबळने डोकं, नाक आणि बाकी मारलं. ममताताई ओरडल्या तेव्हा मला समजलं की तिथे बायकोच्या ऐवजी ममताताई आहेत ते. तोपर्यंत



**पोलिसांनी गुन्ह्यात वापरलेली लोखंडी संबळ पोलिसांनी संपादित केली. जप्त केलेल्या हत्याराने पीडितांना झालेल्या जखमा होऊ शकतात का याविषयीची क्युरी अहवाल पोलिसांनी वैद्यकीय अधिकाऱ्याकडून प्राप्त केला. गुन्हा करताना विलासच्या शरीरावरचे कपडे, त्याच्या रक्ताचे नमुने पोलिसांनी हस्तगत केले.**

मी मायाच्या दिवाणापर्यंत गेलो होतो. तिलाही मारलं आणि तिथून गेलो.''

''ती संबळ कुठे आहे?''

विलासच्या या सूचनेनुसार पोलिसांनी गुन्ह्यात वापरलेली लोखंडी संबळ पोलिसांनी संपादित केली. जप्त केलेल्या हत्याराने पीडितांना झालेल्या जखमा होऊ शकतात का याविषयीची क्युरी अहवाल पोलिसांनी वैद्यकीय अधिकाऱ्याकडून प्राप्त केला. गुन्हा करताना विलासच्या शरीरावरचे कपडे तसेच त्याच्या रक्ताचे नमुने पोलिसांनी हस्तगत केले. सर्व संपादित गोष्टी पोलिसांनी वैद्यकीय तपासार्थ न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेकडे पाठवल्या. पोलिसांनी मा. न्यायालयात आरोपित विलास याच्या विरोधात दोषारोपपत्र दाखल केले.

मा. न्यायालयाने दोन्ही बाजू ऐकून तसेच समोर आलेले सर्व साक्षीपुरावे ग्राह्य धरून विलास याला दोषी ठरवले. तसेच त्याला भादंवि कलम ३०२ अन्वये जन्मठेप तसेच ५००० रुपये दंड तसेच कलम ३२५ नुसार ३ वर्षे कारावास आणि एक हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.

सदर प्रकरणाचा तपास सावली पोलीस ठाण्याचे सहा. पोलीस निरीक्षक आशिष बोरकर, पोलीस उपनिरीक्षक शशिधर चिचखेडे, पोलीस अंमलदार दर्शन लाटकर धीरज पिदुरकर व सपना बेल्लावार (कोर्ट पैरवी) यांनी अत्यंत कौशल्याने व चतुराईने पूर्ण केला आहे. ■ ***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***



कृष्णा दराडे
पोलीस उपनिरीक्षक
चंद्रपूर शहर पोलीस
ठाणे, चंद्रपूर

# स्पर्श

**स्पर्शाची भाषा अनोखी खरीच. स्पर्श बोलतो असे म्हणतात, ते पूर्णपणे सत्य आहे. स्पर्श मायेने कुरवाळतो, आश्वस्त करतो, सांत्वन करतो, कठीण प्रसंगी धीर देतो. तसाच तो नकोसा वाटतो, दटावतो, घाबरवतो आणि नैतिकतेच्या सगळ्या मर्यादा ओलांडून एखाद्याचे आयुष्य उद्ध्वस्तही करतो. महिला पोलीस अधिकाऱ्यांनी खांद्यावर हात ठेवताच त्या स्पर्शाने शहारलेल्या आजीबाईंच्या आयुष्यात नक्की काय उलथापालथ झाली होती?**



देवाच्या दारात कुणी उपाशी राहत नाही असे म्हटले जाते, ते म्हाताऱ्या भागाबाईच्या बाबतीत अगदी शंभर टक्के खरे होते. गावाबाहेर महाकाली देवीच्या मंदिराच्या परिसरात ती राहात असे आणि भक्तांनी दिलेले अन्न, अर्पण केलेला नैवेद्य यावर पोट भरत असे. त्या झिजलेल्या कुडीचे पोट तरी केवढे! घासभर अन्न पुरे होईल इतकेच.

सत्तरी झालेल्या भागाबाईच्या चेहऱ्यावर आयुष्यातले अनेक उन्हाळे आणि पावसाळे



तृप्ती खंडाईत
पोलीस उपनिरीक्षक
चंद्रपूर शहर पोलीस
ठाणे, चंद्रपूर



किशोरी गोडे
पोलीस अंमलदार
चंद्रपूर शहर पोलीस
ठाणे, चंद्रपूर



पूनम सरकार
पोलीस अंमलदार
चंद्रपूर शहर पोलीस
ठाणे, चंद्रपूर


पाहिल्याच्या खुणा होत्या. वयपरत्वे नजर मात्र अधू झाली होती. इतकी अधू, की तिला पाच-सहा फुटांपलीकडचे फारसे काही दिसत नसे. उगाच अस्पष्ट आकार जाणवत. त्यामुळे कधीकधी तिला फार असहाय्य, परावलंबी वाटत असे. त्यातून एक लांबची नात वगळता तिला कुणी फार जवळची अशी हक्काची माणसेही नव्हती. चार कपडे असलेले एक गाठोडे आणि आधाराला काठी हाच तिचा संसार होता. त्याआधारे ती दिवस ढकलत होती.

काहींचे आयुष्य इतके सरधोपट असते, की काल आणि आज यात काही फरकच नसतो. काळ आपल्या गतीने पुढे जात राहतो. पण या माणसांच्या आयुष्यात फारसे वेगळे असे काहीच घडत नाही. आला दिवस गेला अशा प्रकारे आयुष्य सरत असते. भागाबाई याच प्रकारातली होती. एक आखून दिलेली दिनचर्या न मोडता तिचा दिवस सरत असे. भल्या पहाटे उठायचे, जमेल तशी नित्यकर्मे उरकायची नि पुजारीबाबा



**काहींचे आयुष्य इतके सरधोपट असते, की काल आणि आज यात काही फरकच नसतो. काळ आपल्या गतीने पुढे जात राहतो. पण या माणसांच्या आयुष्यात फारसे वेगळे असे काहीच घडत नाही.**

येण्याची वाट पाहात देवळाच्या मागे असलेल्या पारावर बसून राहायचे. कधी पाखरांचे मंजूळ आवाज ऐकत तर कधी दूरवर असलेल्या हमरस्त्याने जाणाऱ्या एखाद्या वाहनाचा कानोसा घेत. साडेसहा वाजता पुजारीबाबांच्या सायकलची घंटी वाजली की देवळाच्या आवारात येऊन बसायचे. पुजारीबाबा आल्याबरोबर आधी देऊळ स्वच्छ झाडून काढत आणि पूजेची, आरतीची तयारी करत. तोवर भाविकांची वर्दळ सुरू व्हायची. कुणीतरी थर्मासमधून चहा आणायचे. पुजारीबाबांना द्यायचे. मग एका कपात ओतून भागाबाईलाही चहा मिळायचा. मग देवीची पूजा, आरती... दिवसभर भाविकांची गर्दी. कोणी फक्त हात जोडायला, कोणी माथा टेकायला, कुणी नवस बोलायला, कुणी नवस फेडायला. सगळ्या प्रकारच्या भक्तांच्या गर्दीने परिसर फुलून जायचा आणि दिवसही संपायचा. रोज हेच कालचक्र. त्यात बदल नाही. नाही म्हणायला नवरात्रीत जरा वेगळा माहोल असायचा. गर्दीही खूप असायची. नानाविध विकार मनी बाळगत भाविकांचे लोंढे यायचे. कधी पारावर बसल्याबसल्या ती त्यांच्या गप्पा ऐकायची आणि अधू झालेल्या नजरेसमोर कल्पनेने त्यांची चित्रे रंगवायची. तेवढाच थोडा विरंगुळा! पण एवढे वगळले तर तिच्या आयुष्यातल्या सगळ्या दिवसांचा रंग एकच होता.

मात्र तो दिवस वेगळा ठरणार होता. नेहमीसारखा उजाडला तरी संपण्याआधी भागाबाईच्या आयुष्यात कमालीची उलथापालथ घडवून जाणार होता!

***

चंद्रपूर शहर पोलीस ठाण्याची इमारत. फोन वाजला. ड्युटीवर

असलेल्या अंमलदारांनी तो उचलला.

''जयहिंद, चंद्रपूर सिटी पोलीस स्टेशन...''

''साहेब, मी इथल्या देवी मंदिराच्या जवळून बोलतोय. इथे एक जरा विचित्र मॅटर घडलंय.''

''कसलं मॅटर? आणि तुम्ही कोण बोलताय?''

''साहेब,'' पलीकडचा माणूस हळूहळू कुजबुजल्यासारखा बोलू लागला, ''इथे एक म्हातारी बाई राहते. भागाबाई नावाची. आज दुपारी एका माणसाने तिच्यावर जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला.''

''तुम्ही कोण तिचे?''

''साहेब, मी तिचा कोणी नाही. मी आणि माझे एक दोन मित्र इथे देवळात आलो होतो. त्यावेळी देवळापासच्या झाडीतून ओरडण्याचा आवाज आला. म्हणून आम्ही काय ते बघायला गेलो. त्यावेळी ही 'वाचवा, वाचवा' म्हणून ओरडत होती. 'पाणी द्या' म्हणत होती. आताही ती इथेच आहे साहेब. पण खूप घाबरलीये.''

''अच्छा. ठीक आहे. धन्यवाद. मी आमच्या साहेबांना सांगतो.''

पलीकडूनही फोन कट झाला.

त्या अंमलदारांनी ही हकीगत पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या पोलीस उपनिरीक्षक कृष्णा दराडे यांच्या कानावर घातली. त्यांनी आपल्या सहकारी महिला पोलीस उपनिरीक्षक तृप्ती खंडाईत यांना या घटनेची माहिती दिली. त्यानंतर पोलिसांचे पथक घटनास्थळाकडे रवाना झाले.

घटनास्थळी पोलिसांची जीप पोहोचताच तिथे जमलेल्या गर्दीत



**म्हातारी 'नको' अशा अर्थी मान हलवत होती. तिचे डोळे जणू विझल्यासारखे झाले होते. आयुष्याचा शेवटचा शेवटचा कालखंड तिला आता भार वाटायला लागला होता.**

काहीसा गोंधळ उडाला. लोकांना बाजूला सारत पोलीस मंदिराच्या मागच्या बाजूला असलेल्या एका सिमेंटच्या बाकड्याकडे गेले. समोर एक म्हातारी बाई कपाळाला हात लावून बसली होती. चेहऱ्यावर सुरकुत्यांचे जाळे होते. बाजूला एक मळकट गाठोडे पडलेले होते. तिच्या बाजूला एक मध्यमवयीन बाई बसली होती. ती जवळच्या पाण्याच्या बाटलीतून म्हातारीला पाणी देऊ करत होती. म्हातारी 'नको' अशा अर्थी मान हलवत होती. तिचे डोळे जणू विझल्यासारखे झाले होते. आयुष्याचा शेवटचा शेवटचा कालखंड तिला आता भार वाटायला लागला होता.

खंडाईत मॅडम पुढे झाल्या. त्यांनी आजीबाईंच्या दंडाला स्पर्श केला. म्हातारी शहारली. जणू मानवी स्पर्शाचाच धसका घेतल्यासारखी.

''आजी, घाबरू नका. आम्ही पोलीस आहोत. तुमच्या मदतीला आलो आहोत. चला, आपण आधी सिव्हिल हॉस्पिटलला जाऊ. चला आमच्याबरोबर.''

म्हातारी भागाबाई मुकाटपणे उठून त्यांच्याबरोबर निघाली.

रुग्णालयात भागाबाईची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. दुसरीकडे घटनास्थळाचा दोन पंचांसमक्ष पंचनामा करण्यात आला.

''हा प्रकार घडला तेव्हा तुमच्यापैकी कोणी होता इथे?'' जमलेल्या माणसांकडे पाहून दराडे साहेबांनी विचारणा केली.

एक साधारण पस्तिशीचा मनुष्य पुढे आला.

''मी होतो साहेब. मीच पोलीस स्टेशनला फोन केलेला.''

''तुमचं नाव? तुम्ही ओळखता का आजींना?''

''मी महेश. या आजींचं नाव भागाबाई. इथेच राहतात. आम्ही देवळात कधी येतो दर्शनाला तेव्हा दिसतात की! बहुतेक फॅमिली बिमिली नाहीये त्यांची. एकट्याच आहेत.''

''मगाशी तुम्ही त्या माणसाला पाहिलं का? कोण होता तो? याआधी त्याला पाहिलं होतं का इथे जवळ?''

''त्या माणसाला पाहिलं, पण इकडचा नाही वाटत तो. याआधी कधी इथं पाहिला नाही त्याला.''

''परत पाहिलं तर ओळखाल?''

''हां.. नक्कीच!''

''ठीक आहे. तुमचा नंबर देऊन ठेवा. काही लागलं तर सांगतो.''

''जी साहेब.''

***

''मॅडम, त्या आजीबाई अजून पण काही बोलायला तयार नाहीयेत. काहीही विचारलं तरी एकटक बघत राहतात नुसत्या.'' सहकारी महिला अंमलदारांनी खंडाईत मॅडमना माहिती दिली.

''म्हाताऱ्या माणसांचं असंच असतं. लहान मुलांसारखं. पटकन घाबरतात, कुठला मोठा धक्का सोसण्याची ताकदही कमी झालेली असते. त्यांच्याशी थोडं त्यांच्या कलानेच घ्यावं लागेल. चला. मी बघते.''

त्या दोघीजणी भागाबाईंजवळ आल्या.

''आजी, तुम्हाला पाणी, चहा काही हवं का?''



**भागाबाईचे ओठ हलले. हळूहळू ती बोलू लागली.**
**''दुपारचं थोडं खाऊन मी झाडाखाली आडवी झाले होते तवा हा बाबा मला शोधत आला. म्हनला, आजीबाई आमच्या घरी कार्यक्रम आहे, गरिबांना जेवण देणार आहे...''**

भागाबाईने नकारार्थी मान हलवली.

''बरं, आम्हाला थोडी मदत करणार?''

भागाबाईने चमकून वर बघितले. हा प्रश्न अनपेक्षित होता.

''काय मदत करनार मी म्हातारी!''

''नक्कीच. आम्हाला फक्त काय घडलं ते सांगा. तो कोण होता? काय बोलला? काय केलं? सगळं नीट सांगा. मला माहिती आहे, हे तुमच्यासाठी खूप कठीण आहे. पण तुम्ही जर ही माहिती दिलीत तरच आपण त्या हलकटाला पकडू शकतो. नाहीतर तो असाच मोकळा राहील...''

भागाबाईचे ओठ हलले. हळूहळू ती बोलू लागली.

''दुपारचं थोडं खाऊन मी झाडाखाली आडवी झाले होते तवा हा बाबा मला शोधत आला. म्हनला, आजीबाई आमच्या घरी कार्यक्रम आहे, गरिबांना जेवण देणार आहे. आधी मी नव्हती जाणार. पोट भरलेलं होतं. पन मागाहून विचार केला, संध्याकाळची सोय होईल. तेवढ्यात तो बोलला, बुंदीचे लाडू आहेत गोडाले. एकदम माय आठवली. कित्ती वर्सं झाली तिच्या हातचे लाडू खाऊन. खाऊसं वाटायला लागलं. म्हनून गेले त्याच्यामागं. थोडं पुढं गेल्यावर तो मले घिऊन झाडीत शिरला. मले कायपन कळेना! त्येला इचारलं तर म्हनला, लवकर पोचू. पन मग कळलं, त्येचा इरादा येगळाच होता. माज्यावर हात टाकला. मी आरडले ओरडले. दोगातिगांनी पाह्यलं बी त्येला. त्ये लोक त्येला शिव्या घालायले लागले. मी त्येला पकडायचा प्रयत्न केला, पन

तो घाबरा झाला. माझ्या हाताला हिसका देऊन गेला पळून.''

''बरं. आता आपण तुमची तक्रार नोंदवून घेऊ. या आमच्या अंमलदार सांगतील तुम्हाला काय करायचं ते. तुम्ही कंप्लेंट दिली की आपण लगेच त्याचा शोध घ्यायला सुरुवात करू.''

भागाबाईची फिर्याद नोंदवून घेण्यात आली. त्यानंतर तिला एका स्वयंसेवी संस्थेच्या आश्रमात दाखल करण्यात आले. आता निदान तिच्या डोक्यावर सुरक्षा देणारे एक छप्पर होते.

***

मुख्य शहरापासून देवीच्या मंदिराकडे यायला एकच मुख्य रस्ता आहे याची दराडे साहेबांना कल्पना होती. काही अंतरावर असलेल्या चौकात ट्रॅफिक सिग्नलपाशी सीसीटीव्ही कॅमेरा होता. आरोपी त्यात कैद झालेला असण्याची शक्यता होती. पोलिसांनी आता या पैलूच्या अनुषंगाने तपासाला सुरुवात केली. त्या चौकातले सीसीटीव्ही फूटेज ताब्यात घेऊन ते साक्षीदार महेश याला दाखवले. त्याने आरोपीला अचूक ओळखले. आता आरोपीच्या लवकरात लवकर मुसक्या आवळणे गरजेचे होते. पोलिसांनी युद्धपातळीवर शोध घ्यायला सुरुवात केली. जवळपास दहा ते बारा दिवस आजूबाजूचा परिसर, शेजारील जिल्हे पिंजून काढण्यात आले. अखेरीस आरोपीला गडचिरोली जिल्ह्यातून ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले. अधिक चौकशीदरम्यान आरोपीने दारूच्या नशेत हा प्रकार केल्याचे स्पष्ट झाले.

पीडित भागाबाई हिच्या वैद्यकीय तपासणीचा अहवाल



**काही अंतरावर असलेल्या चौकात ट्रॅफिक सिग्नलपाशी सीसीटीव्ही कॅमेरा होता. आरोपी त्यात कैद झालेला असण्याची शक्यता होती. पोलिसांनी आता या पैलूच्या अनुषंगाने तपासाला सुरुवात केली.**

पोलिसांनी हस्तगत केला. त्यानुसार तिच्यावर शारीरिक अत्याचार झाल्याचे निष्पन्न झाले. पीडितेचा सीआरपीसी १६४ प्रमाणे जबाब नोंदवण्यात आला. प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचाही जबाब नोंदवण्यात आला. आरोपीला अटक करण्यात आली आणि त्याच्या विरुद्ध मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करून न्यायालयात हजर करण्यात आले.

आरोपीला न्यायालयाने दोषी ठरवून बीएनएस अंतर्गत कलम ६४ (२) (के) अन्वये ५ वर्षांची सक्तमजुरी आणि पाच हजार रुपये दंड तसेच कलम २५८ (२) अन्वये सहा महिने सक्तमजुरी अशी शिक्षा सुनावली आहे.

चंद्रपूर शहर पोलीस स्टेशन येथे कार्यरत असलेल्या पोलीस उपनिरीक्षक कृष्णा दराडे तसेच तृप्ती खंडाईत आणि महिला पोलीस अंमलदार किशोरी गोडे आणि पूनम सरकार यांनी सदर प्रकरणाचा तपास उत्कृष्ट प्रकारे पूर्ण केला आहे. ■ ***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***



कै. रामराव नारायण हाटे

# दिवंगत
# हाटे दांपत्याच्या स्मरणार्थ



कै. लक्ष्मीदेवी राम नारायण हाटे

# बक्षिस योजना

सदर बक्षीस योजनेअंतर्गत माहे मार्च २०२६ मधील बक्षीसप्राप्त विजेत्यांची नावे खालीलप्रमाणे:


| तपशील | तपासकथा/लेख/कविता यांचे नाव | विजेत्याचे नाव | रक्कम |
|---|---|---|---|
| सर्वोत्कृष्ट तपासकथा प्रथम क्रमांक | रॉंग नंबर | श्री. श्रीकांत शिंदे, पोलीस निरीक्षक, खारघर पोलीस ठाणे, नवी मुंबई | रु. ७,०००/- |
| सर्वोत्कृष्ट तपासकथा व्दितीय क्रमांक | कोडे | श्रीमती मोनिका जेजोट, पोलीस उपनिरीक्षक, दिंडोरी पोलीस ठाणे, नाशिक (ग्रामीण) | रु. ५,०००/- |
| सर्वोत्कृष्ट लेख/कथा/कविता प्रथम क्रमांक | ओढ लेकीच्या मायेची | श्रीमती भारती सावंत, नवी मुंबई | रु. ३,०००/- |
| सर्वोत्कृष्ट लेख/कथा/कविता व्दितीय क्रमांक | महिलांनो, सावधान! चालताना त्रास होतोय? | श्रीमती ऐश्वर्या साळवी, मुंबई | रु. २,०००/- |

# सोशल मुशाफिरी

महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यांमधील पोलीस दलांच्या अधिकृत ट्विटर (आता एक्स) हॅन्डलवर त्या त्या भागातील महत्त्वाच्या घडामोडी, गुन्हे तपास, उपक्रम यांची माहिती देणाऱ्या काही पोस्ट्स.

## वर्धा पोलीस, १९ मार्च

**एक चुकीची क्लिक.. आणि आयुष्यभराचं नुकसान! सावध रहा, सतर्क रहा. फसवणुकीपासून स्वतःचे संरक्षण करा.**




## हिंगोली पोलीस, १५ मार्च

**पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांचे मार्गदर्शनात हिंगोली पोलीस दलाची अमली पदार्थ विरुद्ध कारवाई.**



लोकमत

# अमली पदार्थांविरुद्ध हिंगोली पोलिसांचा 'सर्जिकल स्ट्राईक'

अडीच महिन्यांत ४६ लाखांचा गांजा, अफू जप्त; आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**हिंगोली** : एकेकाळी मोठ्या शहरांपुरती मर्यादित असलेली अमली पदार्थांची व्याप्ती आता ग्रामीण भागाच्या उंबरठ्यापर्यंत येऊन ठेपली आहे. हिंगोली जिल्हा पोलिसांनी अमली पदार्थ तस्करांविरुद्ध कडक मोहीम उघडली असून, २०२६ च्या पहिल्या अडीच महिन्यांतच तब्बल ४६ लाख ९७ हजार ८०० रुपयांचा गांजा आणि अफू जप्त करून तस्करांचे धाबे दणाणले आहेत.

मुंबई, पुणे यांसारख्या मेट्रो शहरांमध्ये दिसणारे अमली पदार्थांचे जाळे आता ग्रामीण भागातही पसरत आहे. तरुणाईला नशेच्या आहारी ओढण्यासाठी तस्करांनी आपला मोर्चा खेड्यापाड्यांकडे वळवला आहे. पडद्यावरील नायकांचे अनुकरण करण्याच्या नादात तरुण पिढी अमली पदार्थांच्या विळख्यात अडकत चालली आहे, ही चिंतेची बाब आहे.

मात्र, हिंगोली जिल्ह्यात अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या तस्करांनी पाय रोवण्यापूर्वीच पोलिसांनी कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. केवळ तस्करीच नव्हे, तर जिल्ह्याच्या दुर्गम भागात चोरट्या मार्गाने केली जाणारी गांजा आणि अफूची शेती शोधून काढण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर होते. मात्र, गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी शेतात छापे टाकून ही अवैध शेती उद्ध्वस्त केली आहे.

यामुळे कच्च्या मालाचा पुरवठा करणाऱ्या उत्पादकांचेही कंबरडे मोडले आहे. २०२६ या वर्षातील अडीच महिन्यांत तब्बल चार ठिकाणी छापे टाकत ४६ लाख ९७ हजार ८०० रुपयांचा १५६१ किलो गांजा, अफू जप्त केला. हिंगोली पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे अमली पदार्थ विक्रेत्यांची 'नशा' उतरली आहे.


आर.पी. हॉस्पिटल
पेडगाव - पाथरी रोड, परभणी
लेबरकार्ड धारकांसाठी मोफत उपचार निदान व शस्त्रक्रिया
मोफत नार्मल प्रसूती सीझिअर शस्त्रक्रिया व लागणारे औषध मोफत
CONTACT FOR MORE INFORMATION 9226442020 9860918163 7798472404 9970545560


### चार गुंठ्यातील अफूच्या शेतीवर कारवाई

जिल्ह्यात यापूर्वी गांजा लागवड केलेल्या शेतीवर कारवाई करीत पोलिसांनी झाडे जप्त केली होती. अफूची शेती करण्याचे धाडस कोणी केले नव्हते. मात्र, जिल्ह्यात पहिल्यांदाच वसमत तालुक्यातील शिरळी शिवारात अफूची लागवड केली असल्याची माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई करीत अफूची झाडे जप्त केली.

### जिल्ह्यातील 'एनडीपीएस' अंतर्गत कारवाई

| वर्षे | दाखल गुन्हे | एकूण आरोपी | जप्त मुद्देमाल (किंमत) |
|---|---|---|---|
| २०२४ | ११ | १३ | २९८५८६५ |
| २०२५ | ०९ | १४ | ३२९७०५ |
| २०२६ | ०४ | ०५ | ४६९७८०० |

**२७ महिन्यांत १७४४ किलो गांजा, अफू जप्त**

जिल्ह्यात २०२४ ते मार्च २०२६ पर्यंत एकूण २४ ठिकाणी छापे टाकत पोलिसांनी तब्बल १७४४.८१८ किलोग्रॅम गांजा, अफू जप्त केला. यात २०२४ मध्ये १६९.७०८ किलोग्रॅम, २०२५ मध्ये १४.१११ किलोग्रॅम तर २०२६ मध्ये १५६१ किलोग्रॅम गांजा, अफूचा समावेश आहे.

### काय आहे 'एनडीपीएस' कायदा आणि शिक्षा?

अमली पदार्थांशी संबंधित गुन्ह्यांसाठी 'नार्कोटिक्स ड्रग्ज अँड सायकोट्रॉपिक सबस्टन्स' (एनडीपीएस) कायदा १९८५ लागू होतो.

या कायद्यांतर्गत अमली पदार्थांची विक्री, साठवणूक किंवा वाहतूक करणे हा अजामीनपात्र गुन्हा आहे. गुन्ह्याचे स्वरूप आणि जप्त केलेल्या मालाच्या प्रमाणावर १० ते २० वर्षांपर्यंत कठोर कारावास आणि १ ते २ लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे.

"अमली पदार्थांची तस्करी किंवा छुप्या पद्धतीने शेती करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जात आहे. गेल्या अडीच महिन्यांत मोठ्या प्रमाणात साठा जप्त केला असून, यापुढेही अशीच कडक कारवाई सुरू राहील. अमली पदार्थांबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास तातडीने पोलिसांशी संपर्क साधावा.

**डॉ. नीलाभ रोहन,** पोलिस अधीक्षक, हिंगोली.

Hello Hingoli
Page No. 1 Mar 15, 2026
Powered by: erelego.com

## सांगली पोलीस, ०३ मार्च

**दिनांक २६/०२/२०२६ रोजीच्या गुन्हे आढावा बैठकीमध्ये अतिशय क्लिष्ट अशा गुन्ह्यात उत्कृष्ट कामगिरी करून गंभीर गुन्हे उघडकीस आणल्याबद्दल अधिकारी व अंमलदार यांचे माननीय पोलीस अधीक्षक, सांगली, श्री. संदीप घुगे यांच्या हस्ते अधिकारी व अंमलदार यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात करण्यात आले.**



## लातूर पोलीस, ०८ मार्च

**औसा येथील अपघात रेड झोनची पोलीस अधीक्षकांकडून पाहणी!**

**तुळजापूर-नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील वारंवार घडणाऱ्या अपघातांची दखल घेत लातूर पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांनी घटनास्थळाची पाहणी करून संबंधितांना उपाययोजनांचे निर्देश दिले. लातूर पोलीस सदैव आपल्या सेवेत !**



देशोन्नती

# औसा येथील ‘अपघात रेड झोन’ची पोलीस अधीक्षकांकडून पाहणी !

देशोन्नती वृत्तसंकलन

लातूर : तुळजापूर-नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील औसा शहराजवळील ओव्हरब्रीज परिसरात वारंवार घडणाऱ्या अपघातांची गंभीर दखल घेत लातूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांनी घटनास्थळाची प्रत्यक्ष पाहणी करून परिस्थितीचा सखोल आढावा घेतला. तसेच नागरिकांच्या जीवित सुरक्षेसाठी तातडीच्या उपाययोजनांचे निर्देश त्यांनी संबंधितांना दिले.

६ मार्च २०२६ रोजी रात्री सुमारे १० च्या सुमारास याच परिसरात कार व मालवाहू आयशर टेम्पो यांच्यात भीषण अपघात होऊन चार जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून दोन जण गंभीर जखमी झाले आहेत.

या दुर्दैवी घटनेची तात्काळ दखल घेत पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी अपघातस्थळी भेट देऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी केली व भविष्यात अशा प्रकारच्या दुर्घटना टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याबाबत संबंधित विभागांना सूचना दिल्या.

पाहणीदरम्यान त्यांनी महामार्गावरील रस्त्याची रचना, वळणाची स्थिती, वाहनांचा वेग, प्रकाश व्यवस्था, दिशादर्शक फलक तसेच वाहतूक नियंत्रण यांसारख्या विविध बाबींचा बारकाईने पाहणी करून अपघातास कारणीभूत ठरणाऱ्या संभाव्य त्रुटी दूर करण्यासाठी तसेच वाहनचालकांना स्पष्ट मार्गदर्शन मिळावे यासाठी योग्य दिशादर्शक फलक, वेग मर्यादा सूचना, प्रकाश व्यवस्था सुधारणा व वाहतूक नियंत्रण यांसारख्या उपाययोजना संबंधित विभागाकडून तातडीने करून घेणे बाबत निर्देश देण्यात आले.

या प्रसंगी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी संपूर्ण लातूर जिल्ह्यातील अपघातप्रवण क्षेत्रांचा (ब्लॅक स्पॉट) शोध घेण्याबाबतही महत्त्वाचे निर्देश दिले.

जिल्ह्यात ज्या ठिकाणी वारंवार अपघात होत आहेत अशा सर्व ठिकाणांची माहिती संकलित करून त्याचा सविस्तर अहवाल तयार करावा व तो संबंधित विभागांकडे पाठवून त्यावर आवश्यक उपाययोजना करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करावा, असे आदेश सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना देण्यात आले आहेत.

या अनुषंगाने लवकरच प्रत्येक पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अपघातप्रवण ठिकाणांचा सविस्तर अहवाल तयार करून संबंधित शासकीय विभागांकडे सादर करण्यात येणार असून त्या ठिकाणी आवश्यक दुरुस्ती, सुरक्षा उपाययोजना व वाहतूक व्यवस्थापन सुधारणा करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत.

Latur Edition
Mar 08, 2026 Page No. 1
Powered by: erelego.com

## रायगड पोलीस, १७ मार्च

**मित्र आत्महत्या करण्याच्या उद्देशाने निघाल्याची माहिती देणारा कॉल डायल११२ वर प्राप्त होताच सर्व यंत्रणा तात्काळ कामाला लागली, माहिती प्राप्त होताच पोलिसांनी त्वरीत कारवाई करून त्या तरुणाचे प्राण वाचवले, पोलिस पथकाच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला..**



# पाककृती



# उन्हाळ्यासाठी पौष्टिक थंडाई लाडू

## थंडाई लाडू

### साहित्य:

१ कप मखाणे

१/२ कप साळीच्या लाह्या

३/४ कप थंडाई मसाला

१/४ कप गुलकंद

१/२  कप खोबरे किस

२–३ टेबलस्पून गुलाबाच्या पाकळ्या (सुकवलेल्या)

१/२ कप खडीसाखर

खडीसाखर भिजेल इतपत पाणी

१–२ टेबलस्पून तूप (गरज लागल्यास)

### कृती:

१. प्रथम थंडाई मसाला तयार करून घ्या. त्यासाठी प्रत्येकी दोन टेबलस्पून काजू, बदाम, मगज, पिस्ता, चारोळी हे थोडेसे भाजून घ्या. तसेच एक टेबलस्पून बडीशेप, खसखस, ४–५ वेलदोडे, ८–१० काळीमिरी, १ जावित्री, थोडेसे केशर हे थोडे गरम करून घ्या आणि त्यात गुलाबाच्या पाकळ्या व खडीसाखर घालून भाजलेल्या सर्व मिश्रणाची मिक्सर मधून पूड करून घ्या.

२. एका कढईत मखाणे व साळीच्या लाह्या कुरकुरीत होईपर्यंत मंद आचेवर भाजून घ्या. डिशमध्ये काढून थंड करत ठेवा.

३. थंड झाल्यानंतर मखाणे व लाह्या मिक्सरच्या भांड्यात घालून, बारीक पावडर करून घ्या. ही पावडर एका मोठ्या बाऊलमध्ये काढून घ्या.

४. खडीसाखरेची पूड करून घ्या. त्यात पाणी घालून कच्चा पाक तयार करून घ्या. पाक एकतारीपेक्षाही कमी शिजलेला असावा. पाक तयार करताना तिथेच उभे राहून एकसारखे ढवळत राहा.

५. आता एका मोठ्या बाऊलमध्ये साळीच्या लाह्या व मखाणे यांची पावडर, खोबरे किस, थंडाई मसाला, गुलकंद, गुलाबाच्या पाकळ्या असे सर्व साहित्य मिक्स करून घ्या आणि वरील पाक यात



## हेल्दी सोया बिर्याणी

ओतून मिक्स करून घ्या.

६. पाकात सर्व साहित्य व्यवस्थित मिसळून घ्या. त्यानंतर मिश्रणाचे हव्या त्या आकाराचे लाडू वळून घ्या. हेल्दी थंडाई लाडू खाण्यासाठी तयार आहेत.

### हेल्दी सोया बिर्याणी

#### साहित्य:

१ कप सोया चंक

२ सिमला मिरच्या, गाजर, दही, २ मोठे कांदे, ३ मोठे टोमॅटो

बिर्याणी मसाला, लाल तिखट, हळद, गरम मसाला, कसुरी मेथी, जिरे, तमालपत्र, आले लसूण पेस्ट

लिंबू

कोथिंबीर

तेल

चवीनुसार मीठ

#### कृती:

१. एका भांड्यात पाणी गरम करून त्यात १ कप सोया चंक २० मिनिटे ठेवा. नंतर हाताने दाबून त्यातील पाणी काढून टाका.

२. एका पसरट ताटात सोया पसरवून ठेवा. दुसऱ्या बाजूला गाजर, सिमला मिरच्या स्वच्छ धुवून त्याचे मध्यम आकाराचे काप करून एका पॅनमध्ये मध्यम आचेवर भाजून घ्या.

३. सोया चंक मध्ये गाजर, सिमला मिरचीचे तुकडे घालून वरून पाव कप दही, आले लसूण पेस्ट, हळद, लाल तिखट, बिर्याणी मसाला, गरम मसाला घालून मिश्रण एकजीव करून घ्या आणि १० मिनिटे मॅरिनेट करा.

३. पाणी गरम करून त्यात २ चमचे तूप, १ वेलची, १ लवंग, लिंबू, जिरे, कोथिंबीर घालून बासमती तांदूळ घाला आणि तो शिजवून घ्या.

४. दुसऱ्या बाजूला एका पॅनमध्ये तेल गरम करून त्यात तमालपत्र, वेलची, जिरे घालून बारीक चिरलेला कांदा, टोमॅटो तेलात चांगला परतून त्यात मॅरिनेट केलेले सोया, सिमला, गाजर मिसळा. नंतर वरून थोडे लाल तिखट, गरम मसाला, चवीनुसार मीठ घालून मिश्रण एकजीव करून त्यावर झाकण ठेवून वाफेवर शिजू द्या. नंतर थोडे पाणी घालून मिश्रण चांगले शिजू द्या. आता थोडी ग्रेव्ही बाजूला काढून वरून शिजलेला भात घालून पुन्हा वरून ग्रेव्ही घालून बारीक चिरलेली कोथिंबीर घालून गरमागरम सर्व्ह करा. ■

# शब्दकोडे

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ■ | ४ | | ५ | ■ | ६ |
| ७ | | ■ | ८ | | | ■ | ९ | | |
| ■ | १० | ११ | | ■ | १२ | १३ | | ■ | |
| १४ | | | | | ■ | | ■ | १५ | |
| १६ | | | ■ | ■ | ■ | १७ | १८ | | |
| | ■ | १९ | | २० | २१ | ■ | २२ | | ■ |
| २३ | २४ | | ■ | २५ | | | ■ | ■ | २६ |
| ■ | | ■ | २७ | ■ | ■ | ■ | २८ | २९ | |
| ३० | | | | ■ | ३१ | ■ | ३२ | | ■ |
| ३३ | | ■ | ३४ | | | | ■ | ३५ | |

**आडवे शब्द**

१. रोजनिशी ४. रोगाच्या लक्षणांच्या आधारे झालेली निश्चिती ७. छंद ८. एक पशू ९. दर सात वर्षांनी फुलणारे जांभळे फूल १०. पुस्तक १२. गणपतीचे नाव १४. स्त्रियांच्या विकारांसाठी वापरले जाणारे एक आयुर्वेदिक औषध १५. सत्त्व १६. हिरमोड १७. विष्णू १९. वादावादी, एक हिंदी मालिका २२. त्राता २३. देह २५. निंदा २८. मुख ३०. कट्टर वैर ३२. शरम ३३. मग्न ३४. रावण ३५. विष्णुपत्नी

**उभे शब्द :**

१. दाणादाण २. कृष्णाचे एक नाव ३. एक मुलीचे नाव ४. नजर ५. चेहरा झाकणारे वस्त्र, बुरखा ६. सूर्याचे किरण ११. *** ** लागू न देणे – एक वाक्प्रचार १३. एका अभिनेत्रीचे नाव १४. अजेय, अमर १५. एक नाजूक फूल १८. कीर २०. साळुंकी २१. अंतर मोजण्याचे एक माप २४. पद्धत २६. तुरुंग २७. संभाषण २८. शिष्य २९. उपस्थित ३०. छाती ३१. चित्त

# दक्षताच्या वाचकांसाठी खुशखबर...

दक्षता मासिकाशी वाचकांचा स्नेहबंध असाच टिकून राहावा व जास्तीत जास्त वाचक दक्षता परिवाराशी जोडले जावेत या हेतूने आम्ही काही उपक्रम हाती घेतले आहेत. यापैकीच एक म्हणजे अचूक शब्दकोडे सोडवणाऱ्या तीन स्पर्धकांना विजेते म्हणून घोषित केले जाणार आहे आणि त्यांना रोख पारितोषिकही दिले जाणार आहे. त्यासाठी स्पर्धकांनी मूळ शब्दकोडे अचूक सोडवून त्याचे कात्रण, आपले नाव, अचूक पत्ता, पिन कोड, संपर्क क्रमांक तसेच बँकेचा अकाऊंट नंबर व आयएफएससी कोड या माहितीसह आमच्या दक्षताच्या पत्त्यावर त्या महिन्याच्या पंचवीस तारखेपर्यंत पाठवणे आवश्यक आहे. दर महिन्याला विजेत्यांची निवड केली जाईल व पुढील महिन्यामध्ये विजेत्यांची नावे जाहीर केली जाऊन त्यांचे बँक खात्यात ऑनलाईन बक्षिसाची रक्कम वर्ग करण्यात येईल. यासाठी आपला भरघोस प्रतिसाद अपेक्षित आहे.

**बक्षिसे : पहिले ₹५००/-, दुसरे ₹३००/-, तिसरे ₹२००/-**

# मार्च २०२६ च्या अंकात प्रसिद्ध झालेल्या शब्दकोड्याचे उत्तर व स्पर्धेतील विजेत्यांची नावे

नाव : ______________________

पत्ता : ______________________

______________________ मोबाईल : ______________________

अकाऊंट नं : ______________________ आयएफएससी कोड ______________________

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| त | ह | ह | या | त | | हि | क | म | त |
| र | | ल | ग | ड | | जा | ण | | ळ |
| फ | त | वा | | स | ब | ब | | दा | |
| दा | र | | बा | | ट | | धू | रा | डे |
| री | स | | व | ट | वा | घु | ळ | | रा |
| | | का | टा | | | स | फे | द | |
| खां | डो | ळी | | डां | ग्या | खो | क | ला | |
| | ला | ज | वा | ब | | री | | ल | क्ष |
| का | रा | | प | र | त | | व्या | | त्रि |
| क | | खा | र | ट | | अ | प | व्य | य |



१. गायत्री अघोर, सोलापूर

२. मीरा सावंत, मुंबई


# लाखो वाचक

## ज्याची आतुरतेने वाट पाहतात!

महाराष्ट्र राज्य पोलिसांचे मुखपत्र

# दक्षता

सर्वदूर पोहोचलेले वाचकप्रिय मासिक



नागरिक आणि महाराष्ट्र पोलीस यांच्यातील महत्त्वाचा दुवा असलेले, सर्वोच्च खपाचे, ५१ वर्षांची दर्जेदार परंपरा असलेले मराठी मासिक

- रोमांचकारी सत्यकथा,
- विविध उत्कंठावर्धक सदरे,
- जनता व पोलीस यांच्यातील जिव्हाळा जपणारे वाङ्मय
- रसिक वाचकांच्या पसंतीस उतरेल असे दर्जेदार साहित्य...

**आपली प्रत आजच राखून ठेवा!**

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पत्रव्यवहारासाठी पत्ताः
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१
दूरध्वनीः ०२२-२२८३४५११/२२०४९७०१
mpd.dakshata@mahapolice.gov.in

वर्गणीसाठी दूरध्वनी: ०२२-२२८३४५११

DAKSHATA Marathi Magazine April 2026. RNI Registration No. 21352/1974. Postal Reg.No. MCS/131/2024-26 Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office GPO, Mumbai - 400 001 on 5th and 6th of every month. Date of Publication is 1st of every month.

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय




**प्रेषक :**

**सरसंपादक, दक्षता**

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा,
मुंबई - ४०० ००१

**प्रति,**